मेहता मराठी ग्रंथजगत

एप्रिल, २०१७ • पृष्ठे १०० • किंमत १५ रुपये
• वर्ष सतरावे • अंक चौथा



आवर्जून वाचावे



- 'कर्मयोगिनी' च्या इंग्रजी आवृत्तीचे प्रकाशन -

अनुवादित पुस्तके प्रकाशित करणारी प्रकाशन संस्था ही 'मेहता पब्लिशिंग हाऊस' ची खास ओळख आहे; पण मेहता पब्लिशिंग हाऊसच्या स्वतंत्र पुस्तकाचा अनुवाद त्यांनी स्वतःच प्रकाशित करण्याचा योग प्रथमच जुळून आला, त्यांच्या 'कर्मयोगिनी' या पुस्तकाच्या निमित्ताने. विजया जहागीरदार यांनी मराठीत लिहिलेले हे पुस्तक संगीता सोमण यांनी इंग्रजीत अनुवादित केले आहे. या इंग्रजी आवृत्तीचे प्रकाशन कॅप्टन आशा शिंदे-अलगप्पा यांच्या हस्ते करण्यात आले.

मेहता मराठी ग्रंथजगत

। एप्रिल २०१७ । वर्ष सतरावे । अंक चौथा ।

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २३८

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

संपादन सहाय्य
अंजली पटवर्धन

अंकाची किंमत १५ रु.

वर्गणी
मनीऑर्डरने अथवा
ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

अनुक्रमणिका

संपादकीय	**४**
उपक्रम	**१२**
साहित्यवार्ता	**२०**
पुरस्कार	**३०**
स्मृतिगंध	
रणजित देसाई यांचे कादंबरीविश्व	**३४**
जीवनासक्त संन्यासी	**५४**
जना-वनातला माणूस	**६२**
गोष्ट एका जंगलाची	**७०**
श्रद्धांजली	**७८**
स्मरण	**८२**
अभिप्राय	**८८**
बालनगरी	**९६**

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय

वेगळ्या वाटेवरील दोन साहित्यिक

मराठी साहित्य क्षेत्रात रणजित देसाई आणि व्यंकटेश माडगूळकर या दोन साहित्यिकांनी मोलाचं योगदान दिलं आहे; मात्र रणजित देसाईंचं साहित्य रोमँटिसिझमकडे झुकणारं होतं, तर व्यंकटेश माडगूळकरांच्या साहित्याला वास्तवाचं कोंदण लाभलं होतं. या दोघांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने त्यांच्या वाङ्मयीन कामगिरीवर टाकलेला एक दृष्टिक्षेप...

'स्वामी'कार म्हणून रणजित देसाईंची ओळख मराठी मनांमध्ये रुजली आहे; पण देसाईंच्या अन्य साहित्यकृतीही वाचकांचं मन मोहून घेणाऱ्या आहेत, हे विसरता येत नाही. कादंबरी, कथा, नाटक आणि ललित या आकृतिबंधांमध्ये देसाईंनी लीलया विहार केला.

देसाईंच्या कादंबऱ्यांबाबत बोलताना 'स्वामी'चा उल्लेख प्रथमत: करणे अपरिहार्य ठरते. 'स्वामी' ही कादंबरी नव वाचकांना कादंबरी या प्रकाराकडे आणि एकूण वाचनाकडे आकर्षित करण्यास कारणीभूत ठरली. त्यामुळे 'स्वामी' या कादंबरीचा उल्लेख बहुतांश वाचकांच्या तोंडी असतो. 'स्वामी' या कादंबरीला आजही वाचकांची प्रचंड मागणी असते. विशेषत: थेऊरला गेल्यानंतर 'स्वामी'ची आठवण येणारे अनेक वाचक आहेत. 'स्वामी' या कादंबरीतून एका ऐतिहासिक व्यक्तिरेखेचं 'माणूस'म्हणून दर्शन घडविण्याचा देसाईंचा मानस वाचकांना अतिशय भावला आणि 'सर्वाधिक खपाची कादंबरी' असा लौकिक 'स्वामी'ने प्राप्त केला. 'स्वामी'च्या लोकप्रियतेचे अनेक किस्से आहेत. प्रा. नरहर कुरुंदकर 'स्वामी'च्या सामर्थ्याबद्दल

लिहितात,'शोकनाट्याची सारी भव्यता, गूढता सुन्न करणारा विषाद, धन्यतेची जाणीव करून देणारे जीवनमूल्य, अनुभवाच्या पोटात असणारा कठोर वास्तवाचा स्पर्श अन् तितकाच अम्लान माणुसकीचा दरवळणारा गंध यांचा एकत्रित प्रत्यय आणून देणारी 'स्वामी' ही मराठीतील फार विरळा अशी कादंबरी आहे.'

देसाईंच्या 'श्रीमानयोगी' कादंबरीलाही वाचकांची पसंती मिळाली. 'अभोगी', 'राधेय', 'राजा रवि वर्मा' सह त्यांच्या अन्य कादंबऱ्यांचंही वाचकांनी स्वागत केलं. कारण देसाईंची सौंदर्यासक्तता वाचकांना भावली. कोणतं सौंदर्य होतं देसाईंच्या कादबऱ्यांमध्ये, तर त्यागाचं सौंदर्य, भावसौंदर्य, रसिकतेचं सौंदर्य. कुठून प्रकटलं होतं हे सौंदर्य त्यांच्या आविष्कारात, याची मीमांसा करताना द. ता. भोसले लिहितात, ' देसाईंना भारतीय संस्कृतीविषयी नितांत आदर आहे. तिच्या सनातन विचारधारांवर श्रद्धा आहे. आपल्या धर्ममूल्यांवर विश्वास आहे. भूतकाळावर तितकेच प्रेम आहे. आपल्या पूर्वजांच्या पराक्रमावर त्यांची श्रद्धा आहे. भारतीय संस्कृतीमधील त्याग, प्रेम, दया, सेवा, पराक्रम, औदार्य, मांगल्य, सद्भाव या जीवनमूल्यांवर जिवापाड प्रेम आहे. जीवन जगण्यासाठी आहे, तृप्त आणि कलंदरपणे जगण्यासाठी आहे. रसिकतेने जगण्यासाठी साफल्याची धारणा आहे. अशा अथांग आणि अलौकिक व्यक्तीचे जीवन त्यांना मोहित करीत असावे. मग ते इतिहासातील असो वा कल्पित असो, अशा आकाशगामी थोर विभूतीचे वाचकांना दर्शन घडविणे त्यांना आवडत असावे आणि त्यातूनच या साम्याला महत्त्व देणारी पात्रे त्यांच्या कादंबरीत येत असावीत असे वाटते.'

देसाईंची ही सौंदर्यासक्तता त्यांच्या कथांमधूनही जाणवते; मात्र डॉ. आनंद यादव यांनी त्यांच्या ग्रामीण कथांवर स्वतंत्रपणे भाष्य करताना त्यातील वास्तवताही अधोरेखित केली आहे. तसेच, या कथांचा आकृतिबंध, आशय आणि वाङ्मय इतिहासातील या कथांचं स्थान याबद्दल डॉ. यादव लिहितात, 'देसाईंच्या 'रूपमहल' कडून 'कातळ'कडे प्रवास करताना असे जाणवते, की देसाईंची कथा वि. स. खांडेकरांच्या मधून प्रवासत आलेला मराठीपणाचा आणि मराठी मनाचा खानदानी वारसा सांभाळते आहे. हा वारसा नववाङ्मयातील कलात्मकतेच्या नवभानामुळे मराठी ग्रामीण कथेला आणि पर्यायाने एकूणच मराठी कथेला पुढे नेण्याचा प्रयत्न करतो आहे. नव्या-जुन्यांचा संबंध न तोडता एक 'पूल' बांधण्याचा प्रयत्न ही ग्रामीण कथा

करते आहे.’

देसाईंनी नाटक हा आकृतिबंधही हाताळला. ‘कांचनमृग’, ‘श्रीमान योगी’ आदी चौदा नाटकं त्यांनी लिहिली. त्यापैकी ‘हे बंध रेशमाचे’ हे त्यांचं संगीत रंगभूमीवर गाजलेलं नाटक. या नाटकाला भारत -पाक फाळणीची पार्श्वभूमी लाभली होती. ‘कांचनमृग’ हे नाटक आणिबाणीवर आधारित होतं. या नाटकाला स्पर्धेत अनेक बक्षिसं मिळाली. ‘पंख जाहले वैरी’ या नाटकात जोशी-अभ्यंकर हत्याकांड हा विषय त्यांनी हाताळला होता. एकूण, त्यांच्या नाटकांमधूनही माणसांमाणसांतील दुराव्याबद्दलची खंत त्यांनी व्यक्त केली होती.

‘रंगल्या रात्री अशा’ हा चित्रपट रणजित देसाईंच्या कथेवर आधारित होता आणि त्याचे संवादही देसाईंनी लिहिले होते. १९६२चा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा मान या चित्रपटाने पटकावला. एका कलावंताचा जीवनपट देसाईंनी या कथेतून साकारला होता. व्यवहारी जग आणि त्याचं कलासक्त मन यातील द्वंद्व या कथेतून देसाईंनी चित्रित केलं होतं. तर, रणजित देसाई हे एक कलासक्त, सौंदर्यासक्त साहित्यिक होते. आपल्या अवतीभवती काय घडतंय यापेक्षा काय घडायला हवं, याची जाणीव त्यांच्या हळव्या, सौंदर्यासक्त मनात सदैव जागृत होती. म्हणून आपल्या साहित्यकृतींतून त्यांनी भावनांचं, रसिकतेचं सौंदर्य उधळलं. सर्वसामान्य वाचकांना हे सौंदर्य आजही साद घालतं आहे आणि घालत राहणार आहे.

❖

व्यंकटेश माडगूळकराचं नाव नवकथेचे जनक म्हणून गंगाधर गाडगीळ, पु.भा.भावे, अरविंद गोखले यांच्याबरोबर घेतलं जातं; ‘बनगरवाडी’, ‘सत्तांतर’, ‘करुणाष्टक’ सारख्या कादंबऱ्या माडगूळकरांनी लिहिल्या. प्रवासवर्णन, आत्मचरित्र, व्यक्तिचित्रण, रेखाटन, अनुवाद, ‘पती गेले ग काठेवाडी’ सारखं नाटक, अनेक चित्रपटांच्या पटकथा असे साहित्याचे विविध आकृतिबंध माडगूळकरांनी हाताळले. तरीही त्यांच्या कथासंग्रहांची संख्या जास्त भरेल; कारण त्यांचा मूळचा पिंड कथाकाराचा होता.

माडगूळकरांचं नाव नवकथेचे जनक म्हणून घेतलं जात असलं तरी भावे, गाडगीळ, गोखल्यांपेक्षा माडगूळकरांची कथा सर्वस्वी भिन्न होती. भावे, गाडगीळ आणि गोखल्यांमुळे कथेला मनोविश्लेषणाचं नवपरिमाण लाभलं तरी त्यांची कथा पांढरपेशा परिघात फिरत राहिली (अर्थात ती त्यांची मर्यादा म्हणता येत नाही.) माडगूळरांचा परिघ थोडा विस्तारलेला होता.

ग्रामीण परिसर, ग्रामीण माणसं त्यांच्या कथांतून डोकावत राहिली. त्यांनी जाणीवपूर्वक मनोविश्लेषण केलं नाही. माणसाचा स्वभाव आणि सुप्त मन या दोनही गोष्टीं त्यांच्या कथांतून संमिश्रतेने प्रकटतात. माणसं वाचण्याचं आणि ती आहेत तशी रेखाटण्याचं कसब माडगूळकरांकडे होतं आणि गोष्टीवेल्हाळपणामुळे या कथा अगदी साध्या-सोप्या भाषेत वाचकांपर्यंत पोहोचल्या. त्यामुळे आकृतिबंधाच्या बाबतीतही माडगूळकरांच्या कथेचं स्वरूप संमिश्र होतं, असं म्हणायला हरकत नाही. ग्रामीण कथाकार म्हणूनही त्यांचा उल्लेख केला जातो.

'बनगरवाडी' ही माडगूळकरांची कादंबरी मराठी साहित्यात मैलाचा दगड मानली जाते. बनगरवाडी या एका छोट्याशा भूप्रदेशाचं चित्रण या कादंबरीत त्यांनी केलं आहे. तिथं राहणारे लोक, त्यांचं जीवन, त्यांच्या चालीरीती, तेथील समजुती, प्रथा, परंपरा या सगळ्याचा वेध माडगूळकरांनी या कादंबरीतून घेतला आहे. एका शाळामास्तरची बनगरवाडीला बदली होते. तिथल्या मुलांना शिक्षणासाठी प्रवृत्त करणाऱ्या मास्तरबद्दल त्या गावातील लोकांना आपुलकी वाटायला लागते आणि मास्तर त्या गावातील एक महत्त्वाचा घटक बनतो; मात्र तेथील दारिद्र्य आणि अज्ञान मास्तरला अस्वस्थ करत असतं. मग बनगरवाडीला दुष्काळ पडतो आणि तेथील लोकांना स्थलांतर करावं लागतं. या सगळ्याचं वास्तव चित्रण 'बनगरवाडी'तून केलं आहे.

'करुणाष्टक'मधून त्यांनी आईच्या आठवणी जागवल्या असल्या तरी त्या पुस्तकातून त्यांनी ज्या ज्या प्रदेशात वास्तव्य केलं तो प्रदेश, तत्कालीन ग्रामीण जीवन यांचे संदर्भही वाचायला मिळतात.

'सत्तांतर' ही त्यांची कादंबरी मराठी वाङ्मयाच्या इतिहासातील एक वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी ठरावी. या कादंबरीच्या गाभ्याबद्दल माडगूळकर लिहितात, 'मी काही प्राणिशास्त्रज्ञ नाही. ललित लेखकाच्या भूमिकेतून मी एक सर्व नर-टोळी, मिश्र-टोळीवर पद्धतशीर हल्ला करते, मिश्र टोळी-नायकाचा पराभव होतो आणि सत्तांतर घडून येते, एवढी वानरांच्या जीवनातील नाट्यपूर्ण आणि अर्थपूर्ण घटिते निवडली.' या कादंबरीच्या आशय आणि अभिव्यक्तीबद्दल ते लिहितात, 'सत्तांतर' ही उघडउघड प्राणिकथा व्हावी, हे मला नको होते. ते एक ढोबळ रूपकही व्हायला नको होते. 'पंचतंत्र' किंवा 'हितोपदेशा'तील ती एक तात्पर्य-कथा व्हावी, हेही टाळायचे होते. म्हणून मी मानवी आरोप वानरांवर केले नाहीत. त्यांना नावे

दिली, ती शरीर-वैशिष्ट्यांनुसार!' वानरासारख्या प्राण्यावर स्वतंत्र कादंबरी लिहिली जाऊ शकते, हे माडगूळकरांनी साधार दाखवून दिलं. अर्थातच परदेशी प्राणी अभ्यासकांचे वानरांच्या संदर्भातील अभ्यासपूर्ण लेख वाचनात आल्यामुळे आणि नागझिरा येथील काही दिवसांच्या वास्तव्यात त्यांनी केलेल्या वानरांच्या निरीक्षणामुळे ते ही कादंबरी लिहायला ते प्रवृत्त झाले.

'पती गेले ग काठेवाडी' हे त्यांचं नाटकही आकृतिबंधाच्या दृष्टीने वेगळं होतं. लोकनाट्याचा बाज वापरलेलं प्रयोगशील नाटक, असा त्याचा उल्लेख करता येऊ शकतो. या संदर्भात ज्येष्ठ अभिनेते निळू फुले यांचे उद्‌गार आठवतात. माडगूळकरांबद्दल बोलताना ते म्हणाले होते, 'हा माणूस स्वत: जास्त शिकला नाही; पण ह्याची पुस्तकं विद्यापीठात अभ्यासासाठी नेमली जातात.'

माडगूळकरांनी निसर्गाचा -राना-वनाचा मुक्तपणे आस्वाद घेतला. माणसंही उत्कटतेनं वाचली. प्राण्यांचं विश्वही तेवढ्याच आत्मीयतेने आणि अभ्यासपूर्णतेने जाणून घेतलं. पांढरपेशा घरात जन्मूनही विविध जाती-जमातीच्या, विविध स्तरावरच्या लोकांमध्ये ते वावरले. त्यामुळे त्यांचं अनुभवविश्व व्यापक होत गेलं आणि साध्या-सोप्या, ओघवत्या भाषेत ते त्यांनी शब्दबद्ध केलं. चित्रमयता हे त्यांच्या भाषाशैलीचं खास वैशिष्ट्यं होतं. कारण त्यांच्यातील चित्रकारही जागा होता. कोणताही आकृतिबंध असला तरी त्यांच्या भाषाशैलीचं हे वैशिष्ट्यं जाणवल्याखेरीज राहात नाही.

व्यंकटेश माडगूळकरांचा समग्रतेने विचार करताना ते एक अष्टपैलू साहित्यिक होते, असं म्हणण्यास वाव आहे. कथा-कादंबरी (विशेषत: कथा) या आकृतिबंधांवर त्यांनी स्वतंत्र नाममुद्रा उमटवली; पण जे काही त्यांनी लिहिलं त्यात स्व-अनुभव नेहमीच केंद्रस्थानी राहिला. त्यामुळेही कदाचित त्यांची कथा सर्वसमान्यांनाही जवळची वाटली आणि समीक्षकांनीही गौरवली.

एकूणच, कोणतीही साहित्यकृती एकाच वेळी वाचनीय आणि अभ्यसनीय असणं, ही क्वचितच आढळणारी गोष्ट आहे; पण माडगूळकरांचं साहित्य (विशेषत: कथा, कादंबरी) या दोन्ही गोष्टींचा एकाच वेळी प्रत्यय देतं. म्हणून आजही त्यांचं वाङ्‌मय इतिहासातील आणि वाचकांच्या मनातील स्थान अबाधित आहे.

मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ५००रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

वाचकांसाठी सुवर्णसंधी!

WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही
बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे

पहिला मजला, खानापूर रोड, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड, टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६

शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६

स्टार बझार, पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१

शॉप नं. - जी/१५, प्रोझोन मॉल, चिखलठाणा, एमआयडीसी, औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी संपर्क

www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएसी, एमपीएसी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१

Email : mehtabooksellers@gmail.com

amazon dailyhunt GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

www.amazon.com

m.dailyhunt.in

play.google.com

eBooks

Online पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

उपक्रम

दिनविशेष

दिसामाजि काहीतरी ते लिहावे।
प्रसंगी अखंडित वाचित जावे।।
- श्री समर्थ रामदास स्वामी

वाचकांसाठी सुवर्णसंधी

'करा मैत्री पुस्तकांशी'
'मेहता पब्लिशिंग हाऊस' चा
नवीन उपक्रम
१६ एप्रिल ते १५ मे २०१७
दरम्यानचा दिनविशेष

आपल्या लाडक्या लेखकांना वा अनुवादकांना शुभेच्छा
या ईमेलवर पाठवा.

authors@mehtapublishinghouse.com

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर

५०टक्क्यांपर्यंत सूट

१५ एप्रिल – रविंद्र बागडे यांचा जन्मदिन

रविंद्र बागडे लिखित **दोन** पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ३२०/-

१५ एप्रिल ते १७ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत
१९९/-

१८ एप्रिल – मीरा सिरसमकर यांचा जन्मदिन

मीरा सिरसमकर लिखित चार पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ४९५/-

१८ एप्रिल ते २० एप्रिलपर्यंत

सवलत किंमत
२९९/-

१९ एप्रिल – पारू नाईक यांचा जन्मदिन

पारू नाईक लिखित **दोन** पुस्तकांवर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - ३३०/-

१९ एप्रिल ते २० एप्रिलपर्यंत

सवलत किंमत
१६५/-

२१ एप्रिल – ज्ञानदा नाईक यांचा जन्मदिन

'तजेलदार कॅनव्हास' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - १६०/-

२१ एप्रिल ते २२ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत
९९/-

२१ एप्रिल – ॲलिस्टर मॅक्लीन यांचा जन्मदिन

ॲलिस्टर मॅक्लीन यांच्या **१० अनुवादित** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - २५९०/-

२१ एप्रिल ते २३ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत
१२९५/-

२१ एप्रिल - जागतिक निर्मिती आणि इनोव्हेशन दिन

'द मॅजिक ऑफ थिंक बिग, द माइंड जिम, सूत्रे प्रभाव पाडण्याची' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - ७९०/-

२१ एप्रिल ते २३ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत ४९९/-

२२ एप्रिल - वसुंधरा दिन

'आपली सृष्टी' या १० पुस्तकांचा संच, वसुंधरा,पर्यावरण प्रदूषण' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - १६२०/-

२२ एप्रिल ते २४ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत ८९९/-

२२ एप्रिल - चेतन भगत यांचा जन्मदिन

चेतन भगत यांच्या **३ अनुवादित** पुस्तकांवर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - ७००/-

२२ एप्रिल ते २५ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत ४९९/-

२२ एप्रिल - डॉ. बाळ फोंडके यांचा जन्मदिन

डॉ. बाळ फोंडके लिखित ११ पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - १३४०/-

२२ एप्रिल ते २५ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत ८४९/-

२३ एप्रिल - यशोधरा काटकर यांचा जन्मदिन

'बंजाऱ्याचे घर, थर्ड पर्सन'या पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ३९०/-

२३ एप्रिल ते २५ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत
१९५/-

२३ एप्रिल - विल्यम शेक्सपिअर दिन

सर्व पुस्तकांवर ४०टक्के सूट. *स्वामी' हे पुस्तक सोडून.* किमान ३०००/- रुपयांची खरेदी आवश्यक. प्रत्येक पुस्तकाची एकच प्रत. *२३ एप्रिल या एकाच दिवशी.*

२४ एप्रिल - सचिन तेंडुलकर यांचा जन्मदिन

सचिन तेंडुलकर लिखित 'प्लेईंग इट माय वे' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत – ६४०/-

२४ एप्रिल ते २६ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत
३९९/-

२६ एप्रिल - रवींद्र गुर्जर यांचा जन्मदिन

'कोमा, सेकंड लेडी, द पेलिकन ब्रीफ' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ६३०/-

२६ एप्रिल ते २८ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत
३४९/-

२६ एप्रिल - जागतिक नृत्यदिन

'मायकल जॅक्सन' या अनुवादित पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - ७९५/-

२६ एप्रिल ते २८ एप्रिलपर्यंत

सवलत किंमत
४९९/-

२६ एप्रिल - राजा रवि वर्मा यांचा जन्मदिन

रणजित देसाई लिखित 'राजा रवि वर्मा' या पुस्तकावर विशेष सवलत.

सवलत किंमत १९९/-

मूळ किंमत - ३२०/-

२६ एप्रिल ते २८ एप्रिलपर्यंत

१ मे - महाराष्ट्र दिन

संच - १ 'कर्मचारी, क्रांतिसूर्य, अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड, बी द चेंज– भ्रष्टाचाराशी लढा, मराठेशाहीतील मनस्विनी, अण्णा हजारे' या पुस्तक संचावर विशेष सवलत.

सवलत किंमत ६४९/-

संच-१ ची मूळ किंमत - ९७०/-

१ मे ते ३ मेपर्यंत

संच - २ 'स्वामी, ययाति, झोंबी, वपुर्झा, ओझं, संभाजी, माकडमेवा, धिंड, खेकडा, नेताजी, रुचिरा भाग १ व २, चौघीजणी' या पुस्तक संचावर विशेष सवलत.

सवलत किंमत २६९९/-

संच-२ ची मूळ किंमत -३२९०/-

१ मे ते ४ मेपर्यंत

४ मे -रॉबिन कुक यांचा जन्मदिन

रॉबिन कुक यांच्या **आठ अनुवादित** पुस्तकांवर विशेष सवलत.

सवलत किंमत १२८३/-

संचाची मूळ किंमत - २५६५/-

४ मे ते ६ मेपर्यंत

७ मे - रवीन्द्रनाथ टागोर यांचा जन्मदिन

रवीन्द्रनाथ टागोर यांच्या **सहा अनुवादित** व त्यांचा जीवनपट मांडणाऱ्या **'अ'मृत पंथाचा यात्री'** या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

सवलत किंमत ५९९/-

संचाची मूळ किंमत - १०००/-

७ मे ते ८ मेपर्यंत

८ मे – जागतिक रेडक्रॉस दिन

संच -१ 'वॉर्सा ते हिरोशिमा, द रशियन डायरी, द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज्, द डायरी ऑफ मेरी बर्ग, शिंडलर्स लिस्ट, आठवणींचे मोती' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

सवलत किंमत ९४९/-

संच- १ ची मूळ किंमत - १५७०/-

८ मे ते १० मेपर्यंत

संच -२ 'द डायरी ऑफ ॲन फ्रँक, शत्रूशी दोन हात, लेनिनग्राडचा वेढा, प्रेमाची परिभाषा, द गन्स ऑफ नॅव्हारन, इनसाइड द गॅस चेंबर्स, एका सैनिकाचा मृत्यू' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

सवलत किंमत १०९९/-

संच -२ ची मूळ किंमत -१७९०/-

८ मे ते १० मेपर्यंत

१२ मे – मातृत्व दिन

'चिकन सूप फॉर द मदर्स सोल, चिकन सूप फॉर द इंडियन मदर्स, आजीच्या पोतडीतील गोष्टी, करुणाष्टक, कळेल का त्याला आईचं मन,जिच्या हाती पाळण्याची दोरी, रुचिरा भाग १ व भाग २,गर्भसंस्कार, एक सांगू?, सुखद मातृत्व, बालसंगोपन' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

सवलत किंमत १५९९/-

संचाची मूळ किंमत - २५६५/-

१२ मे ते १४ मेपर्यंत

१५ मे – जागतिक कुटुंब दिन

'चिकन सूप मालिका २५ पुस्तके' या पुस्तक संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ७६२५/-

सवलत किंमत ३८१३/-

१५ मे ते १६ मेपर्यंत

Aप्रिल महिना विशेष

'एप्रिल फूल नको, करा एप्रिल कूल'. 'A' आद्याक्षराच्या पुस्तकसंचावर ५०% सूट.

सवलत किंमत
११,०९५/-

संचाची मूळ किंमत - २२,१९०/-

१६ एप्रिल ते ३० एप्रिलपर्यंत

मे महिना विशेष

'मे'च्या सुट्टीची मौज मोठी, 'M'च्या पुस्तकांनी रंगेल सुट्टी, ५०टक्क्यांत मिळेल भला मोठा संच, खर्च अवघा थोडा, गंमत अफाट अनंत...

सवलत किंमत
१२,०४०/-

संचाची मूळ किंमत - २४,०८०/-

१ मे ते ३० मेपर्यंत.

आमचे लेखक-अनुवादक यांचा जन्मदिन वा स्मृतिदिन यानिमित्त तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.

अधिक माहितीसाठी संपर्क :

फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२

website : www.mehtapublishinghouse.com

आपल्या आवडत्या लेखकांची पुस्तके online खरेदी करा

www.mehtapublishinghouse.com

e-books आपल्या आवडत्या लेखकांची पुस्तके आता Computer, i-pad आणि Tab वर वाचा.

play.google.com/store/books ● m.dailyhunt.in/Ebooks/marathi

www.amazon.com उपलब्ध....

मेहता मराठी ग्रंथजगत (Digital Edition)
पाच वर्षांचे सभासद व्हा आणि आमच्या सर्व पुस्तकांवर ३०% सवलत मिळवा. वर्गणी - ४०० रुपये.(स्वामी सोडून)

T-Book Club
TBC ची मेंबरशीप घ्या. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा.

मेहता पब्लिशिंग हाऊस • : 9422046575 • sales@mehtapublishinghouse.com

२ री आवृत्ती

एक्झोडस्



लेखक - **लिऑन युरिस**

अनुवाद - **बाळ भागवत**

किंमत : ५९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

रोमन सम्राट व्हेस्पासियन याने आपला सेनापती टायटस याला दोन साध्या आज्ञा दिल्या. ज्यूंचे देऊळ जमीनदोस्त करा. सर्व ज्यूंना ठार मारा. जेरुसलेमच्या पाडावानंतर त्याने या आज्ञांचे तंतोतंत पालन करायला सुरुवात करताच जिवाच्या आकांताने देशोधडीला लागलेले ज्यू जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले. त्यांना स्वत:चा असा देशच राहिला नाही. ते जिथे जिथे पोचले, तिथे तिथे त्यांनी आपल्या देशाची स्मृती कायम मनात ठेवली. अपार कष्ट, हालअपेष्टा, जुलूम आणि कत्तली यांना तोंड देत आपला धर्म जिंवत ठेवला. दोन हजार वर्षे आपल्या ईश्वरदत्त पवित्र भूमीवर आपल्या प्राचीन राज्याची पुन्हा स्थापना करण्याचा ध्यास धरणाऱ्या देशोदेशींच्या हद्दपार ज्यूंची - पासोव्हरची प्रार्थना संपत असे - ''पुढल्या वर्षी जेरुसलेममध्ये'' या शब्दांनीच. इतिहासाचा मागोवा घेत, जिद्दीने उभारलेल्या आपल्या देशाच्या स्वातंत्र्यसासाठी तेवढाच प्रखर लढा देणाऱ्या ज्यूंची कथा सांगणाऱ्या श्री. लिऑन युरिस यांच्या एक्झोडस् या पुस्तकाचा हा अनुवाद.

साहित्यवार्ता

कवितेच्या पानाला 'वेबसीरिज'चं कोंदण
डॉ. श्रीराम लागू, संदीप खरे, शर्वरी जमेनिस, कौशल इनामदार यांचा सहभाग

एरवी हौसेपोटी कविता करणं, कधी तरी आवडीनं कवितांची पुस्तकं वाचणं आणि खूपच आवड असली, तर कवितांच्या कार्यक्रमाला जाणं, असं आपल्यातले अनेक जण करत असतीलच. कित्येक जण त्याही पुढे जात कवितांचे ब्लॉग्सदेखील फॉलो करत असतील; पण एक संध्याकाळ मात्र यापेक्षा वेगळी होती. कारण एका आगळ्यावेगळ्या कार्यक्रमात आणि 'वेबसीरिज' नामक एका देखण्या ऑनलाइन कोंदणात हे 'कवितेचं पान' रसिकांपुढे अलगदपणे उलगडत चाललं होतं...

होय, 'कवितेचं पान' हे नाव आहे एक वेबसीरिजचं. संपूर्णत: कविता आणि कवितांनाच वाहिलेल्या या एका आधुनिक अन् ऑनलाईन व्यासपीठाच्या उद्‌घाटनाचा सोहळा रसिकांनी तुडुंब भरलेल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाने अनुभवला. आता कवितांचाच अनुभव तो, त्याविषयी काय बोलावं!... कधी खळखळून हसायला लावणाऱ्या, कधी डोळ्यांत चटकन पाणी आणणाऱ्या, कधी दुसऱ्याच कुठल्या जगाच्या सफरीवर नेणाऱ्या, तर कधी त्या शब्दाशब्दांना दाद घेऊन जाणाऱ्या अशा अनेक कविता पाहता पाहता मंचावर साभिनय सादर होत गेल्या अन् रसिक त्यात अलगद गुरफटत गेले..

या देखण्या सोहळ्यासाठी ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांची विशेष उपस्थिती होती. शिवाय, शर्वरी जमेनिस, कौशल इनामदार, संदीप खरे, वैभव जोशी, कार्यक्रमाच्या संकल्पक मधुराणी गोखले-प्रभुलकर हे कलाधर्मींदेखील उपस्थित होते. मिरॅकल्स ॲकॅडमी ऑफ आर्ट्स अँड मीडियातर्फे हा कार्यक्रम घेण्यात आला.

अरे खोप्यामधी खोपा...

'अरे खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला... देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे... लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा' अशा अनेक कवितांचा एक झराच मग या ठिकाणी जणू वाहू लागला. ओळखीच्या, अनोळखी, माहितीतल्या, अनवट, फेसबुक, व्हॉट्सॲपवरच्या आणि अजूनही किती तरी कविता!... खुद्द नटसम्राट डॉ. लागू यांनीही बा. सी. मर्ढेकर आणि इंदिरा संत यांच्या कविता सादर करत रसिकांना उल्हसित केलं आणि यावर कळस चढवला.

साहित्यिक कट्ट्यावर मराठीचा जागर

कमला नेहरू उद्यानामध्ये आयोजित केलेल्या साहित्यिक कट्ट्यावर मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा केला. महापालिकेच्या मराठी भाषा संवर्धन समितीतर्फे विविध साहित्यिकांच्या उपस्थितीत प्रश्नमंजुषेचा कार्यक्रम झाला. या वेळी लेखिका मंगला गोडबोले, श्याम भुर्के, संजय भगत, गीता भुर्के, नगरसेविका माधुरी सहस्त्रबुद्धे आदी उपस्थित होते.

संजय भगत यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरूवातीला गीता भुर्के यांनी 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' हे गीत सादर केले. अलका घळसासी यांनी अभार मानले.

कविसंमेलनात हास्यरंगाची उधळण
अभिनेते सचिन पिळगावकर यांना प्रकाश ढेरे स्मृती जीवन कलागौरव पुरस्कार

'कितीही चकाकली तरी कल्हईची चांदी होत नाही आणि चरख्या शेजारी फोटो काढला म्हणून कुणी गांधी होत नाही,' अशा वात्रटिकांसह खळखळून हसविणाऱ्या आणि गंभीर आशय व्यक्त करीत अंतर्मुख करणाऱ्या कवितांच्या सादरीकरणाने कविसंमेलन रंगले. 'नोटा बदलल्या तरी पोटातला खड्डा अजून तसाच आहे, नोटांचा रंग बदलला तरी गरिबीचा रंग अजून तसाच आहे', 'तुम्ही नोटा थोड्याच बंद केल्या? काही दिवसांसाठी का होईना शेतकऱ्यांच्या जगण्याच्या वाटाच बंद केल्या' अशा नोटाबंदीच्या कवितांनी या मैफलीत वास्तवाचे रंग भरले गेले आणि 'जे न देखे रवी, ते देखे कवी' याची प्रचिती काव्यप्रेमींना आली.

प्रकाश ढेरे चॅरिटेबल ट्रस्ट आणि गंगा लॉज मित्र मंडळ यांच्यातर्फे

यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रसिद्ध अभिनेते सचिन पिळगावकर यांना प्रकाश ढेरे स्मृती जीवन कलागौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. वीरधवल परब, साहेबराव ठाणगे आणि डी. के. शेख यांना यशवंतराव चव्हाण स्मृती काव्यपुरस्कार प्रदान करण्यात आला. महापौर प्रशांत जगताप, आमदार जयदेव गायकवाड, ज्येष्ठ अभिनेते श्रीकांत मोघे, राष्ट्रवादीचे गटनेता चेतन तुपे, विजय ढेरे, संजय ढेरे या वेळी उपस्थित होते. त्यानंतरच्या कविसंमेलनाचे सूत्रसंचालन रामदास फुटाणे यांनी केले. सचिन परब, ठाणगे, शेख यांच्यासह सुरेश शिंदे, अरुण म्हात्रे, संदीप खरे, प्रशांत मोरे, संदीप जगताप, प्रशांत केंदळे, विजय चोरमारे, प्रकाश घोडके, तुकाराम धांडे, भरत दौंडकर, नारायण पुरी, अनिल दीक्षित, अशोक थोरात, आबेद शेब, नितीन देशमुख, हर्षदा सौरभ, बालिका बिटले यांनी काव्यरचना सादर केल्या. वाक्यागणिक हसविणाऱ्या, टाळ्या आणि शिट्ट्यांची उत्स्फूर्त दाद घेत रात्री एकपर्यंत कविसंमेलन रंगले. महाराष्ट्राने साथ दिली. त्या बळावरच यश संपादन करू शकलो, असे सांगून सचिन म्हणाले, 'माझे राजकाराणातील ज्ञान शून्य आहे. ज्या क्षेत्रात मी आहे, त्याचेचे ज्ञान मला नाही, तर राजकारणाचे कुठून येणार? केवळ चॉकलेट हिरोच्या भूमिका का मिळतात, याचा आधी मला राग यायचा; पण प्रेक्षक खूश झाले पाहिजेत ही भूमिका ठेवून काम करीत राहिलो. 'कट्यार काळजात घुसली'मध्ये पहिल्यादांच म्हाताऱ्याची आणि तीही काही प्रमाणात खलनायकाची भूमिका बजावताना आनंद वाटला.' 'उरात होतंय धडधड बंदी नोटांवर आली, हजार-पाचशे बदलून घ्या मोदींची आज्ञा झाली, अधीर झालोया आता बधिर झालोया, ब्लॅक मनी हा व्हाइट करता करता जेरीस आलोया, उडतोय बुंगाट पळतोय चिंगाट, आंगलट आलंया, झालंय झिंग झिंग झिंगाट' या अनिल दीक्षित यांच्या कवितेवर टाळ्यांचा ताल धरला गेला. 'अगदी कपडे वाळत घालण्यातही दडलेलं असतं बाईचं व्यवस्थापन' या कवितेतून स्त्रीची भावावस्था कथन केली गेली.

✍ राज्यातील प्रकाशकांना फटका
द्विभाषिक योजनेतील बदलामुळे राज्याबाहेरील प्रकाशकांची चांदी कोर्टात जाण्यास पुरेसा वेळ नाही

द्विभाषिक योजनेत पुस्तकांच्या पुनर्मूल्यांकनाच्या विरोधात न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय प्रकाशक संघाच्या बैठकीत घेण्यात आला; मात्र

न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून सरकार विरोधात खटला चालवायला तीन आठवड्यांचा कालावधी लागत असल्याने तोपर्यंत योजना संपणार आहे. त्यामुळे आता न्यायालयात याविषयी दाद मागावी का, असा पेच प्रकाशकांसमोर उभा राहिला आहे. द्विभाषिक योजनेतील पुस्तकांचे पुनर्मूल्यांकन करून नव्याने योजना आणण्याचा प्रयत्न राज्याच्या शिक्षण विभागाने केला आहे; परंतु त्याचा सर्वाधिक फटका मराठी प्रकाशकांना बसला आहे; मात्र राज्याबाहेरील प्रकाशकांची या योजनेत चांदी झाल्याचे चित्र आहे. नेमक्या कोणत्या निकषांवर पुस्तकांचे पुनर्मूल्यांकन केले, यावरून मराठी प्रकाशक संतप्त झाले आहेत.

द्विभाषिक योजना नव्या स्वरूपात आणल्यानंतर राज्याच्या शिक्षण विभागाने केवळ ६० टक्के गुण मिळालेल्या पुस्तकांचीच खरेदी करा, अशा सूचना जिल्हास्तरावरील सर्व शाळांना दिल्या आहेत. शिवाय सहावी ते आठवीसाठी 'भारत पढे, भारत बढे' या उपक्रमाअंतर्गत शाळांना देण्यात आलेली ग्रँट काढून घेण्यात आल्याने शाळांना मिळालेल्या निधीतून ही पुस्तके खरेदी करता येणार नाहीत. त्यांना स्वखर्चाने ही पुस्तके खेदी करणे अनिवार्य राहणार आहे.

राज्याच्या बाहेरील प्रकाशकांची सर्वाधिक पुस्तके ही इयत्ता पहिली ते दुसरी आणि तिसरी ते पाचवी या वर्गवारीमध्ये आहेत. पहिली ते दुसरीमध्ये वर्गवारी करण्यात आलेल्या ९० पुस्तकांपैकी फक्त ११ पुस्तके मराठी प्रकाशकांची निवडण्यात आली आहेत. तर तिसरी ते पाचवीसाठी असलेल्या १२३ पुस्तकांपैकी केवळ ३७ पुस्तके मराठी प्रकाशकांची आहेत. इयत्ता सहावी ते आठवीमध्ये मात्र सर्वाधिक पुस्तके मराठी प्रकाशकांची आहेत; परंतु त्या पुस्तकांसाठी ग्रँट नाही. एकीकडे शिक्षण विभागाने सहावी ते आठवीची ग्रँट काढली आणि दुसरीकडे पहिली ते दुसरीच्या पुस्तकांसाठी ग्रँट वाढवण्यात आली आहे. त्यामुळे राज्याबाहेरील प्रकाशकांची पुस्तके मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाणार असून, मराठी प्रकाशकांना त्याचा फटका बसणार आहे. राज्याच्या बाहेरील प्रकाशकांना फायदा व्हावा, यासाठी शिक्षण विभागाचे प्रधान सचिव नंदकुमार यांनी ही पुनर्मूल्यांकनाची पद्धत अमलात आणली असल्याचा आरोप प्रकाशकांनी केला आहे.

दरम्यान, या संदर्भात द्विभाषिक योजनेतील प्रकाशकांची बैठक पार पडली. त्यामध्ये पुनर्मूल्यांकन समितीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. पुनर्मूल्यांकनासाठी नेमकी किती जणांची समिती होती, ज्या समितीने

योजनेसाठी पुस्तकांची निवड केली, त्या समितीमधील व्यक्तींनीच पुनर्मूल्यांकन केले का, असा प्रश्न प्रकाशकांनी उपस्थित केला आहे. द्विभाषिक योजनेत पादर्शकता आणण्याच्या नावाखाली शिक्षण सचिवांनी मराठी प्रकाशकांचे नुकसान केले असून, काही प्रकाशकांची सर्व पुस्तके रद्दबातल ठरवण्यात आली आहेत. तर काही पुस्तकांना ६०पेक्षा कमी गुण देऊन डावलण्यात आले आहे. योजनेतून आठ पुस्तके पूर्णपणे रद्दबातल केली आहेत. एकंदरीतच ही योजना राज्याच्या बाहेरील प्रकाशकांना खूष करण्याचा प्रयत्न असल्याचे सांगत प्रकाशकांनी संतप्त प्रतिक्रिया दिल्या आहेत.

✍ संतसाहित्याच्या अभ्यासातूनच मराठी भाषा वाढेल : देगलूरकर

संतांनी मराठी भाषेला साहित्य, तत्त्वज्ञान, सामाजिक संघटनाचा मूलमंत्र दिला. जोपर्यंत संतसाहित्याचा अभ्यास होत राहील तोपर्यंत मराठी भाषा केवळ टिकणार नाही तर ती वाढेल, असे मत मूर्तिशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी व्यक्त केले.

उत्कर्ष प्रकाशनतर्फे वा. ल. मंजूळ यांच्या 'श्री क्षेत्र पंढरपुरातील मठ, फड आणि दिंड्यांचा इतिहास' या पुस्तकाचे प्रकाशन संतसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते आणि 'कथा पांडुरंगाच्या' या पुस्तकाचे प्रकाशन प्रसिद्ध कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांच्या हस्ते झाले. त्या प्रसंगी देगलूरकर बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी आणि प्रकाशक सु. वा. जोशी या वेळी उपस्थित होते. डॉ. देगलूरकर म्हणाले, 'महाराष्ट्राच्या संस्कृतीमध्ये वारकारी संप्रदायाचे माठे योगदान आहे. सर्व समाजाला जोडून घेण्याचे श्रेय वारकरी संप्रदायाला द्यावे लागेल. वारकरी हे एका अर्थाने फडातील आणि दिंडीतील कार्यकर्तेच असतात.' डॉ. सदानंद मोरे म्हणाले, 'मंजूळ यांच्या पुस्तकांनी महाराष्ट्राच्या अभ्यास क्षेत्रात मोलाची भर घातली आहे. विठ्ठल या दैवताचा अभ्यास अनेकांनी केला. हा अभ्यास करू तेवढा थोडाच आहे. जणू विठ्ठल ही महाराष्ट्राची एक विद्या शाखाच झाली आहे.'

अरुणा ढेरे म्हणाल्या, 'पंढरपूर हे देवस्थान आणि विठ्ठल हे दैवत यांना परस्परांपासून वेगळे करताच येत नाही. धार्मिक क्षेत्रातील सांस्कृतिक अनुबंध मंजूळ यांच्या लेखनातून उलगडतो.'

नवं कोरं

फर्ग्युसनच्या १२५ वर्षांच्या प्रदीर्घ
वाटचालीचा अभ्यासपूर्ण मागोवा...

वाटचाल फर्ग्युसनची

(१८८५ - २०१०)



लेखक - **डॉ. वि. मा. बाचल**

संपादन - **डॉ. राजा दीक्षित**

किंमत : ७५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

१८७९ साली डेक्कन कॉलेजच्या वसतिगृहात एकाच खोलीत टिळक-आगरकर राहात असताना ते म्हणतात,
'...आम्ही दोघे त्यावेळी प्रचंड भारलेले होतो. आम्ही निकृष्ट देशस्थितीच्या विचारांनी भणाणलेल्या डोक्याची माणसे होतो आणि पुष्कळ विचारांनंतर शिक्षणातच आपला उद्धार आहे, असे आमचे मत बनले होते...' फर्ग्युसन कॉलेज म्हणजे शिक्षणक्षेत्रातील वैचारिक उदारमतवाद, स्वार्थत्याग, जिद्द यांची सांगड घालण्याचा अभिनव प्रयोग आहे. या प्रयोगातील वैचारिक मतभेद, शासनाशी संघर्ष, आर्थिक-प्रशासकीय आव्हाने, संस्थेची प्रतिष्ठा जपण्यासाठी केलेली धडपड, शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी शिक्षकांचे योगदान, विविध क्षेत्रांत लौकिक संपादणाऱ्या कष्टाळू विद्यार्थ्यांचे प्रयत्न व त्यांचे संस्थेविषयीचे प्रेम, त्याचा आविष्कार - अर्थकारण, राजकारण, समाजकारण, साहित्य आणि कला इत्यादी क्षेत्रांतील भरारी, जनमताने दिलेली सततची साथ यांचा आढावा घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे.
या पुस्तकाची मांडणी तीन भागांमध्ये केली आहे : स्थापना ते सुवर्णमहोत्सव (१८८५-१९३५), सुवर्णमहोत्सव ते शताब्दी (१९३५-१९८५), शताब्दी ते शतकोत्तर रौप्यमहोत्सव (१९८५-२०१०) ही मांडणी केली आहे.

मिलिंद जोशी म्हणाले, 'आत्मिक उन्नतीचे केंद्र असलेले मठ हे अर्थसत्ता आणि राज्यसत्तेच्या प्रभावामुळे धार्मिक सत्ताकेंद्र झाले आहेत. तीर्थक्षेत्रे ही श्रीमंतांच्या पापक्षालनाची स्थळे झाली आहेत. या गोष्टींचा गांभीर्याने विचार केला पाहिजे.' मंजूळ यांनी प्रास्ताविकामध्ये लेखनामागची भूमिका स्पष्ट केली. सु. वा. जोशी यांनी स्वागत केले. जयराम देसाई यांनी आभार मानले.

✍ नाट्य संमेलनाध्यक्ष 'शो केस'मधील वस्तू : जयंत सावरकर नाट्य परिषदेतर्फे विशेष सत्कार

''नाट्य संमेलनाध्यक्षाला कुठलाही अधिकार नाही, असे आजवरचे अध्यक्ष ओरडून ओरडून सांगत होते; पण अजूनही कुठला अधिकार मिळाला नाही. त्यामुळे नाट्य संमेलनाध्यक्ष या नात्याने मी 'हे करीन', 'ते करीन' असे कधीच म्हणणार नाही. नाट्य संमेलनाध्यक्ष म्हणजे मुख्यमंत्री किंवा पंतप्रधान नव्हे; हे पद केवळ 'शो केस'मधल्या शोभेच्या वस्तूंसारखे आहे,'' अशी खंत नियोजित नाट्य संमेलनाध्यक्ष जयंत सावरकर यांनी व्यक्त केली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या (पुणे शाखा) वतीने आयोजित दोन मिनिटांच्या नाटिका महोत्सवात सावरकर यांचा विशेष सत्कार व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी परिषदेचे अध्यक्ष सुरेश देशमुख, उपाध्यक्ष अविनाश देशमुख, प्रमुख कार्यवाह दीपक रेगे, कोशाध्यक्ष मेघराज राजेभोसले, कार्यवाह निकिता मोघे, 'महाराष्ट्र कल्चरल सेंटर'च्या शुभांगी दामले आदी मान्यवर उपस्थित होते. सावरकर म्हणाले, 'कलाकारांसाठी घर, त्यांचे मानधन, नाट्यगृहाची स्थिती अशा नाट्य व्यवसायासमोर अनेक अडचणी आहेत. त्या सोडवण्याचा अधिकार मला नाही; पण त्या अडचणी मुळापासून मांडण्याचा अधिकार आहे. त्यामुळे अध्यक्षीय भाषणात स्पष्टपणे बोलणार आहे. कदाचित भाषण स्फोटकही होऊ शकेल; पण प्रश्नांना वाचा फोडणारे असेल.''

तेंडुलकर म्हणाले, ''नाट्य संमेलनाध्यक्षाची अगतिकता सावरकर यांनी व्यक्त केली; पण ते स्पष्टपणे बोलणार आहेत, हे अधिक महत्त्वाचे आहे. कारण स्पष्टपणे बोलणारेसुद्धा हल्ली पाहायला मिळत नाहीत.'' मकरंद टिल्लू यांनी सूत्रसंचालन केले.

पदाधिकाऱ्यांना चिमटा

नाट्य परिषदेच्या पुणे शाखेचे काम ठप्प झाले आहे, अशी चर्चा गेले

काही महिने सुरू होती. या पार्श्वभूमीवर, 'नाट्य परिषद कधी कधीच चांगले कार्यक्रम आयोजित करते,' अशा शब्दांत तेंडुलकर यांनी परिषदेच्या पदाधिकाऱ्यांना चिमटा काढला. त्यामुळे सभागृहात हास्याची कारंजी उडाली. सावरकरांचा सत्कार सोहळा आणि दोन मिनिटांच्या नाटिका पाहण्यासाठी या वेळी सभागृह तुडुंब भरले होते.

✍ संगीत नाट्यभूमीला पुन्हा ऊर्जितावस्था आणणार! सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांचा निर्धार

संगीत नाटक ऊर्जितावस्थेत आणण्यासाठी काळानुरूप बदल करण्याची गरज आहे. रसिकांनी आता वेगळ्या प्रकारची संगीत नाटके स्वीकारण्याची आवश्यकता आहे. संगीत नाट्यभूमीला पूर्वीसारखे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी जे बदल करावे लागतील त्यासाठी राज्य सरकार खंबीरपणे त्यांच्या पाठीशी आहे व त्यांना सर्वातोपरी मदत करेल. तसेच संगीत रंगभूमी आणि नाट्य रंगभूमीला जे सहकार्य हवे आहे ते देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे आश्वासन सांस्कृतिक कार्य मंत्री विनोद तावडे यांनी दिले. राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे २०१६-१७चा संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी पुरस्कार व नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. एसएनडीटी महिला विद्यापीठातील पाटकर सभागृहात झालेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ रंगकर्मी रामदास कामत यांच्या हस्ते संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी पुरस्कार चंद्रकांत ऊर्फ चंदू डेगवेकर यांना देण्यात आला. तसेच नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार लीलाधर कांबळी यांना नाट्यसंमेलनाध्यक्ष गंगाराम गवाणकर यांनी प्रदान केला.

राज्य सरकारच्या वतीने सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने दरवर्षी अनेक पुरस्कार देण्यात येतात. हे पुरस्कार देताना त्या त्या कलाकाराचे योगदान लक्षात घेतले जाते. कलाकाराच्या गुणवत्तेचा आणि कलेचा निकष लक्षात घेऊनच पुरस्कारार्थीची निवड करण्यात येते.

गेल्या ३५ वर्षांच्या काळात आपण जी मराठी रंगभूमीची सेवा केली त्या कलेचे चीज झाल्याची भावना पुरस्कारार्थी लीलाधर कांबळी यांनी व्यक्त केली.

तर अनेक जुन्या-नव्या दिग्दर्शकांकडून माझ्यावर संस्कार झाले, म्हणूनच आपण आपला प्रवास इथपर्यंत करू शकलो, असे मनोगत रंगकर्मी चंद्रकांत डेगवेकर यांनी व्यक्त केले.

✍ भाषेच्या प्रेमाशिवाय कविता स्फुरत नाही : ढेरे

'कविता हे अनोखे विश्व आहे. कवितेच्या जगात अनेक गमती-जमती असतात. काव्यात जसे सौंदर्य असते, तसे या विश्वात स्वैरपणे फिरताना अनेक अडचणींचा सामनादेखील करावा लागतो. अशावेळी भाषेची सोबत असणे आवश्यक आहे. भाषेच्या प्रेमात पडल्याशिवाय कविता स्फुरत नाही,' असे मत ज्येष्ठ कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे आयोजित 'मसाप गप्पा'मध्ये ढेरे यांच्या षट्यब्दीनिमित्त साहित्यिक द. मा. मिरासदार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. नीलिमा बोरवणकर यांनी ढेरे यांच्याशी संवाद साधला. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी, कार्यवाह प्रकाश पायगुडे उपस्थित होते.

ढेरे म्हणाल्या, 'दर्जेदार साहित्यनिर्मिती ही एक महान कला आहे. केवळ जाज्वल्य भाषा नसते, तर वर्तमानाला समजून घेऊन, त्यावर आधारित काळाच्या पलीकडचे भाष्य करणारे साहित्य असले पाहिजे. संतांचे साहित्य असो किंवा बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या विचारवंतांचे असो, त्या साहित्यात काळाच्या मर्यादा ओलांडून आधुनिकतेचे अतिशय समर्पक वर्णन केलेले आढळते. येणाऱ्या काळातही अशाच साहित्याची निर्मिती झाली पाहिजे.'

आपल्या लहानपणीची आठवण सांगताना ढेरे म्हणाल्या, 'वडिलांसोबत पुण्यातील अनेक ठिकाणांना मी भेट देत असे. त्या वेळी ते आवर्जून एखाद्या जागेचे सांस्कृतिक, ऐतिहासिक महत्त्व सांगत. त्यांच्या याच सवयीमुळे माणूस म्हणून घडले. मला मनापासून वाटते, मुलांना चांगला माणूस म्हणून घडविण्यासाठी वेगळे काही करण्यापेक्षा त्यांच्यासोबत जास्तीत जास्त वेळ घालविणे आवश्यक आहे.'

❖

नवं कोरं

बाजिंद

लेखक - **पै. गणेश मानुगडे**



किंमत : १८०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

'बाजिंद' ही एक ऐतिहासिक रहस्यकथा आहे. धनगरवाडीचा कारभारी सखाराम आपल्या तीन सहकाऱ्यांसह एक फिर्याद घेऊन शिवाजी महाराजांकडे रायगडावर जायला निघतो. रस्त्यात गुप्तहेर बहिर्जी नाईकांचा चेला असलेल्या खंडोजीशी नाट्यमयरीत्या झालेली त्यांची भेट, या चौघांना रायगडावर प्रवेश मिळवून द्यायचं त्यानं दिलेलं आश्वासन, खंडोजी आणि सावित्रीची प्रेमकथा, शिर्के – कदंब वैर, बहिर्जी नाईकांनी शिर्क्यांवर केलेला हल्ला, तसेच बाजी आणि मुघल सरदार हुसेनखानची कथा, बाजीला अवगत असलेली पशू-पक्ष्यांची भाषा, मृत्युसमयी त्याने आपल्या वंशजाला 'बाजिंद'ला त्या भाषेचा दिलेला वारसा, इ. थरारक, धक्कादायक आणि नाट्यमय घटनांनी, वळणांनी ही कादंबरी पुढे सरकत राहते. नाट्यमय वळणं घेत, रहस्यमयतेने शेवटपर्यंत वाचकांची उत्कंठा ताणून धरणारी ही कादंबरी बहिर्जी नाईकांच्या बुद्धिचातुर्याची साक्ष देते आणि शिवरायांचं स्वराज्य हे सुराज्यही होतं, याचंही दर्शन घडवते. युद्धाचा थरार, भावनांची गुंतागुंत आणि प्रखर राष्ट्रप्रेम याचं अद्भुत रसायन म्हणजे 'बाजिंद' ही कादंबरी.

पुरस्कार

✻ डॉ. लवटे यांना राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार

महाराष्ट्र हिंदी साहित्य अकादमीतर्फे दिला जाणारा महाराष्ट्र भारती अखिल भारतीय हिंदी सेवा पुरस्कार २०१५ डॉ. सुनीलकुमार लवटे यांना जाहीर झाला आहे, अशी माहिती अकादमीचे अध्यक्ष डॉ. नंदलाल पाठक यांनी एका पत्रकातून कळवली आहे. डॉ. लवटे यांनी शिवाजी विद्यापीठाचे मानसेवी प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक, वि.स.खांडेकर वस्तुसंग्रहालयाचे मानद संचालक म्हणून कार्य केले आहे. तसेच महावीर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व हिंदी विभागप्रमुख म्हणून काम पाहिले आहे. वि.स.खांडेकर व डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या साहित्याचा त्यांनी हिंदीत अनुवाद केला आहे. अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रम पुनर्रचनेत त्यांचा मोलाचा वाटा आहे. हिंदीत त्यांचे २५ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. राष्ट्रीय जीवन गौरव सन्मान म्हणून प्रदान करण्यात येणारा पुरस्कार डॉ. लवटे यांना जाहीर झाल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. एक लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रशस्तिपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ. लवटे सध्या विश्व हिंदी संमेलन इतिहास, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय हिंदी संग्रहालय निर्मितीत व्यस्त आहेत.

✻ पूनम राणा यांच्या चित्राला राज्य सरकारचे बक्षीस

राज्य सरकारच्या कला संचलनालयाच्या वतीने आयोजित केलेल्या ५७व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनात पुण्यातील युवा चित्रकार पूनम राणा यांच्या चित्राला पारितोषिक मिळाले. उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री रवींद्र वायकर यांच्या हस्ते त्यांना हे पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

मुंबईतील जहाँगीर आर्ट गॅलरीमध्ये कला संचलनालयाच्या वतीने व्यावसायिक गटातील चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. तेथे राणा यांनी

काढलेल्या 'ॲबस्ट्रॅक्शन' प्रकारातील चित्राची निवड पारितोषिकासाठी करण्यात आली. त्यांना राज्यमंत्री वायकर यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. यावेळी पद्मभूषण अकबर पद्मसी, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अप्पर मुख्य सचिव सीताराम कुंटे, कला संचालक राजीव मिश्रा आदी उपस्थित होते. राणा या गणेशपेठेतील आर्ट एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या संचालिका आहेत.

✻ डॉ. साळुंखे, सचिन यांना दमाणी पुरस्कार

दमाणी-पटेल प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा कर्मयोगी पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आ. ह. साळुंखे व चित्रपट अभिनेता-दिग्दर्शक सचिन पिळगावकर यांना देण्यात आला. ५१ हजार रुपये, सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे, अशी माहिती संयोजक बिपीनभाई पटेल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते १४ मार्च रोजी सायंकाळी पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. मराठी साहित्य क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल डॉ. साळुंखे यांचा तर कला क्षेत्रात ५०हून अधिक वर्षे दिलेल्या योगदानाबद्दल पिळगावकर यांचा सन्मान करण्यात आला. डॉ. साळुंखे यांनी मराठी विश्वकोशात धर्मशास्त्र, संस्कृत या विषयात १०० हून अधिक लेख लिहिले आहेत.

✻ समाजरत्न पुरस्कार

जिव्हाळा बहुउद्देशीय संस्थेने लेखक मिलिंद रथकंठीवार यांना वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मानित केले. नाशिक येथे आयोजित कार्यक्रमात उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ डॉ. सोपानराव बुडवाडकर यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. या प्रसंगी बाळासाहेब सानप, आर. एम. पाटील उपस्थित होते.

✻ ना. धों. महानोर आणि सुलोचना महानोर यांना यशवंत-वेणू पुरस्कार

पिंपरीत झालेल्या साहित्य संमेलनासाठी जवळपास २५ कोटी रुपये खर्च झाले असतील, असे सांगून साहित्यिकांसाठी एवढेही करायचे नसते, अशी टिप्पणी ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांनी चिंचवड येथे केली. सध्या वारंवार वापरण्यात येणारा 'पारदर्शकता' हा शब्द गमतीदार वाटतो. ते बोलणे सोपे आहे; मात्र तसा कारभार करणे कठीण आहे, असे मतही त्यांनी मांडले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने महानोर व त्यांच्या पत्नी सुलोचना यांना 'यशवंत-वेणू' गौरव पुरस्काराने गौरवण्यात आले. ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल, डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील आदी उपस्थित होते.

पिंपरीच्या संमेलनात आपण सहभागी झालो होतो, असे सांगून महानोर म्हणाले, 'पाच कोटी खर्च म्हटले तरी आम्ही हादरून जायचो; मात्र पिंपरीच्या साहित्य संमेलनाला २५ कोटी रुपये खर्च झाला असावा. 'जे न देखे रवी, ते देखे कवी' यानुसार, आम्हाला सगळे काही कळते. हा खर्च पाहून साहित्यिक व संमेलने घेणाऱ्यांमध्ये वेगळा चळ निर्माण झाला. अशी संमेलने व्हावीत, असेही काही म्हणू लागले. खर्चाचा मुद्दा सोडा. मात्र, डॉ. पी. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेले संमलेनाचे आयोजन उत्तम नियोजन असलेले होते. यासाठी ते कौतुकास पात्र आहेत. आपल्याला संमेलन अध्यक्षपदापेक्षा रसिकांच्या मनातील अध्यक्षपद महत्त्वाचे वाटते व ते यापूर्वीच मिळालेले आहे. सर्वांच्या ओठी आपल्या कविता असणे, हाच सर्वांत मोठा सन्मान आहे.' यशवंतराव चव्हाण यांच्या विविध आठवणींना उजाळा देतानाच महानोर म्हणाले, 'यशवंतरावांच्या नावाचा पुरस्कार हा घरचा सत्कार आहे. तो स्वीकारताना संकोच आणि आनंद अशा दोन्हीही भावना आहेत. संत तुकाराम महाराजांचा आपण कायम आदर्श मानला. शेतीसारखे दुसरे पवित्र काहीच नाही. कष्ट करण्याची तयारी असल्यास काही अशक्य नाही,' असेही ते म्हणाले.

❖

मनसोक्त वाचा अन् पोटभर हसा!

द. मा. मिरासदार यांच्या ९०व्या जन्मदिनानिमित्त
त्यांच्या 23 पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - २८४५/-

सवलत किंमत
१६९९/-

१४ एप्रिल ते ३० मेपर्यंत

1st Edition

A Memoir

Living Dreams

Exhilarating Journey, Destination Unknown

Dan Mayur



Price : Rs. 495/-
Postage : Rs. 50/-

In this entertaining and informative memoir Dan traces a fascinating life story from his humble beginnings in rural India to his ascent into corporate leadership in America. This is a book about the struggles of a young man in the pursuit of excellence in life with all its glorious unpredictability of setbacks and victories. Dan proposes that Learning, Laughing and Loving are necessary and sufficient for happy living and he brings out his wealth of "Lessons of a Lifetime" in his trademark lucid language creating vivid imagery in the reader's mind. He does this with philosophic undertones using sensitivity, wit and humor. As a road-map for a successful life, this book will appeal to a wide audience of teachers, students, travelers and above all, to people with curiosity and zest for life.

स्मृतिगंध

रणजित देसाई यांचे कादंबरीविश्व

– डॉ. द. ता. भोसले

(विशाखा, एप्रिल १९८८मधून साभार)

माणसाला पूर्णत्व देणाऱ्या संस्कारांची कधीही न संपणारी संपत्ती– श्रीमंती दो दो हातांनी रसिकांना देण्याची क्षमता जोपर्यंत त्यांच्या कादंबऱ्यांत आहे, ओतप्रोत भरलेली आहे, तोपर्यंत वाङ्मयाच्या क्षेत्रात कोणतेही वाद उत्पन्न झालेले असोत – कोणताही संप्रदाय अधिराज्य गाजविणारा असो– त्यामुळे निष्प्रभ होणारी रणजित देसाई यांची कादंबरी असणार नाही. त्या क्षणीही ती याच प्रकारे रसिकांना वेड लावेल असे वाटते.

आजच्या मराठी साहित्यातील रणजित देसाई हे एक अनेक दृष्टीने महत्त्वाचे नाव. ज्या लेखकांना राजमान्यता, लोकमान्यता आणि रसिकमान्यता प्राप्त झालेली आहे, त्यात त्यांच्या नावाचा समावेश आवर्जून करायला हवा. मराठी साहित्यात गेल्या वीस-पंचवीस वर्षांत अनेक वाङ्मयीन प्रवृत्ती निर्माण झाल्या. नजरेत भरतील असे काही वाङ्मयीन प्रयोग झाले. काही नवे प्रवाह निर्माण झाले. पाश्चात्त्य साहित्याच्या अनुशीलतेतून वेगवेगळ्या वादांना परिपुष्ट करणाऱ्या काही लोकविलक्षण अशा कलाकृती निर्माण झाल्या. त्या कलाकृतींनी मराठी वाचकांना काही काळ मोहित केले, प्रभावित केले. त्यामुळे लोकप्रियतेचा तराजू कधी कधी वर-खाली झाला. एखाद्या विशिष्ट प्रवृत्तीचे लेखन आणि तिचा लेखक एकाएकी लोकप्रिय झाला. काही काळ त्या लेखनाला भरती आली. त्यामुळे

मान्यताप्राप्त व दर्जेदार लेखन करणारे लेखक जरा भरतीच्या लाटेखाली दबल्यासारखे झाले; पण कोणत्याही प्रयोगाची लाट असो वा प्रवृत्तीची भरती असो; अभिरुचीने घेतलेली नवी वळणे असोत, प्रत्येक लाटेवर आरूढहोऊन आपले स्थान तितकेच भक्कम करणारे जे काही मोजके मराठी लेखक आपणाला सांगता येतील, त्यात रणजित देसाई यांचा आवर्जून उल्लेख आपणाला करावा लागेल. साहित्याच्या क्षेत्रातील त्यांचे स्थिरपद अजून तरी अस्थिर झालेले नाही. मराठी साहित्याचा वाचकवर्ग बदलला, त्याचे परिक्षेत्र बदलत आहे, त्यांची अभिरुची मंदपणे बदलते आहे. भल्या-बुऱ्या कलाप्रयोगांची प्रत्यही भाऊगर्दी उसळते आहे; पण देसायांच्या लेखनाला मराठी रसिकवृत्तीने जे प्रेमालिंगन दिलेले आहे, जे स्थान बहाल केलेले आहे, त्यात आजही फारसा फरक पडलेला दिसत नाही. मराठी साहित्याचा सामान्य वाचक असो, अभिजन असो वा ग्रामीण क्षेत्रातला वाचक असो, त्यांच्या साहित्याची त्याला वाटणारी गोडी अजून तरी कमी झालेली नसावी, असे त्यांच्या साहित्यकृतींच्या भरघोस खपावरून म्हणता यावे.

देसाई यांनी वाङ्मयाच्या अनेक क्षेत्रांत भरीव अशी निर्मिती केलेली असली तरी आज मराठी वाचकांमध्ये त्यांना ओळखले जाते ते मुख्यत: कादंबरीकार म्हणूनच. त्यांनी कथा, नाटक अथवा इतर प्रकारांत जितके सातत्य दाखवले आहे, तितके किंबहुना त्यापेक्षा अधिक कादंबरी लेखनात ते दाखवलेले आहे. 'बारी' कादंबरीपासून सुरू झालेले कादंबरीलेखन 'अभोगी' कादंबरीपर्यंत येऊन थांबले. त्यात ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक आणि चरितकहाणी यासारखे उपविभाग असले तरी कादंबरीच्या लेखनाचे सातत्य कमी झालेले नाही आणि त्यांच्या कादंबऱ्या जितक्या वाचकप्रिय आणि सन्मानित झाल्या तितक्या अन्य कलाकृती झाल्या नाहीत, असे म्हटले तर त्यांच्या अन्य साहित्याचा अधिक्षेप केला, असे मानण्याचे कारण नाही. म्हणून त्यांच्या साहित्यसृष्टीतील फक्त कादंबऱ्यांचाच परिचय आणि परामर्श या लेखात घेण्याचे ठरविले आहे.

२

देसाई यांनी 'बारी'कादंबरीच्या रूपाने कादंबरी क्षेत्रात पहिले पाऊल टाकले. 'बारी' ही त्यांची पहिलीच कादंबरी असली तरी अनेक दृष्टीने वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. ती तशी सामाजिक असली तरी त्या वेळच्या 'सामाजिक'कादंबऱ्यांत सामावणारी कादंबरी नाही. ती ग्रामीण जीवनाचा आविष्कार करणारी ग्रामीण वा प्रादेशिक या संकल्पनेत पूर्णत: बसेल असे वाटत नाही. ती बेरड जीवनाचा आविष्कार करणारी कदाचित पहिली मराठी

कादंबरी असावी. बेळगावच्या जवळ असलेल्या सुतगट्टी गावाजवळ जे घनदाट जंगल आहे, त्या जंगलात राहणाऱ्या बेरड जमातीच्या समूह जीवनाची ही कहाणी आहे. घनदाट जंगलाचा आधार घेऊन वाटमाऱ्या करणाऱ्या आणि नैसर्गिक साधनसामग्रीवर आपली उपजीविका करणाऱ्या बेरडांच्या पारंपरिक जीवनाला बदलत्या जीवनाचा कसा तिढा पडतो, याचे चित्रण मोठ्या कलात्मकतेने नि ताटस्थ्याने येथे रेखाटले आहे. सन १९६० पूर्वी मराठीत ग्रामीण परिसराचे जे सांकेतिक व एकांगी चित्रण होत होते, त्याला वेगळे वळण देणारी ही कहाणी आहे. 'बनगरवाडी' कादंबरीप्रमाणे या कादंबरीतही निसर्ग, व्यक्ती, संस्कृती आणि परिस्थिती यांच्यातील परस्पर नात्यांचा तसेच ताणतणावांचा परामर्श लेखकाने घेतलेला आहे.

बेरडवाडीचा 'तेग्या' हा या कादंबरीचा नायक. वाटमारी करणाऱ्या बेरडांचा म्होरक्या. त्याच्या तरुणपणापासून ते म्हातारपणापर्यंतचा जीवनपट या कादंबरीत चित्रित केलेला आहे. त्या किमतीला दागिने विकणे, त्याबरोबरच जंगलातील साधनसामग्रीवर आणि नदी-ओढ्यातील मासे पकडून गुजराण करणे हा त्यांचा उद्योग; पण त्यातही त्यांची एक नीती असते. दिलेला शब्द प्राण गेला तरी न मोडणे. ज्याचे अन्न आपल्या मुखात गेले आहे, त्याला जीव धोक्यात घालून मदत करणे हे त्यांचे ब्रीद असते. आपल्या जातभाईंना दैनंदिन जीवनात मदत करीत सामूहिक जीवनाची प्रथा राबविणे ही या जमातीची वैशिष्ट्ये या कादंबरीत साकार झालेली आहेत; पण बदलत्या परिस्थितीत, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या जमातीला जगता येत नाही. जुळवून घेता येत नाही. नव्या सुधारणांनी खेड्यांत होणारे बदल, यंत्रयुगाकडे वेगाने धावणारा काळ, बदलते राजकारण, ग्रामीण लोकांच्या अभ्युदयासाठी राबविले जाणारे कार्यक्रम, गांधीवादी विचारसरणीने सेवाकार्य करणाऱ्या गांधीभक्तांच्या ग्रामसुधारणेच्या कल्पना. जंगलसंपत्तीची निर्दयपणे होणारी नासधूस या सर्व गोष्टींचा अनिष्ट परिणाम आजच्या ग्रामीण जीवनावर होतो आहे. विशेषत: जातीजमातींवर होतो आहे. त्यामुळे बेरडासारखी ही जमात जगण्याला अपात्र ठरली आहे, याचा आविष्कार कादंबरीत झालेला आहे. एखाद्या वाघासारखे जीवन जगलेल्या 'तेग्या'चा मुलगा ईश्वरा जेव्हा वनरक्षकाची-शिपायाची नोकरी स्वीकारतो आणि गांधीवादाची यथाशक्ती दीक्षा घेतो तेव्हा या जमातीची दिशाहीन अवस्था आपणाला अधिक जाणवते. एका ईश्वराला नोकरी मिळाली तरी जंगलाच्या आश्रयाने जीवन जगणाऱ्या हजारो ईश्वरांना ती मिळत नाही, अन् दुसरे साधन मिळाले तरी त्यांना ते रुचत नाही. त्यामुळे त्यांची झालेली शोकांतिका कादंबरीच्या अखेरीला चित्रित केलेली आहे. संक्रमणातून निर्माण झालेल्या संकराचा स्पर्श या

जंगलजमातींना होतो व जगण्याच्या नव्या समस्येला या बेरडांना सामोरे जावे लागते, हे देसाई यांनी मन:पूर्वक चित्रित केलेले आहे.

'बारी' कादंबरीत सूचित केलेली समस्या ही सर्व भूमिपुत्रांची आणि आदिवासींची समस्या आहे. या समस्येवर भर देण्यापेक्षा देसायांनी बेरडांच्या जीवनाचे चित्रमय वर्णन करण्यावर भर दिलेला आहे. नाट्यमय प्रसंगांची जाणीवपूर्वक निवड करून, त्यांच्यातील वैरभावाचा आधार घेऊन, बेरडांच्या जीवनातील भूक, उपासमार आणि दारिद्र्य यांतून उत्पन्न होणाऱ्या दु:खाला अधिक मुखर करीत ही कहाणी लेखकाने पुरी केलेली आहे. विविध प्रसंगांनी पीळदार बनलेले जबरदस्त विविध रूपांचे देखणे चित्रण, ग्रामीण आणि नागर जीवनाच्या भिन्न धारणांतून साकारणारे नाट्य, अर्थपूर्ण आणि खटकेबाज संवाद या गुणांनी ही कादंबरी प्रभावित झालेली आहे. एका उपेक्षित जगाचा परिचय करून देण्याचा कलात्मक प्रयत्न या दृष्टीने ही कादंबरी लक्षणीय म्हणता येईल.

स्वातंत्र्यपूर्व काळातल्या बेरड जमातीतल्या मुक्त अन् तृप्त अशा चिमुकल्या जगातली स्वातंत्र्यानंतरची स्थित्यंतरे 'बारी'मध्ये जशी लेखकाने चित्रित केली आहेत, तशीच ती ग्रामीण जीवनातलीही चित्रित केली आहेत. ग्रामीण जीवनाचा आविष्कार करणाऱ्या त्यांच्या कादंबऱ्या म्हणजे 'माझा गाव', 'कातळ' आणि 'समिधा' या होत. 'माझा गाव' मध्ये गावावर पुत्रवत प्रेम करणाऱ्या, करारी, उदार आणि खानदानी जीवनाचा-रीतीरिवाजाचा अभिमान बाळगणाऱ्या एका श्रीमंत आणि न्यायी वतनदाराचा परिचय करून दिलेला आहे. आप्पासाहेब त्यांचे नाव. सदाचाराने वागणारा, गावावर जबरदस्त वचक असलेला, स्वत:च्या प्रतिष्ठेला जपणारा, नादान, नालायक पोराला शासन करण्यास धजावणारा; पण सुनेकडे पाहून त्याला एका खुनातून वाचविण्यासाठी धडपडणारा असा हा अप्पासाहेब येथे चित्रित केलेला आहे. तात्या हे असेच दुसरे पात्र लेखकाने चित्रित केले आहे. वृत्तीने आप्पासाहेबांसारखे. मदतीला धावणारे, स्वत:च्या गरिबीकडे दुर्लक्ष करणारे, आप्पासाहेबांना मनापासून साथ-सोबत करणारे, प्रसंगी प्राण धोक्यात घालून सहकार्य करणारे, वर्णाने ब्राह्मण असले तरी ब्राह्मण्याचा गर्व न करता गोरगरिबांना मोफत औषधपाणी करणारे, सतत न्यायाची बाजू घेणारे, साऱ्या गावकऱ्यांच्या आदरास पात्र असणारे असे हे पात्र आहे. याच मुशीतून काढल्यासारखी आप्पासाहेबांची सून उमा– रावबाची पत्नी साकार केलेली आहे. त्याग, सेवा, प्रेम, वात्सल्य, सोशिकता या गुणांबरोबरच धाकल्या दिराला पोटच्या पोरापेक्षाही अधिक वात्सल्याने वाढविणारी अशी दाखविली

आहे. आपल्या पतीच्या स्त्रैण व बाहेरख्याली वागण्याची सल मनात ठेवू जगणारी अशी उमा आहे. अन् मग या साऱ्यांच्या वागणुकीला उजाळा देण्यासाठी गैरकृत्य करणाऱ्या रावबाच्या व्यक्तिरेखेचा वापर येथे झालेला आहे. यामधूनच ग्रामीण जीवनातले– नानाविध रंग, प्रसंग, ताणतणाव, समज-गैरसमज, सुख-दुःखे, प्रेम-वैर इ. भाव या कादंबरीत चित्रित केलेले आहेत. जुन्या काळातला गावावर स्वामित्व गाजविणारा, खानदानाला जपणारा, दुष्काळात वाड्यातली धान्याची पोती गोरगरिबांना मुक्तहस्ते वाटणारा बाप एकीकडे अन् रंगेलपणाने वागणारा मुलगा दुसरीकडे यामधील संघर्ष या कादंबरीत चित्रित झालेला आहे.

'माझा गाव' कादंबरीत जुन्या काळातले ग्रामीण जीवन चित्रित झाले आहे. त्याचे स्वरूप सांकेतिक असले तरी जीवनदर्शनाच्या दृष्टीने याला टाकाऊ म्हणता यायचे नाही. खेड्यातून आढळणारे वैरभाव, खून-मारामाऱ्या यांसारखे प्रसंगच या कादंबरीत आलेले असले तरी जीवनात निष्ठा व मूल्यांना जपणारी माणसे गावासाठी सेवामय जीवन व्यतीत करीत असतील तर त्यांच्या शब्दाला प्राणांचे मोल प्राप्त होत असते. त्यांच्या रूपानेच माणुसकी जिवंत राहत असते, यासारखा विचार वाचकांच्या मनात उत्पन्न होतो. मनाची श्रीमंती वाढविण्याच्या दृष्टीने ही कादंबरी टाकाऊ म्हणता यायची नाही. जीवनाला उंचावणाऱ्या मूल्यांचा आविष्कार येथे एकेका पात्राच्या माध्यमातून केलेला आहे. त्यामुळे ही पात्रे थोडी फार सांकेतिक वाटली तरी ती लेखकाने मुद्दाम तशी नाटकी उदात्तीकरणासाठी घडविली आहेत असे वाटत नाही. या कादंबरीतले प्रत्येक पात्र जिवंत आहे. स्वाभाविक वाटते आणि ग्रामीण जीवनाच्या रीतीभाती जाणणारे आहे. लेखकाने सण-सोहळ्यांचा; संकेतांचा, ग्रामीण मनावरील संस्कारांचा, गावातल्या वर्णीय आणि वर्गीय स्तरांचा स्वाभाविक आविष्कार केलेला आहे. ग्रामीण जीवनाचा एकांगी आविष्कार करण्याची कोणतीही भूमिका या कादंबरीत लेखकाने घेतलेली नाही. खेड्यातला पाटील आणि कुलकर्णी एकत्र आल्यावर गावाच्या उद्धारासाठी, गोरगरिबांसाठी झटतात- हे घडू शकते– नव्हे मागच्या पिढीत ते घडत होते; याचा परिचय करून देणारी ही एक चांगली कादंबरी आहे, असेच वाचकाला जाणवत राहते.

'समिधा' कादंबरी याच गटात म्हणजे ग्रामीण जीवन साकार करणाऱ्या कादंबऱ्यांच्या गटात समाविष्ट होण्यासारखी आहे. या कादंबरीत ग्रामीण जीवनात नव्याने निर्माण झालेल्या ताणतणावांचे चित्रण आले असले तरी ही कादंबरी प्रामुख्याने दलित जीवनावर आधारलेली आहे. नव्याने राजकारण

२ री आवृत्ती

पत्रकारितेच्या व्यवसायात सर्वस्व
झोकून देणाऱ्या नैना रजपूतची
उत्कंठावर्धक कहाणी

त्रि कोण

लेखक - **विजय नाईक**

किंमत : २५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

नैना ही राजस्थानच्या पोलीस खात्यातील मोहनलाल यांची उच्चशिक्षित कन्या.

अभयच्या प्रेमापायी घरच्यांची पर्वा न करता तिनं दिल्ली गाठली.

संसाराला हातभार लावताना ती पत्रकार झाली खरी, पण तिच्या आयुष्याच्या कॅनव्हासवर नियतीनं वेगळेच रंग भरले होते. संघर्ष आणि तडजोड या समांतर रेषेत चालणारं तिचं आयुष्य प्रलोभनांच्या भोवऱ्यात गुरफटू लागलं. आशा, आकांक्षा अन् महत्त्वाकांक्षा यांची रस्सीखेच सुरू झाली. यातूनच निर्माण झालेल्या त्रिकोणांना ती शेवटपर्यंत टाळू शकली नाही.

आपल्या आयुष्याचे शिल्पकार आपणच असतो की अन्य कोणी या प्रश्नाचं उत्तर ती शोधत राहिली.

आणि पुढारीपण करणारा खेड्यातला सधन वर्ग दलितांवर कसा विविध प्रकारे अन्याय आणि अत्याचार करतो, याचे अत्यंत भेदक आणि विदारक चित्र या कादंबरीत रेखाटले आहे. खेड्यातला दलित वर्ग आज स्वातंत्र्यातसुद्धा अनेक परीने गुलामांचे नि शोषितांचे जीवन जगतो आहे. त्याच्या जीवनाला आधार नाही, त्याला लाभलेले हक्क वापरता येत नाहीत. त्याला त्यासाठी लढा देता येत नाही. दिला तरी सारा गाव एक होऊन त्यांचे जीवनच पार उद्ध्वस्त करून टाकतो. अजूनही समाजाच्या मनातली अस्पृश्यतेची भावना कमी झालेली नाही. त्यापोटी दलितांना लाजिरवाणे आयुष्य जगावे लागते. माणूस म्हणून त्याच्याकडे अजूनही समाज पाहू शकत नाही. जागृत झालेल्या दलित तरुणांचा लढा किंवा विरोध मोडून काढला जातो, याची प्रखर जाणीव प्रस्तुत कादंबरी आपणाला करून देते. या कादंबरीतला देवा महार हा जुन्या वळणाचा. जुन्या संस्कारात वाढलेला आणि म्हणूनच गावातल्या कुणाचाही शब्द झेलणारा. पसाभर भातासाठी दिवसभर राबणारा; ढोरासारखे कष्ट करूनही लुबाडला जाणारा तुकाराम हा जागृत नि सुशिक्षित दलित तरुणांचा प्रतिनिधी आहे. मुक्ता ही स्वत:च्या जीवनाला घडविणारी, नवा मार्ग शोधणारी समंजस दलित तरुणी. आपण शिकावे, स्वच्छ राहावे, नर्ससारखी एखादी नोकरी करावी, माणसासारखं जगावं अशी स्वप्ने बाळगणारी; पण सत्ता, संपत्ती आणि गुंडगिरी यांच्या आधारे साऱ्या दलित समाजालाच सवर्ण समाज तुडवितो, लुबाडतो. त्यांच्या प्रत्येक गोष्टीला विरोध करतो. दलितांच्या आर्थिक प्रगतीसाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांना खीळ घालतो. या कादंबरीतील आंबेडकर जयंतीचा प्रसंग या मनोवृत्तीवर प्रकाश टाकणारा आहे. अखेरचा प्रसंग तर हृदयविदारक वाटतो. गावाला विरोध करणाऱ्या आणि स्वत:च्या हक्कासाठी भांडणाऱ्या अवघ्या दलित वस्तीलाच आग लावली जाते व त्यातच चारदोन जण भाजतात, अशी या कादंबरीची अखेर आहे.

जागृत दलित समाजाचे हक्क आणि माणुसकीसाठी सुरू झालेला लढा हा या कादंबरीचा विशेष आहे. आजच्या परिस्थितीत हा लढा पराभूत झालेला दाखविला असला तरी या पराभवातही उद्याच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने दडलेली आहेत, याची जाणीव कादंबरी वाचून होते. दलित जीवनाचे, आजच्या प्रखर वास्तवाचे, बदलत्या अन्याय-शोषणाचे आणि बदलत्या मानसिकतेचे अतिशय कलात्मक व संयत चित्र लेखकाने येथे रेखाटले आहे.

ग्रामीण जन-जीवनाचा आविष्कार करणाऱ्या देसायांच्या या कादंबऱ्या केवळ रंजनासाठी लिहिलेल्या नाहीत, याची प्रथम जाणीव होते. त्यातील पात्रे

ही भडक, कृत्रिम, साचेबंद आहेत, असेही म्हणता यायचे नाही. हा फार तर 'माझा गाव' या कादंबरीवर आपणास आरोप करता येईल. यामध्ये पारंपरिकतेचा आविष्कार झालेला आहे, असेही म्हणता यायचे नाही. या साऱ्या कादंबऱ्या समोर ठेवल्या तर आपणाला असे दिसून येईल, की स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामजीवनाला प्रारंभ करून बदलत्या ग्रामजीवनाचा कलात्मक आढावा देसाई यांनी या कादंबऱ्यांतून घेतलेला आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाचा, सामाजिक स्थित्यंतराचा नि जागृतीच्या संदर्भातला एक आलेखच प्रस्तुत कादंबऱ्यांतून काढलेला आपणाला दिसून येतो. कृषिनिष्ठ संस्कृती, पारंपरिक मनोवृत्ती, दलितांकडे पाहण्याची भूमिका आणि बदलते राजकीय, शासकीय संदर्भ यांच्या चौकटीत हे ग्रामीण जनजीवन लेखकाने साकार केलेले आहे. रचनातंत्राच्या दृष्टीने यात नवेपणा आढळत नसला तरी, नव्या जीवनधारणांचा चांगला परिचय करून देण्यात आलेला आहे, यात शंका नाही.

३

नित्याच्या अनुभवविश्वाला शब्दरूप देणाऱ्या या कादंबऱ्या वाचकांनी मनापासून स्वीकारल्या तरी देसाई हे लोकप्रिय कादंबरीकार ठरले नव्हते किंवा अव्वल दर्जाचे मानले जात नव्हते. वर्तमानाला सामोरी जाणारी त्यांची प्रतिभा मराठी वाचकांनी मानावी तेवढी थोर मानली नव्हती; पण त्यांच्या 'स्वामी' कादंबरीने मात्र मराठी कादंबरीत, विशेषत: ऐतिहासिक कादंबरीत एक नवे युग निर्माण केले. आपल्या प्रतिभेचे सर्व गुणविलास प्रकट करून मराठी वाचकांचे मन स्वत:कडे खेचून घेतले. 'स्वामी', 'राधेय', 'श्रीमान योगी' या वर्तमानाला छेद देणाऱ्या कादंबऱ्या भूतकाळाला सजीव करणाऱ्या आणि आपल्या भूतकालीन आकर्षणाला पुष्ट करणाऱ्या कादंबऱ्या आहेत. या तीन कादंबऱ्यांमुळे देसाई यांची एका बाजूने श्रेष्ठ व लोकप्रिय कादंबरीकार म्हणून ख्याती झाली आणि दुसऱ्या बाजूने याच कादंबऱ्यांनी त्यांच्या जीवनधारणेला, जीवनदृष्टीला मर्यादाही घातल्या, असे म्हटले जाते. कादंबरी क्षेत्रातले नवे प्रयोग, नवे बदल, नवी वळणे निर्माण करणारी सर्जनशीलता मारली गेली, असे काही समीक्षकांना वाटत आले आहे. या मतामध्ये तसा थोडाफार सत्यांश असला तरी या तीन कादंबऱ्यांतून त्यांनी साहित्यसृष्टीला जे काही दिलेले आहे – जी काही भर घातलेली आहे, ती अगदीच उपेक्षणीय आहे असे बिलकुल म्हणता यायचे नाही. 'स्वामी' सारखी कादंबरी आजही नव्या वाङ्मयीन वातावरणात 'शिळी' झालेली नाही, लोकप्रियतेच्या दृष्टीने उणी झालेली नाही, हे आपण मान्य करतो. याचा अर्थच 'स्वामी'मध्ये सुप्त

स्वरूपाचे काही अपूर्व गुणविशेष आहेत, हे कबूल करावे लागेल. लोकप्रियता व कादंबरीची श्रेष्ठता यांचे गणित सहसा जमत नाही. जी कलाकृती कमालीची लोकप्रिय ठरते, ती कलागुणांनी श्रेष्ठ असतेच असे नाही, हे ज्ञात असूनही 'स्वामी'च्या संदर्भात हे विधान खोटे वाटायला लागते. अक्षर स्वरूपाची कलाकृती अनेकदा अत्यंत लोकप्रिय होऊ शकते, हे या कादंबरीने मराठीपुरते सिद्ध करून दाखविले आहे.

'स्वामी' हा ऐतिहासिक कादंबरीतील एक अनोखा प्रयोग होता. या कादंबरीने मराठीत एक मानदंड तयार केला. ऐतिहासिक कादंबरीला पडलेल्या मर्यादा पूर्णत: नष्ट करून टाकल्या. 'स्वामी' कादंबरीने कादंबरी क्षेत्रात एक इतिहास निर्माण केलेला आहे. खरे तर ही चरित्रपर कादंबरी नव्हे, अथवा कादंबरीमय चरित्र नव्हे. तर ही कादंबरी म्हणजे देसाईंच्या रोमँटिक वृत्तीला जाणवलेली रमा-माधवाची भाव-कादंबरी आहे. प्रशासक माधवराव आणि प्रियकर माधवराव यांच्यातील नाजूक, कोमल भावबंध या दोन्ही गोष्टींचा एका उच्च पातळीवर झालेला कलात्मक संगम आहे. त्यात केवळ इतिहास येत नाही. लढाया येत नाहीत. जय-पराजयाची नोंद येत नाही किंवा मराठाकालीन समाजजीवनाची ऐतिहासिक नोंदही येत नाही. इतिहासातील युगधर्म कोणता, त्या काळचा आदर्श कोणता याचा एका अंगाने लेखक शोध घेतो आहे आणि दुसऱ्या अंगाने 'पेशवा' असलेला माधवरावातला रसिक 'माणूस' शोधतो आहे. अन् त्या माणसाचे लोभस, नाजूक नि काव्यात्म भावविश्व शब्दांकित करीत आहे. केवळ ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या वाटणाऱ्या राजकीय घटना आणि प्रसंग यात रमण्यापेक्षा लेखकाने व्यक्तीच्या भावजीवनातले नानाविध रंग-तरंग, हर्षामर्ष चितारलेले आहेत आणि म्हणूनच ही कादंबरी पूर्वीच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांपेक्षा पूर्णत: वेगळ्या प्रकारची कादंबरी वाटते. ती इतिहासाने घालून दिलेल्या मर्यादा ओलांडून आपल्या चैतन्यासह, बाहेर उफाळून वाचकांना त्यात गुंतवून टाकते आहे.

पूर्वीच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांत अनेकदा घटनाक्रमाला महत्त्व दिलेले असे. ऐतिहासिक सत्याला कलात्मक रूप देण्यासाठी कल्पनेचा वापर कशाही प्रकारे केलेला आढळे. दंतकथा, आख्यायिका यांचा वापर भावनाविष्कारासाठी करण्याकडे कल असे. अद्‌भुताचे रंग मिसळण्याची तर सर्रास प्रथाच रूढझालेली आढळत असे. असामान्य अशा ऐतिहासिक व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवून इतर बाबींची आरास मांडलेली असे. कधी कधी त्या ऐतिहासिक सत्याला काल्पनिक प्रेमकथेची जोड दिलेली असे. त्यामुळे

२ री आवृत्ती

डॉक्टर झिवागो

मूळ लेखक - **बोरिस पास्तरनाक**

अनुवाद - **आशा कर्दळे**

किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

विसाव्या शतकातील एक महान,
श्रेष्ठ आणि नोबेल पारितोषिक-विजेती कादंबरी.

रशियन राज्यक्रांतीच्या अतिशय अस्थिर अशा कालखंडात समाजातील सर्वच स्तरांतील व्यक्तींच्या जीवनात घडून आलेला दुःखद बदल या कादंबरीत एका विस्तीर्ण कालपटलावर अत्यंत प्रत्ययकारी पद्धतीनं रेखाटला आहे. नष्ट झालेलं व्यक्तिगत जीवन, देशाच्या नियतीशी अटळपणे बांधली गेलेली लोकांची आयुष्यं, उद्ध्वस्त झालेली स्वप्नं.... आणि युद्धाच्या आणि क्रांतीच्या छिन्नभिन्न वातावरणातही अकलंक राहिलेली प्रेमाची कोवळीक आणि जगण्याची अनिवार ओढ! ही कादंबरी म्हणजे एक विशाल जीवनप्रवाह आहे. माणसं येतात-जातात, युद्धं होतात, क्रांत्या होतात, देश निर्माण होतात, नष्ट होतात; पण जीवनाचा ओघ अखंड चालूच असतो. डॉक्टर आणि कवी असलेला युरी, त्याची पत्नी टोनिया आणि विलक्षण सुंदर प्रेयसी लारा या तिघांची ही कहाणी बोरिस पास्तरनाकच्या उच्च कोटीच्या प्रतिभेच्या स्पर्शानं वैश्विक पातळीवर जाऊन पोहोचते. समग्र मानवी जीवनाला कवेत घेण्याचं सामर्थ्य फार थोड्या साहित्यकृतींमध्ये असतं. 'डॉक्टर झिवागो' ही त्यापैकी एक.

ती कथा धड ऐतिहासिक होत नाही, धड काल्पनिक होत नाही. इतिहासाविषयीचे आपले निर्भेळ कुतूहलदेखील नीटपणे पूर्ण करीत नसे. या साऱ्या मर्यादा 'स्वामी' कादंबरीने दूर करून टाकल्या. हे सारे दोष देसाईंनी नष्ट करून टाकले. ऐतिहासिक कादंबरीत एखाद्या घटनेला जितके महत्त्व असते, त्यापेक्षा त्या घटनेत सापडलेल्या माणसाच्या मनाला-विचार-विकारांना अधिक महत्त्व असते, असे त्यांनी 'स्वामी' कादंबरीद्वारे दाखवून दिले.

'स्वामी' कादंबरीचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ऐतिहासिक सत्य आणि संभाव्य कल्पित यात ती दुभंगलेली नाही. कल्पिताचा वापर घटनांना सजीव करण्यासाठी केलेला नाही. पात्रांना जिवंत करण्याबरोबरच इतिहासाने जेथे मौन पाळलेले आहे, त्या जागा भरून काढण्यासाठी केलेला आहे, व्यक्तिमत्त्वाच्या नानाविध स्तरांना चित्रमय रूप देण्यासाठी केलेला आहे. माणसातला 'माणूस' कोरून बाहेर काढण्यासाठी अन् त्याद्वारे ऐतिहासिक युगधर्माचे वाचकांना दर्शन घडविण्यासाठी झालेला आहे. सामान्य जीवन आणि असामान्य व्यक्तिमत्त्व यांच्यातील लोपून गेलेले नातेसंबंध दृढकरीत अलौकिकाच्या पातळीखाली झाकाळून गेलेले लौकिक जीवन सजीव करण्यासाठी देसायांनी 'स्वामी'मध्ये कल्पिताचा वापर केलेला आहे. या असामान्य व्यक्तिमत्त्वाच्या यशापयशात लक्षावधी सामान्य माणसांचे हितसंबंध गुंतलेले असतात. या व्यक्तिजीवनाचा अर्थ छोट्या-मोठ्या घटनांत शोधावा लागतो. ही संगती शोधताना कल्पिताचा वापर होत असतो. लेखकाला तो तसा करावा लागतो. देसाई यांनी असा वापर करून ऐतिहासिक कादंबरीचे सामर्थ्य वाढविले आहे.

आजकाल ऐतिहासिक कादंबरीच्या नावाखाली इतिहासातील छोट्या - मोठ्या व्यक्तीची वकिली करण्याची पद्धत रूढ होऊ लागली आहे. इतिहासाने ज्या व्यक्तीला नादान ठरविलेले असते, त्याला महान बनविले जाते. काहीजण इतिहासातील व्यक्तीकडे 'स्वत:च्या नजरेने' पाहून त्याला चित्रित करीत असतात. ही अकलात्मक भूमिका या कादंबरीत लेखकाने घेतलेली नाही. लौकिकाला अलौकिकाच्या पातळीवर नेऊन त्यातील अर्थपूर्ण भावानुभवांचा लयबद्ध घाट तयार केलेला आहे. केवळ माणूसपणावर लक्ष केंद्रित केलेले आहे. ही भूमिका घेतलेली असल्याने ही कादंबरी केवळ ऐतिहासिक कादंबरी ठरत नाही. तिला त्यापेक्षा व्यापक परिमाण प्राप्त होते. ह्या परिमाणाचा विचार करताना प्रा. व. दि. कुलकर्णी लिहितात, ''कलामूल्याचा त्याग न करता भावानुभवांचा नानाविध संदर्भासह

आविष्कार केलेला आहे. त्यामुळे अनेकपदरी, गुंतागुंतीची अनन्यसाधारण अशी रचना तयार होऊन तिला निर्दोष घाट प्राप्त झालेला आहे. म्हणून ही कलाकृती श्रेष्ठ ठरते. संमिश्र ठरते.'' (मराठी कादंबरीची वाटचाल, पृ. ६९)

'स्वामी'ला जे यश लाभले याचे दुसरे कारण लेखकांच्या सामर्थ्याइतकेच माधवरावांच्या सामर्थ्यात आहे. या कादंबरीचे यश कथानकापेक्षा माधवरावांच्या व्यक्तिरेखेत आहे. माधवराव ही असामान्य व्यक्ती आहे. पराक्रम, द्रष्टेपण, विचारी, मुत्सद्दी, आक्रमक, चारित्र्यशील, रसिक, विनयशील, प्रेमळ, गुणी, विवेकी अन् संयमी अशा गुणांचा आविष्कार माधवरावांच्या ठिकाणी झालेला आहे. अल्पवयात पडलेली जबाबदारी धैर्याने पार पाडणारा परिपक्व बुद्धीचा हा पेशवा स्वकर्तृत्वाने मिळविलेल्या सुखोपभोगाचा आस्वाद घेऊ शकत नाही, या विचाराने आपणाला माधवरावांविषयी विशेष आपुलकी वाटते. एकीकडे माधवरावांचे जीवन कृतार्थ आहे तर दुसरीकडे पराभूत झालेले आहे. राज्याची घडी त्याने बसविली, पण त्याचा उपभोग घेता आला नाही. ज्या राघोबाला त्याने नमविले, त्याच्याच हाती दुबळ्या नारायणाला त्याला सोपवावे लागले आहे. हा जो महान दैवदुर्विलास आहे, तो देसाईंनी नेमकेपणाने उभा केलेला आहे.

जीवनचरित्र सांगणारी नि भूतकाळाला साकार करणारी आणखी एक कादंबरी म्हणजे 'राधेय' म्हणता येईल. महाभारतातल्या कर्णजीवनाची ही देखील एक चरितकहाणी आहे. या चरितकहाणीसाठीही लेखकाने 'श्रीमान योगी'प्रमाणे भरपूर पूर्वतयारी केलेली जाणवते. भरपूर व्यासंग केलेला जाणवतो; पण या व्यासंगाला येथे निर्मितीचा स्पर्श प्राप्त झालेला जाणवतो. ही केवळ कर्णजीवनाची कहाणी नाही. प्रत्येकाच्या मनातला जो कर्ण असतो, तोच यातून दाखविण्याचा लेखकाने प्रयत्न केलेला आहे. कर्णाच्या जीवनातली सारी आंदोलने येथे निवेदनाच्या पातळीवर राहत नाहीत. ती केवळ आपणाला माहिती पुरवण्याचे काम करीत नाहीत. कर्णाच्या जीवनाची शोकांतिका कशामुळे झाली? त्यात कोण कसं वागलं? नियतीचा त्यात हात किती? विशिष्ट प्रकारची परिस्थिती याला किती जबाबदार, यासारखे प्रश्न आपल्या मनात निर्माण होण्यासारखी कलात्मक पातळी या कादंबरीला प्राप्त झालेली आहे. यामुळे पौराणिक वास्तवातून स्वत:च्या प्रतिभेला जो कर्ण कोरून घेता आला, त्याचे दर्शन या कादंबरीत आपणास घडते. कर्णजीवनाची कहाणी विशद करताना लेखकाने मानवी जीवनातल्या सनातन सत्याला स्पर्श केलेला आहे. प्रेम, वात्सल्य, दया, क्षमा, पराक्रम, भौतिक

मानसन्मान, स्त्रीप्रेम आणि वांशिक अभिमान या बाबींचे जीवनाला वरदान कसे नि किती लाभते? त्यातून जीवनाला उंचावणारे आणि अक्षयत्व बहाल करणारे कोणते मूल्य? मनुष्याने जीवनाचे साफल्य यापैकी नेमके कशात शोधावे किंवा मानावे? आत्यंतिक स्वरूपाचा एखादा गुण माणसाला उजळवून टाकतो की, काजळून-कुस्करून टाकतो? बौद्धिक यशप्राप्ती, सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा माणसाला कर्तृत्वाला नि पूर्णत्वाला नेण्यास मदत करते की त्याला अधमतेकडे खेचून घेते? यासारखे अनेक सनातन प्रश्न आपल्या मनात सतत उभे राहावेत अशी या कादंबरीची निर्मिती झालेली आहे. मुळातच कर्णाचे जीवन हे उपेक्षा, फसवणूक आणि मानहानी यांनी रक्ताळलेले आहे. ते दु:ख वाढविणारे काही सद्‌गुण त्याला लाभलेले आहेत. त्या गुणांचाही भावनावेगात दुरुपयोग झालेला आहे. अन् अंतिमत: तर काहीतरी गमावल्याचे शल्य त्याला प्रतीत झालेले असते. या शल्याची करुणोदात्त कहाणी देसायांनी हलक्या हातानी, सर्जनाच्या पातळीवर जाऊन कर्णाला समजावून घेत घेत शब्दांत कोरलेली आहे. त्यामुळे अनेक वाचकांना 'स्वामी' कादंबरीपेक्षाही 'राधेय' ही कादंबरी अधिक सरस, सुंदर आणि सकस वाटते.

हे असे वाटण्याचे कारण असे की, लेखकाने या कादंबरीवेळी दोन-तीन गोष्टी अधिक विचारपूर्वक आणि कलात्मक दृष्टीने हाताळल्या आहेत. त्यापैकी पहिली गोष्ट म्हणजे पौराणिक वास्तवाला जसेच्या तसे शब्दरूप दिलेले नाही. जे पौराणिक वास्तव वा सत्य लेखकाला व्यक्त करावेसे वाटले, त्याला केवळ ललित व काव्यात्म शब्दांत गुंफलेले नाही. त्याला केवळ प्रयत्यकारिकता आणून टाकलेली नाही. तर त्या सत्याला कलात्मक सत्याचे स्वरूप लाभल्यावर निर्मिती केलेली आहे. महाभारतातला कर्ण येथे शब्दांच्या कोंदणात न बसविता त्याची आपल्या चिंतनशीलतेतून पुनर्निर्मिती साधलेली आहे. अन् तेही पौराणिकतेला फारशी बाधा न आणता. त्यामुळे या कादंबरीला एक प्रकारचे गहिरेपण प्राप्त झालेले आहे. दुसरी एक बाब अशी की, कर्णजीवनातल्या अद्‌भुततेचा लेखकाने जाणीवपूर्वक नि कलानिर्मितीला पोषक असा वापर केलेला जाणवतो. कर्णजीवनात अद्‌भुततेला खूप महत्त्व आहे. अन् परिणामकताही, या अद्‌भुततेमुळे त्याचे व्यक्तिमत्त्व लौकिकापेक्षा वेगळे बनलेले आहे, अन् शोकात्मही झालेले आहे. ही अद्‌भुतता कर्णाच्या जीवनाला घडविणारी आहे आणि त्याचबरोबर बिघडविणारीही आहे, ही जाणीव देसाईंनी मनात सतत वागवून तिचा कादंबरीत वापर केलेला आहे. ही अद्‌भुतता त्यांनी लौकिकाच्या स्पर्शाने सौम्य करीत करीतच आणि त्याच वेळी लौकिकाच्या उभ्या धाग्यांत गुंफत

गुंफत तिचे बाह्यांग बनविले आहे; पण या अद्‌भुततेचा सत्त्वपूर्ण गाभा त्यांनी दूषित केलेला नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर असे म्हणता येईल, की असंभाव्यता टाळून अद्‌भुततेचा कथावस्तू, व्यक्तिचित्रण आणि जीवनचिंतन यासाठी उत्तम वापर केलेला आहे. त्यामुळे ही कादंबरी भडक नि कृत्रिमतेच्या दोषांनी डागाळलेली नाही अथवा अलौकिक वास्तवाच्या चित्रणाने वाचकाला दिपवून टाकत नाही. अद्‌भुततेची अलौकिकता अबाधित ठेवूनही लौकिक जीवनाला स्वाभाविकतेने समृद्ध बनवून अलौकिक (वेगळ्या अर्थाने) बनवित आहे. देसायांची ही खरी कमाई आहे.

तिसरी ध्यानात घ्यावयाची गोष्ट म्हणजे यातली भाषा. शिवाजी सावंतांच्या 'मृत्युजंय'सारखी काव्यात्म, पद्यकाव्यमय, अलंकृत नि हळवेपणाला जवळ करणारी न ठेवता, या गुणांचा माफक वापर त्यांनी केलेला आहे. आत्यंतिक शोकात्मक स्वरूपातील अनुभवही ते संयत स्वरूपात व्यक्त करतात. त्याला अतिभावविशेषता येईल असे रूप देत नाहीत. उगीच डोळे पुसत पुसत, नि हुंदके देत-आवरत कर्णाला सामोरे जाण्यात कादंबरीला सौंदर्य लाभत नसते. ते सौंदर्याला बाधक ठरते. म्हणून या कादंबरीची अखेरदेखील भाषेच्या दृष्टीने अनुभवाला गुदमरून टाकणारी वाटत नाही. अथवा कर्णजीवनाच्या शोकात्म अनुभवावर लक्ष केंद्रित न करता भाषिक विलासाकडे वेधून घेणारी वाटत नाही. या तीन-चार गोष्टींचे भान लेखकाने शेवटपर्यंत राखलेले असल्याने आणि कर्णाच्या व्याकूळ करणाऱ्या जीवनात फाजील समरस न होता अत्यंत ताटस्थ्याने, संयमाने अन् तरीही तादात्म्य राखून 'प्रत्येकाच्या मनातला कर्ण' त्यांनी 'राधेय' मध्ये उभा केलेला आहे, यात शंका नाही.

४

देसाई यांच्या कादंबऱ्यांचा परिचय करून घेतल्यावर आपल्या एक गोष्ट सहजपणे ध्यानात येते, ती म्हणजे 'समिधा' सारखी कादंबरी अपवाद म्हणून सोडली तर त्यांच्या सर्व कादंबऱ्या या व्यक्तिप्रधान कादंबऱ्या आहेत. चरित्रप्रधान कादंबऱ्या देऊन कथावस्तूंचे अन्य प्रसंग-घटना निर्माण केलेल्या असल्या तरी ती अवघ्या दलितांच्या जीवनाचा आविष्कार करणारी, सामूहिक मनाचा आविष्कार करणारी कादंबरी आहे. बाकीच्या सर्व कादंबऱ्या मात्र तशा वाटत नाहीत. देसाई यांना प्रथम व्यक्ती दिसते. मनासमोर तरळते. सजीव होते. अन् मग इतर बाबी हळूहळू उजळत जात असाव्यात. एखाद्या कादंबरीचे बीज मन:कोषात पडताना व्यक्तीच्या सूक्ष्म-तरल स्वरूपातच ते पडते - पडत असावे. त्यातही ती व्यक्ती सामान्य कोटीतील सहसा नसते.

एखाद्या क्षेत्रात अत्युच्च स्थान संपादन करणाऱ्या व्यक्तीचे जीवन त्यांना मोहित करीत असावे. त्यातूनच 'राजा रवि वर्मा' यासारखी कादंबरी निर्माण होत असावी. वर्तमानकाळाला खेटून उभ्या असलेल्या, भूतकाळावर आपल्या कलेने चिरस्थायी अशी नाममुद्रा उमटविणाऱ्या एका थोर नि मनस्वी चित्रकाराचा सुंदर आलेख या कादंबरीत साकार केलेला आहे. भारतीय चित्रकलेमध्ये क्रांती करणारा, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील चित्रकला स्पर्धेत भाग घेऊन अनेकदा अनेक सुवर्णपदके जिंकणारा, मोठमोठे बहुमान मिळविणारा आपल्या चित्रकलेशी कसलीही, कुठेही तडजोड न करणारा, आपल्या कलाजीवनावर मन:पूर्वक प्रेम करणारा, यासाठी व्यावहारिक तडजोडी करण्यास तयार नसणारा, प्रसंगी पत्नी आणि मुलांचाही त्याग करणारा, तरीही स्वत:ला न ओळखणाऱ्या पत्नीवर मनापासून प्रेम करणारा, तिच्या हट्टी आणि एककल्ली स्वभावामुळेच अपूर्व धुंदीत वावरत असतानाही त्या चित्राला प्रेरणा देणाऱ्या प्रेमिकेला समजावून घेणारा अन् तिच्या प्रेमाचा स्वीकार करणारा, मनस्वी, धुंद, कलंदर, रसिक, कलानिपुण, गुणग्राही, कौटुंबिक प्रेम नि जिव्हाळा यांना जपणारा, वृत्तीने 'राजा' असणारा रवि वर्मा देसायांनी अतिशय तन्मयतेने व आत्मीयतेने साकार केलेला आहे. राजा रवि वर्मा हे भारतीय चित्रकलेतील एक अत्युच्च शिखर. माणूस म्हणूनही एक समृद्ध आणि जबरदस्त जीवन. चित्रकलेची अलौकिक प्रतिभा लाभलेले दैवी रूप. या रूपाला सरूप करण्यासाठी आवश्यक असणारी सारी तपश्चर्या लेखकाने येथे केलेली आहे. त्यामुळेच कादंबरीच्या रूपाने का होईना पण नव्या पिढीला या असामान्य कर्तृत्व करून गेलेल्या थोर कलावंताचा रुचिर परिचय लेखकाने करून दिलेला आहे.

नाट्य, संघर्ष व दैवी सद्‌गुणांची श्रीमंती असलेल्या व्यक्तिमत्त्वाची व्याकूळ करणारी शोकात्मिका, देसाईंच्या व्यक्तिप्रधान असलेल्या कादंबरीत आढळणारे घटक याही कादंबरीत भरपूर प्रमाणात आपणाला जाणवतात. सामान्य प्रसंगाबरोबरच नायकाच्या जीवनाला उजळून टाकणारे वा उंचावणारे नाट्यमय प्रसंग निवडून त्यांची सुंदर मांडणी करण्याचे कौशल्य 'राजा रवि वर्मा' कादंबरीतही जाणवते. प्रारंभापासून अंगावर आलेल्या वादळांना सामोरे जात जात आणि प्रसंगी स्वत: वादळे उत्पन्न करीत आपल्या कुंचल्याशी इमान राखणारे एक वादळी जीवन लेखकाने उभे केलेले आहे. नाट्य आणि संघर्ष यांच्या जोडीला शृंगाराचा तरल नि काव्यमय आविष्कार करणारे अपार प्रीतीचे विश्वही तितक्याच आत्मीयतेने त्यांनी साकार केलेले आहे. किंबहुंना 'प्रेम' या एकाच शब्दात राजा रविवर्म्यांच्या जीवनाचे सार सांगता यावे. आपल्या कलेवरील अव्यभिचारी प्रेम, आपल्या आप्तस्वकीयांवरील निरपेक्ष

प्रेम, मनाची व कलेची श्रीमंती वाढविणारे सुगंधा या कलाप्रेमी रमणीचे प्रेम, राजा रविवर्म्यावर त्याच्या नातेवाईकांनी केलेले अपरंपार प्रेम, त्याला त्याच्या मातृभूमीचे जन्मगावाचे ओढून आणणारे प्रेम अशी प्रेमाची विविध रूपे लेखकाने नाट्यमय जीवनाच्या पार्श्वभूमीवर सुंदर प्रकारे रेखाटली आहेत. प्रत्येक घटना, प्रसंग चित्रकलेला जीवनाची उपासना मानणाऱ्या या राजावर्म्याच्या व्यक्तिमत्त्वाला व्यामिश्र बनवितो. गुणांचे दर्शन घडवितो. त्याच्यातल्या माणसाला नि कलावंताला ठळक स्वरूपात आपल्यासमोर चितारतो. त्यामुळे एका अमानवी प्रतिभेचा मानवी पातळीवरील गुणदोषांनीयुक्त असा जीवनपट जीवनाचा अपूर्व साक्षात्कार घडवितो. एका प्रतिभावंताने दुसऱ्या दैवी प्रतिभेला वाहिलेली ही आदरांजली वाटते, यात शंका नाही. अर्थात ती नखरेल, चित्ताकर्षक नि प्रवाही होण्यासाठी आवश्यक असलेली लेखनकलेचा तंत्रे याही निर्मितीवेळी जाणवतात, हेही मान्य केले पाहिजे. गतिमान आणि चित्ताकर्षक कथानकासाठी लागणारी सारी आयुधे नेहमीप्रमाणे देसायांनी या कादंबरीवेळीही वापरलेली आहेत, हे वेगळे सांगायला नकोच.

'अभोगी ही रणजित देसाई यांची शेवटची कादंबरी. अर्थात आतापर्यंतच्या लेखनातली. या कादंबरीतही एका गायकाच्या जीवनातली वादळे साकार केलेली आहेत. सावलीसारखी साथ आणि सोबत करणाऱ्या केशरचा झालेला दारुण प्रेमभंग, गायनवेड्या अन् समाजसेवी असलेल्या कैलास नावाच्या डॉक्टरचा कोंडमारा या त्रिकोणात ही कादंबरी विस्तारते. तशी ही प्रेमाचा सांकेतिक त्रिकोण चित्रित करणारी कादंबरी वाटली, तरी तेवढ्यावरच तिचे मूल्यमापन होऊ नये. खरं तर ही त्यागाची स्पर्धा दाखविणारी कादंबरी आहे. जीवनाला अर्थ देणाऱ्या एखाद्या वेडापायी माणूस कसा झपाटला जातो, गायन कलेच्या उपासनेत रंगा मास्तरासारखा एक फाटका माणूस किती प्रेमाने महेशसारख्या पोरक्या पोराला जीव लावतो, त्याच्या गाण्यासाठी धडपडतो– कळवळतो. त्यागाची सीमा गाठतो. याची ही कादंबरी आहे. केशर आपले प्रेम व सूर महेशसाठी त्यागते, नव्हे महेशच्या जीवनालाही नाकारते. कैलास संगीतासाठी लौकिक सुखासमाधानाचा त्याग करतो. उपरती झाल्यावर महेश माणुसकीच्या दर्शनाने विस्फारित होऊन त्यागाला सिद्ध होतो. म्हणून ही प्रेमापेक्षाही त्यागाची आणि समर्पित भावनेची कहाणी आहे. एका अनाथ पोराला ऊब देऊन त्याच्या गळ्यातला सूर जपणाऱ्या संगीतप्रेमी मंडळींचा स्वार्थ आणि साधना यांची ही कहाणी आहे.

या कादंबरीत जाणवणारी एक बाब म्हणजे येथे एका ऐवजी दोन

संगीतप्रेमी नि संगीतउपासक असे नायक दाखविले आहेत. एखाद्या धूमकेतूप्रमाणे गुणावगुणांनी झपाटलेले व्यक्तित्त्व अवतीभवतीचा आसमंत उजळत झेपावणारे चित्र या कादंबरीत पाहावयास मिळत नाही. अत्यंत श्रीमंत असूनही आणि स्वत:चा वैद्यकीय व्यवसाय मुंबईत उत्तम रीतीने चालला असतानाही, खेडुतांची सेवा करण्यासाठी ग्रामीण परिसरात दवाखाना काढणारा व संगीत हा ज्याचा बहिश्चर प्राण आह, असा डॉ. कैलास एकीकडे दाखविला आहे, तर लहानपणीच अनाथ झालेला, संगीत क्षेत्रात लोकोत्तर कामगिरी करणारा गायक महेश हाही नायक आहे. अपवादात्मक गुणांची परमावधी असणारी समान उंचीची दोन शिखरे या कादंबरीत दाखविली आहेत. देसायांच्या 'माझा गाव' कादंबरीतील तंत्र थोड्याशा फरकाने या ठिकाणी प्रतीत होत आहे. दुसरी एक गोष्ट या कादंबरीमध्ये जाणवते. ती म्हणजे चित्रपट कथानकाला साजेसे असे याचे कथानक आहे. त्यामुळेच दोनदा चित्रपट काढण्याचा संकल्प या कादंबरीतबाबत सोडलेला असावा. चित्रपटाचे रचनातंत्र या ठिकाणी अधिक प्रभावशाली झाल्यासारखे वाटते. व्यक्तिचित्रणाचा विचार करता कैलास आणि महेश यांच्या चित्रणापेक्षाही येथे रंगा मास्तर, केशर ही पात्रे विशेष चित्रमय, परिणामकारक आणि वाचकांना प्रिय होणारी अशी आहेत. लौकिक जीवनातली सारी दु:खे विसरून संगीतासाठी प्राण देण्यासही तयार होणारी ही माणसे आहेत. देण्यातच घेण्यापेक्षा अधिक सुख असते, हा विचार सांगणारी ही पात्रे आहेत. नव्हे कादंबरीचा मुख्य गाभा हाच आहे. संगीताची पार्श्वभूमी असलेली, संगीताच्या प्रेमावर उभी असलेली, संगीतसाधनेला सर्वस्व मानणारी आणि लोकोत्तर संगीतासमोर नतमस्तक होणाऱ्या माणसांनी गजबजलेली ही कदाचित पहिलीच कादंबरी असावी.

देसाई यांचेच व्यक्तिमत्त्व या कथावस्तूला पोषक असे असल्याने आणि याविषयी त्यांना विशेष ममत्व असल्याने झपाटून टाकण्याचे मोठे सामर्थ्य 'अभोगी' या कादंबरीला प्राप्त झालेले आहे. हे झपाटून टाकणे नेहमीच्या परिचित क्षेत्रातले नाही. नेहमीच्या पात्रांद्वारे उभे राहणारे नाही. या मागे स्वर्गीय सुरांची किमया आहे. उपासनेची किमया आहे. या कादंबरीतील केशरसारखे पात्र तर कायमचे आपल्या मनात घर करून राहणारे पात्र आहे. महेश आजारी असताना त्याला प्रसन्न वाटावे म्हणून केशर उदबत्त्या लावायला त्याच्या खोलीत येते. तेव्हा ''जळल्याशिवाय सुगंध नाही का?'' असा त्याने केशरला विचारलेला प्रश्न हा तिच्या जीवनाचे पूर्णत: सार सांगणारा आहे. तिच्याच नव्हे तर कादंबरीच्या प्रत्येक पात्राच्या जीवनाचे सार सांगणारा आहे, असे

वारंवार वाटत राहते. देसाई यांच्या आतापर्यंतच्या तंत्राच्या पठडीत बसणारा, लौकिकात भर घालणारी, त्यांच्या जीवनदृष्टीचा नि जीवनादर्शनाचा परिचय करून देणारी आणि त्याग, उदात्तता, सेवा व प्रेम यांचा साक्षात्कार घडविणारी, सर्वसामान्य वाचकांना खचित आवडावी, अशी ही कादंबरी आहे.

५

आतापर्यंत आपण देसायांच्या कादंबऱ्यांचा ओझरता परिचय करून घेतला. त्याबरोबरच त्या कादंबरीचे वैशिष्ट्य आणि वाङ्मयीन गुणवत्ता यांचाही थोडाफार परिचय करून घेतला. आता सर्व कादंबऱ्यांच्या परिशीलनातून जाणवणारी काही समान वैशिष्ट्ये अन् मर्यादा यांची थोडक्यात नोंद करणे अप्रस्तुत ठरणार नाही असे वाटते.

देसाईंच्या कादंबऱ्यांवर सहजपणे दृष्टिक्षेप टाकला तर आपणास असे दिसून येईल की, त्यांच्या कादंबऱ्यांचा 'पॅटर्न' जवळ जवळ पसरलेला असतो. एकसारखा वाटतो. हा पॅटर्न जवळ जवळ सर्वच कादंबऱ्यांमध्ये जाणवतो. 'समिधा' कादंबरी एक अपवाद म्हणून सोडली तर त्यांच्या पौराणिक, ऐतिहासिक कादंबऱ्यांत हेच चित्र उमटलेले असते. उदात्त आणि अनुदात्त, भोग आणि त्याग, क्षुद्रत्व आणि दिव्यत्व यांचा झगडा या व्यक्तींच्या जीवनात झालेला असतो. मग ती व्यक्ती पराभूत झाली तरी त्याच्याविषयी वाचकांच्या मनात नितांत आदर निर्माण झालेला असतो. तो नायक विजयी वा कृतार्थ झालेला असला तरी वाचकांच्या मनातला आदर कमी झालेला नसतो.

त्यांच्या कादंबऱ्यांत व्यक्त होणाऱ्या जीवनानुभवाला आणि विचारांना एक विशिष्टता लाभलेली आढळते. भारतीय पारंपरिक जीवनाचा उद्घोष त्यांच्या कादंबऱ्यांत आढळतो. हिंदू संस्कृती आणि धर्म, हिंदू समाजाचे आदर्श आणि भारतीय संस्कृतीने गौरविलेल्या गोष्टींविषयीचा आदर, त्यांच्या कादंबऱ्यांत आपणाला जाणवतो. अर्थात यात दोष आहे, अशातला भाग नाही. जीवनाचे जे रूप, जी बाजू लेखकाला व्यक्त कराविशी वाटते, ती त्याने जरूर करायला हवी. देसाई यांनी या प्रकारे भारतीय संस्कृतीचा गौरव आणि सनातन जीवनमूल्यांचा उद्घोष आपल्या कादंबऱ्यांतून केला, म्हणून त्या प्रतिगामी आहेत असा याचा बिलकुल अर्थ नाही. किंबहुना ज्याला आपण जीवनाचे आदर्श नि उच्च रूप मानतो, तेच त्यांच्या चिंतनाचा अन् अभिव्यक्तीचा विषय होत असले तर बिघडले कुठे? नाहीतरी कोणताही साहित्यिक जीवनाच्या साक्षात्कारासाठीच हातात लेखणी घेत असतो! फरक इतकाच की येथे नवसाक्षात्कार असा फारसा घडत नाही; पण परंपरा, पूर्व

अभिमान या गोष्टींनी वाचकांची मनोभूमी संस्कारित करणारे जे लेखक आहेत, त्यात देसाईंचा आवर्जून उल्लेख करायला हवा. कदाचित यामुळेच मध्यमवर्गीय वाचकांत त्यांच्या कादंबऱ्या विशेष लोकप्रिय आहेत.

त्यांनी आपल्या कादंबरीमध्ये सातत्याने प्रयोग केले आहेत. कादंबरीला नवेपण देण्याचा प्रयत्न साधलेला आहे. 'स्वामी' ही ऐतिहासिक कादंबऱ्यांमध्ये युगप्रवर्तन करणारी कादंबरी आहे. 'श्रीमान योगी' ही एक प्रचंड अशी चरित्रकहाणी आहे. भटक्या आदिवासी जमातीवर, दलितांवर होणाऱ्या सवर्णांच्या अत्याचारांविषयी तसेच ग्रामीण परिवर्तनावर, पौराणिकतेचा नवा अर्थ नि अन्वयार्थ लावणाऱ्या कादंबरीचे ते जनक म्हणता येतील. तेच पहिले साहित्यिक म्हणता येतील. याशिवाय चित्रकला, संगीत यासारख्या कलांचा आविष्कार करणाऱ्या कादंबऱ्याही त्यांनी निर्माण केलेल्या आहेत. म्हणून वाचकांची अभिरुची समोर ठेवून लेखन करण्यापेक्षा त्या अभिरुचीला सुसंस्कारित करण्याच्या हेतूने त्यांनी लेखन केलेले आहे असेच म्हणता येईल. 'माझा गाव' या कादंबरीच्या संबंधी प्रा. आनंद यादवांना त्यांनी जी मुलाखत दिली, त्यात त्यांनी वाचकांना काही तरी द्यावे, त्यांची अभिरुची सुसंस्कारित करावी, वाचकांच्या मनावर आदर्शाचे संस्कार घडवावेत अशी आपली भूमिका असते, असे त्यांनी म्हटलेले आहे.

वैशिष्ट्यपूर्ण व दर्जेदार कृती असूनही ती कमालीची लोकप्रिय होऊ शकते. नव्हे त्यामुळेच ती लोकप्रियता संपादन करते. देसाई यांच्या कादंबऱ्या या जातीच्या आहेत. त्या वाचकांच्या कामुक अन् अपरिपक्व अशा शारीर भावनांना गुदगुल्या करून त्यांची सवंग करमणूक करणाऱ्या नाहीत. अन् अद्‌भुत प्रसंगनिर्मिती करून वाचकांना दोन घटका स्वप्नील वातावरणात नेणाऱ्या कादंबऱ्या नाहीत. पाव शतक उलटून गेलेले असले तरी 'स्वामी'ची लोकप्रियता आजही पूर्वीइतकीच आपणाला जाणवते, यात केवळ सवंग करमणुकीचे सामान्य प्रयोजन नाही याची जाणीव व्हावयास हवी. माणसाला पूर्णत्व देणाऱ्या संस्कारांची कधीही न संपणारी संपत्ती– श्रीमंती दो दो हातांनी रसिकांना देण्याची क्षमता जोपर्यंत त्यांच्या कादंबऱ्यांत आहे, ओतप्रोत भरलेली आहे, तोपर्यंत वाङ्‌मयाच्या क्षेत्रात कोणतेही वाद उत्पन्न झालेले असोत – कोणताही संप्रदाय अधिराज्य गाजविणारा असो– त्यामुळे निष्प्रभ होणारी रणजित देसाई यांची कादंबरी असणार नाही. त्या क्षणीही ती याच प्रकारे रसिकांना वेड लावेल असे वाटते. निदान आज तरी या सत्याचा आपणाला प्रत्यय येतो आहे.

❖

पद्मश्री रणजित देसाई यांची साहित्यसंपदा

रणजित देसाई यांची सर्व पुस्तके
eBooks स्वरूपात उपलब्ध

कादंबरी	**किंमत**
स्वामी	२५०
(राज्य पुरस्कार १९६२, ह.ना. आपटे पुरस्कार १९६३, साहित्य अकादमी पुरस्कार १९६४)	
श्रीमान योगी	५४०
अभोगी	२२०
राधेय	२२०
पावनखिंड	१५०
माझा गाव	२५०
समिधा	१४०
बारी	१८०
राजा रवि वर्मा	३२०
प्रतीक्षा	१४०
शेकरा	०९०
लक्ष्यवेध	१४०

कथासंग्रह	**किंमत**
मोरपंखी सावल्या	९०
संकेत	९०
कातळ	१००
आषाढ	१००
मधुमती	११०
मेख मोगरी	११०
रूपमहाल	१२०
वैशाख	१२०
मेघ	१३०
प्रपात	१४०
कमोदिनी	१५०
आलेख	१६०
गंधाली	१६०
बाबुलमोरा	१८०

नाटक / एकांकिका	**किंमत**
कांचनमृग	४०
श्रीमान योगी	६०
हे बंध रेशमाचे	७०
संगीत तानसेन	७०
सावली उन्हाची	७०
पंख जाहले वैरी	८०
तुझी वाट वेगळी	८०
रामशास्त्री	९०
धन अपुरे	९०
पांगुळगाडा	९०
वारसा	९०
स्वामी	१००
लोकनायक	१००
गरुडझेप (रणजित देसाई आणि वसंत कानेटकर)	१२०

ललित	**किंमत**
स्नेहधारा	१६०
संचित	१००
(निवडक अध्यक्षीय भाषणे)	

जीवनासक्त संन्यासी

– आनंद यादव

(रविवार सकाळ,८ मार्च १९९२)

दादांच्या कथा-कादंबरीतील निवेदने जशी वेधक असतात तशीच प्रत्यक्षात प्रसंग सांगण्याची दादांची निवेदनशैलीसुद्धा मार्मिक आहे. हा लेखक लेखन करतो म्हणजे सहज सांगत जातो. सांगण्याचा खटाटोप करीत नाही.

रणजित देसाई हे नाव 'बारी' 'माझा गाव' या प्रसिद्ध आणि ग्रामीण कादंबऱ्यांचे लेखक म्हणूनच माझ्या मनात 'स्वामी'पूर्व काळात ठसले होते. नाजूक कलात्मक ग्रामीण कथा लिहिणारे लेखक म्हणून मला ते मनाने जवळचे वाटत होते. 'स्वामी' या युगप्रवर्तक ऐतिहासिक कादंबरीने त्यांना प्रचंड यश मिळवून दिले. महाराष्ट्राचे भूषण म्हणूनच सगळा महाराष्ट्र त्यांना ओळखू लागला. 'स्वामी'कार ही लोकपदवी त्यांना मिळाली. मग बाकीच्या सरकारी पदव्या आणि मानपत्रे मिळाली.

या पार्श्वभूमीवर प्रथम त्यांना पु. ल. देशपांडे यांच्याकडे पाहिले. भाई त्यावेळी 'ओल्ड मॅन अँड द सी'चे भाषांतर करण्यासाठी पुण्यात मुक्काम ठोकून होते, असे आठवते. मी त्यावेळी एक कोवळा उमेदवार लेखक या पलीकडे कोणीच नव्हतो. त्यामुळे कोपऱ्यातल्या एका खुर्चीत जिज्ञासू मनाने या दोन महान साहित्यिकांची संगीतावरची चर्चा ऐकत मुकाट बसलो होतो. मला प्रथमच कळले, की देसाई संगीताचेही जाणकार

आहेत. पु. लं. च्या बरोबर संगीतावर चर्चा करण्याइतकी त्यांची जाणकारी आहे. मला त्यांच्या संगीताचा संदर्भ असलेल्या अनेक कथा आठवत होत्या. मधे काही वर्षे गेली आणि दरम्यान रणजित देसाई आणखी मोठे साहित्यिक झाले. 'श्रीमान योगी'चा शिरपेच त्यांच्या मुकुटात चढला. त्यांनी नाटके लिहिली. पद्मश्री झाले. कथा-कादंबऱ्यांचे लेखन चालू होतेच. अशा काळातच काही कारणामुळे रणजित देसाई यांची सगळी पुस्तके अनिलकुमार मेहतांच्या प्रकाशन संस्थेकडे आली. श्री. मेहता आणि मी विद्यार्थी दशेपासूनचे मित्र. ते माझेही प्रकाशक. त्यांनी एक योग घडवून आणला. रणजित देसाई काही कामासाठी पुण्यात आले होते. कामे आटोपून ते कोवाडला परतणार होते. अनिल मेहता त्यांना घेऊन जाणार होते.

मेहता आदल्या दिवशी मला म्हणाले, 'उद्या दादांना कोवाडला पोहोचवून गाडी परत येणार आहे. तुम्ही बरोबर चला. गाडीतून परत या.'

'मी कशाला येऊ?'

'गप्पा मारायला.'

'दादांशी गप्पा मारायला मला आवडेल. त्यांना लेखक म्हणून समजून घेण्याची खूपच जिज्ञासा मला आहे; पण त्यांना ते आवडेल का?'

'न आवडायला काय झालं? त्यांनीच तर सुचवलं यादव येतात का बघ म्हणून.'

'मग येतो.' अनायासे कामाला सुट्टी होती. त्यांच्या - माझ्या यापूर्वी ओझरत्या दोन-तीन भेटी झाल्या होत्या. माणूस म्हणून मला ते प्रत्येक भेटीत जास्त जास्त आवडत गेले होते. त्यांना आतून उलगडून पाहण्याची मला तीव्र इच्छा झाली होती. या निमित्तानं ती संधी आली. ते जसे उलगडत जातील तसे वाचून घेत जायचं हे मनाशी निश्चित करून मी गाडीत बसलो.

पाच-सहा तासांच्या प्रवासात खूप गप्पा झाल्या. मोठेपणाचा त्यांनी कोणताही नाटकी पवित्रा न घेतल्यामुळे स्वाभाविकरीत्या तासाभरातच जवळीक निर्माण होत गेली. माझ्या लक्षात आलं, की दादा खूप गप्पिष्ट आहेत. त्यांची स्मरणशक्ती खूप तल्लख आहे. बारीकसारीक गोष्टी त्यांच्या चांगल्याच लक्षात राहतात. प्र. के. अत्रे, बाळासाहेब देसाई,

यशवंतराव चव्हाण, भाऊसाहेब खांडेकर, वसंतराव देशपांडे यांच्याविषयी त्यांच्या मनात नितांत आदर आहे. त्यांच्या अनेक आठवणी आणि किस्से त्यांच्याजवळ खजिन्यासारखे आहेत. हा खजिना उपसला तर या व्यक्तींच्या स्वभावावर, व्यक्तिमत्त्वावर कितीतरी प्रकाश पडण्यासारखा आहे. या व्यक्तींच्या स्वभावाचे, वर्तनाचे अनेक मार्मिक प्रसंग दादांनी मनात संवादातल्या वाक्यरचनेसह, त्यातील नाट्यासह टिपून ठेवलेले आहेत.

दादांच्या कथा-कादंबरीतील निवेदने जशी वेधक असतात तशीच प्रत्यक्षात प्रसंग सांगण्याची दादांची निवेदनशैलीसुद्धा मार्मिक आहे. हा लेखक लेखन करतो म्हणजे सहज सांगत जातो. सांगण्याचा खटाटोप करीत नाही. एकाच वेळी दादांच्या मनात या महान व्यक्तींविषयी आदर, भक्तिभाव, श्रद्धा आणि त्यांच्या स्वभावाची पारख करण्याची मार्मिक शक्ती, बौद्धिक खट्याळपणा, विनोदबुद्धीही वसत आहे... सबंध प्रवासभर दादांनी या व्यक्तींच्या मोठेपणाचे आणि रागलोभादी मानवी भावभावनांचे, ईर्षा-जिद्दीचे किती प्रसंग आणि किस्से सांगितले. मी आणि मेहता चकित होऊन तर कधी खो-खो, खो हसत ऐकत होतो.

नंतर भेटी वाढत गेल्या. दादांच्या अभिजात कल्पकतेचा मला प्रत्यय येत गेला. 'इसापनीती'त जशा प्राण्यांच्या उपदेशात्मक रूपक कथा असतात, तशा नव्या प्राणीकथा दादा सहजासहजी रचून सांगतात. त्यांचा सांधा आधुनिकतेशी सही सही जोडलेला असतो. मद्य प्यायल्यावर कोल्ह्याचा वाघ आणि वाघाचं मांजर कसं होतं आणि प्रत्येक जण आपला स्वधर्म विसरून कसा वागू लागतो याची प्राणीकथा दादांच्या तोंडूनच ऐकावी. विलक्षण कल्पकतेनं भरलेली ती कथा ऐकून मी थक्क झालो.

त्यांनी राजा रवि वर्मा या प्रसिद्ध चित्रकाराच्या जीवनावरील कादंबरी पूर्ण केली. रवि वर्माच्या मिळणाऱ्या ढोबळ माहितीत त्यांनी जागोजागी कसे कल्पकतेने प्राण ओतले आहेत आणि नवे नवे प्रसंग निर्माण करून त्यांच्या कलावंत व्यक्तिमत्त्वावर कसा प्रकाश टाकला आहे, हे दादांच्या तोंडून ऐकताना तीन तास वेळ कसा निघून गेला हे मला कळलं नव्हतं.

'स्वामी', 'श्रीमान योगी', 'राधेय' या ऐतिहासिक आणि पौराणिक कादंबऱ्यांत त्यांनी असे कल्पकतेने खूप नवेनवे प्रसंग भरलेले आहेत

२ री आवृत्ती

त्यांची विचारसरणी,
त्यांच्या करामती आणि ठकबाजी

ख्यातनाम इतिहासकार



मूळ लेखक - **अरुण शौरी**

अनुवाद - **सुधा नरवणे**

किंमत : २५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

ज्या कालखंडाविषयी लोकांना अभिमान वाटतो. ज्याविषयी विश्वास वाटतो त्या काळातील व्यक्ती आणि संस्थांवर टीकास्त्र चालवा...
असहिष्णुता दाखविणाऱ्यांना महानता बहाल करून त्यांच्यात सहनशीलता दाखवा...
सर्वसमावेशक, खुल्या परंपरा इतरांना गिळंकृत करण्यासाठी आहेत असे चित्रण करून एकसत्ता मानणारी, विशिष्ट वर्गासाठी असलेली विचारसरणी उदारमतवादी, शांतताप्रिय आणि सहिष्णु आहे असे म्हणा... तुमच्या विधानांना पुरावे मागणाऱ्यांना 'जातीयवादी' ठरवून त्यांचा धि:कार करा... जुलुमशहांच्या तत्त्वांमुळे बळी गेलेल्यांनाच दोषी ठरवा...साम्राज्यवादी सत्ताधाऱ्यांना मदत दिलेल्या कॉम्रेड मंडळींना पाठीशी घाला...
राष्ट्रीय चळवळीतील नेते, सुधारक यांच्यावर चिखलफेक करा...
एकंदरीत, सदा सर्वकाळ सर्व संस्थांवर कबजा करा, सगळीकडून लाभ उठवा. आपली सत्ता राबवीत रहा...
आणि स्वत:चे कल्याण करून घ्या.

आणि त्या त्या भव्य पुरुषाच्या व्यक्तिमत्त्वात जाणवणाऱ्या त्रुटी त्यांनी भरून काढल्या आहेत. हा एवढाच विषय एखाद्या साहित्य समीक्षकाला पीएच.डी.च्या संशोधनासाठी पुरेसा होईल इतके आव्हान देणारा आहे. निर्मिती प्रक्रियेत कल्पकतेचे काय स्थान असते, ऐतिहासिक, पौराणिक साहित्यनिर्मिती करताना कल्पकता कशी वापरावी लागते, याची कल्पना या विषयावर दादांशी बोलताना येते. खरे तर आजच्या ऐतिहासिक, पौराणिक कथा कादंबऱ्यांच्या कारकुनी निर्मितीचा सुकाळ झालेल्या काळात ही गोष्ट समजून दिली तर पुढे चार चांगल्या ऐतिहासिक, पौराणिक कादंबऱ्या हाताला लागण्याची शक्यता आहे.

तसे दादा आपल्या मस्तीत दंग असत. मराठी टीकाकारांनी दादांचे अभिजात साहित्य कधीच नीटपणे समजून घेतले नाही. कौतुक झाले पण जुजबी. अभ्यासू मनाने दादांच्या साहित्याचे अंतरंग अजून कोणाही टीकाकाराने गंभीरपणे पारखले नाही. दादांच्या कादंबऱ्यांतील प्रमुख व्यक्ती या प्राप्त समाजावरची विविध अंगांनी केलेली कलात्मक भाष्ये असतात, हे त्यांच्या कादंबऱ्या वाचताना अनेक अंगांनी लक्षात येते. भारतीय आणि मराठी समाजव्यवस्थेचे उभे-आडवे छेद म्हणजे दादांच्या कादंबऱ्या आहेत; पण हे पढीक टीकाकारांच्या लक्षात आलं नाही म्हणून दादांचं काही अडलं नाही. मराठी रसिक वाचकांनी दादांच्या साहित्यावर अलोट प्रेम केलं आहे आणि त्यांच्यावर पत्रांचा पाऊस पडला आहे. आपण समजतो तसे सगळेच रसिक काही भाबडे नसतात, हे त्यांच्या पत्रांत असणाऱ्या भिन्न भिन्न प्रकारच्या वाङ्मयीन मुद्यांवरून, त्यांच्या मतप्रदर्शनावरून स्पष्ट दिसून येतं. उलट पत्रे पाठविणारा वाचक हा अकलुषित, पूर्वग्रहविरहित, प्रांजळ आणि सरळ मनानं लिहित असतानाच प्रत्ययाला येते.

'कोवाड'सारख्या महाराष्ट्राच्या सीमेवरच्या कोपऱ्यातील एका छोट्या खेडेगावी त्यांचं वास्तव्य होतं. पाळीव पशु-पक्ष्यांनी भरलेलं मोठं खानदानी घर आणि भोवताली वीसभर एकरांचा अनेक फळझाडांनी, पिकांनी, वेलीवृक्षांनी हिरव्या सरोवरासारखा हिंदोळणारा मळा. घरात कलावंत-मनाचा आविष्कार दाखविणारी पेंटिंग्ज , चित्रे, पाश्चात्त्य-पौर्वात्य ग्रंथांनी समृद्ध झालेलं ग्रंथालय आणि सौंदर्यदृष्टीच्या खुणा पटविणाऱ्या

अनेक कलात्मक वस्तू जागोजागी दालनादालनात दिसतात. दादांचं संगीत, चित्रकला, साहित्य, समाज, इतिहास, पुराण, सुधारणा, विज्ञान, सौंदय यांविषयी सारखंच प्रेम पाहून मला वाटलं, आपल्या महाराष्ट्राचा रविंद्रनाथ टागोर 'कोवाड'च्या शांतिनिकेतनात वस्ती करून आपल्या कलानंदात रममाण झालेला आहे. नरहर कुरुंदकरांपासून ते वसंतराव देशपांड्यांपर्यंतची साहित्य-संगीताच्या क्षेत्रातील अनेक मातब्बर मंडळी या शांतिनिकेतनच्या निवांतपणाचा आस्वाद घेऊन विसावून गेलेली आहेत.

एखादी उदास संध्याकाळ वाङ्मयीन चिंतनात जाते. दादांनी इंग्रजीतील अभिजात वाङ्मय सातत्यानं वाचलेलं असतं. मोठमोठे साहित्यिक पचवलेले असतात. बंगालीतील शरदबाबू आपलासा करून घेतलेला असतो. त्यामुळे कलेविषयीचं चिंतन भरपूर झालेलं असतं. राजा रवि वर्माचं लेखन या कलाप्रेमातूनच झालेलं असतं. साहित्यिक साहित्य का निर्माण करतो? माणसाला कलेची भूक का लागते? जीवन आणि कला यांचा संबंध कोणत्या प्रकारचा आहे? पात्रनिर्मिती कशातून होते? कलावंत कलेत काय शोधू पाहतो? एक ना दोन असे अनेक प्रश्न ओघाओघात चर्चिले जातात. दादांच्या मधला एक गूढकलावंत अंधुकसा उलगडत जातो.

स्वातंत्र्योत्तर काळात जुनं खेडं झपाट्यानं बदलत आहे; तसं अनेक कारणांनी ते कंगालही होत चाललं आहे. त्यामुळं गोरगरीब, बेरड-रामोशी इत्यादी मंडळी जनमोजन्मी ज्या खेड्यात राहिली होती तेच खेडं आता केवळ पोट जाळण्यासाठी सोडत होती. ते उदास, ओसाड, उद्ध्वस्त खेडं पाहून हाय खाल्लेला 'बारी'तील तेग्या बेरड, पोटच्या पोराला खुनाच्या आरोपातून वाचविणारे आप्पासाहेब इनामदार शेवटी गावाच्या संरक्षणासाठीच दरोडेखोरांच्या हल्ल्यात जीव ठेवतात. 'माझा गाव' मधील आप्पासाहेबांचे हे कर्तव्यदक्ष पण इनामदारी रुबाबाचे पात्र; जुनी समाजव्यवस्था बदलण्यासाठी जिवाचा आटापिटा करणारा आणि शेवटी समाजव्यवस्थेलाच घरादाराच्या सारसर्वस्वाचा बळी देऊन असहायपणे हातपाय गाळून बसलेला दलित समाजातील तुका (समिधा), किंवा 'राधेय' मधील जन्मभर मित्रकर्तव्यात कमी न पडलेला अंगराज कर्णही

शेवटी मातृप्रेमानं आणि बंधूप्रेमानंच धारातीर्थी मरण पत्करतो; राज्याच्या कल्याणासाठी वैयक्तिक जीवनसुखावर पाणी सोडणारे 'स्वामी' मधील थोरले माधवराव पेशवे आणि तेवढ्याच धैर्यानं आणि पतिप्रेमानं सती जाणारी माधवरावांची पत्नी रमा, 'श्रीमान योगी' तील स्वराज्य स्थापन करणारे, महाराष्ट्रासाठी सारे जीवन वेचणारे, त्यासाठी लाख मोलाची शेकडो माणसे मिळविणारे आणि अखेरचे क्षण मोजीत असताना मात्र आपण शेवटी फार फार एकाकी राहिलो, एकटे राहिलो, अशी व्यथा-वेदना व्यक्त करणारे श्रीमंत शिवाजी महाराज; ही सारीच पात्रे शेवटी दादांच्या व्यक्तिमत्त्वाचे अंश असतात किंवा अंशात्मक दादाच असतात. विविध रूपांत ते जणू वावरत असतात.

दादांची पात्रे या ना त्या कारणानं स्वत: खूप खूप झिजून इतरांना सुख देण्याचा प्रयत्न करतात. आयुष्यभर इतरांसाठी सतत काहीतरी करीत राहिलेला दादांचा आत्माच जणू इथे स्पंदन पावत असतो. दादा असे श्रीमान योगी, जीवनासक्त संन्यासी होते. माणसाला जीव लावणारे, त्याच्यातच रमणारे, त्यांच्याच विविध रूपांचा तन्मयतेनं शोध घेणारे, लेखणीच्या कांडीने मानवी जीवनाची किमया समजून घेणारे; तरी पैसा, प्रतिष्ठा, प्रसिद्धी याच्यातून मनाने मुक्त झालेले आणि साहित्यप्रयोगात रमलेले दादा अशा उदास संध्याकाळी निळ्या विस्तीर्ण आकशाखालच्या सखोल विशाल, अथांग सागरासारखे वाटू लागत. शब्दांच्या घागरीत ते भरता येणं अशक्य असतं. शेवटी घागरीच थकून जातात.

रणजित देसाई यांना अनेक मित्र लाभले. साहित्य, चित्रपट, नाट्य, राजकारण, समाजकारण, पत्रकारिता, क्रीडा अशा विविध क्षेत्रांत त्यांचा गोतावळा होता. त्यापैकीच साहित्य क्षेत्रातील डॉ. आनंद यादव आणि मृत्युंजकार शिवाजी सांवत हे त्यांच्या घरोब्याच्या संबंधातले. त्यांनी वाहिलेली शब्दरुप आदरांजली...

❖

४ थी आवृत्ती

सागरतीरी



मूळ लेखक - **ध्रुव भट्ट**

अनुवाद - **अंजनी नरवणे**

किंमत : १६०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

रात्री त्या शेतकऱ्याच्या कुटुंबात मी राहिलो. खुल्या आकाशाखाली काथ्याच्या खाटेवर पडल्या पडल्या मी विचार करत होतो.

दोन-तीन दिवसांपूर्वी तर मी माझ्या परिचित वातावरणात माझ्या आप्तेष्टांबरोबर होतो. आज या अगदी नवख्या जागेची ओळख झाली. एका संध्याकाळच्या या ओळखीत असं काही अनुभवलं जे माझ्या आयुष्याचा न विसरणारा भाग बनून गेलं. छोटी जानकी माझी जणू खूप वर्षांच्या ओळखीची वाटू लागली! उद्या मी इथून पुढे जाईन, पुन्हा कधी या सगळ्यांना भेटेन की नाही तेही ठाऊक नाही.

जानकी, वालबाई अन् तिचा नवरा यांचा निरोप घेताना मला वाईट वाटेल का? वाईट कदाचित् नाही वाटणार पण उदास नक्की वाटेल. असं का होतं? एवढ्याशा ओळखीत एवढी जवळीक वाटणं हे माझ्या नागरी संस्कृतीत बसतच नाही, माझ्या संवर्धनात अशा वाटण्याला जागाच नव्हती, मग या इवल्या दुनियेबद्दल मला का एवढी जवळीक वाटतेय?

स्मृतिगंध



जना-वनातला माणूस

-व. दि. कुलकर्णी

('लोकमत'चा १९९९चा 'व्यंकटेश माडगूळकर गौरव अंक' यातून साभार)

माडगूळकर माणसातून माणसापलीकडचा माणूस पाहतात... निसर्गातून निसर्गापलीकडचं शक्तिरूप पाहतात. त्यांनी माणूस निसर्गापासून कधी तोडला नाही.

माडगूळकर सुकाळा-दुष्काळातल्या सुख-दु:खाकडं तन्मयतेनं, पण निर्लिप्तपणानं पाहतात, हेच कलावंताचं इमान! माडगूळकर जे जगतात तेच आपल्याला देतात. अशा ताकदीने देतात की आपणही ते नकळत जगू लागतो...

माडगूळकरांना मी प्रथम पाहिलं ते पुण्यात फर्ग्युसन कॉलेजमध्ये. तिथं 'साहित्य-सहकार'मध्ये त्यांचं कथाकथन होतं. 'झेल्या'ची कथा ते सांगत होते. ते सांगणं नव्हतं; 'झेल्या' मूर्तिमंत उभं करणारं ते नाट्य होतं. ते खेडं, ती शाळा, ती पोरं, तो ओढा, ते चिंचेचं बन, तो झेल्या, त्याचं येणं, गुर्मीत पाहणं आणि मास्तरांचं प्रेमळ बोलणं-वागणं, बदलत्या झेल्याचं विरघळणं, मास्तरांना धरून राहणं, पडेल ते काम प्रेमानं करणं, मास्तर गाव सोडून निघाले तेव्हा अनावर रडू फुटणं... हे सारं सारं चलचित्रासारखं दृष्टीपुढून सरकत होतं.

माडगूळकरांच्या तोंडून कथा ऐकणं हा एक 'संपूर्ण अनुभव' असतो. माडगूळकर सर्वांगानं बोलतात... मुखातून शब्द बाहेर पडतात, ते मूळ

बोलीतले आघात घेत. लय-लकब, त्या बोलीच्या धाटणीची पक्की उच्चार-फेक, डोळे, भाव ओतणारे हात आणि हाताची बोटं हालचालीची गतिचित्रं रेखाटणारी, देह, मूळ कृतीबरहुकूम हलता-बदलता. आवाज हवा फिरता, तसा चढता-उतरता, थांबणं-पाहणंही तितकंच सूचक, पेळूतून सूत निघावं तसं हे कथन निघत राहतं, आणि तिची भाषा मिळत राहते ती आईच्या दुधासारखी, विनासायास. माडगूळकरांचं कथाकथन म्हणजे एकपात्री नाट्यदर्शनच. माडगूळकरांनी अशी कितीतरी कथाकथनं केली आहेत.

भरगच्च आनंद

ही पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट. मी त्यावेळी बी.ए. शिकत होतो. माझं शिक्षण मध्येच थांबे; पुन्हा सुरू होई. यामुळं हा योग माझ्या कॉलेज शिक्षणाच्या तिसऱ्या फेरीत आला. याचा एक फायदा झाला. कवीच्या तोंडून कविता ऐकावी, तसंच कथालेखकाच्या तोंडून कथाही ऐकावी. बापूसाहेब माटे आपली कथा कशी झोकात सांगायचे. ज्या बोलीत कथा येते, त्या बोलीची एक ऐट असते; तिचा एक झोक असतो; तो अनुभवल्याशिवाय, मूळ अनुभव प्रतीत होतच नसतो. माझं एक बरं होतं. मला ही माणदेशी बोली परकी नव्हती, की माणदेशही परका नव्हता. मी खास माणदेशी नसलो तरी जवळपासचा,तशाच दुष्काळी भागातला. बाभळबनं, बोरीची बनं, शेळ्या-मेंढ्या, माकडं नित्याची होती. बालपण खेड्यातच गेलेलं. गावगाडा, अलुतेदार-बलुतेदार चांगले माहीत. तेव्हा माडगूळकरांच्या गोष्टी मला पुन:प्रत्यय देत; नवा प्रत्ययही घडवीत. 'माणदेशी माणसं' माझ्याकडं माझी बालपणची गावाकडची माणसं घेऊन येत आणि आणखी कितीतरी बरोबर आणत. सुतार, लोहार, महार, वडार, तेली, गुरव हेही येत. धनगर वस्ती तर आमच्या शेजारीच होती. धनगराची पोरं आमच्याकडची कुत्र्याची पिलं घेऊन जात, आणि तिथलं मेंढीचं दूध पिऊन पिलं परत येत. माडगूळकरांच्या कथा मला पुन:प्रत्यय-नवप्रत्ययाचा दुहेरी आनंद देत.

पुढं पुण्यात सर परशुराम भाऊ कॉलेजमध्ये व्याख्याता म्हणून मी लागलो, तेव्हा 'माणदेशी माणसं' शिकवण्याचा योग आला. शिकवण्यात मी रंगून जात असे. त्यावेळचे विद्यार्थी भेटले म्हणजे अजूनही 'माणदेशी

माणसा'ची हटकून आठवण करून देतात. ही आठवण माझ्या शिकवण्याची तारीफ म्हणून ते करून देतात; पण मी ती मानतो माडगूळकरांची तारीफ. मुळात साहित्य उत्तम असेल तरच शिकवणारा त्यात रंगून जाईल ना! माडगूळकरांची 'बनगरवाडी' ही शिकवण्याचं भाग्य मला लाभलं. तो आनंद अगदी भरगच्च होता.

'बनगरवाडी' ही एका मूठभर गावाची कहाणी; पण काळजात कायमचं घर करून राहणारी. या कादंबरीत काय नाही? निसर्गाचे शाप आहेत; वर आहेत. वरानं फुलणारी आणि शापानं दग्ध होणारी ही धनगरवाडी! पिढ्यान् पिढ्या तीच राहणी; त्याच समजुती-श्रद्धा. गावगाडा असा नव्हताच.

जो काही होता तो अर्धवट; मोडकळीस आलेला. तोच सूर्य, तीच रात्र वर्षानुवर्षे अनुभवणारी ती वाडी.

'कारभारी' थोडा समजूतदार, शहाणा. गाव त्याला मानी. ही एवढीच जमेची बाजू. या गावातल्या मानवी मनांची आणि एकूणच जिण्या-जगण्याची चित्तरकथा म्हणजे ही कादंबरी. इथं राजनिष्ठा आहे. देवधर्म आहे; पाप आहे, पुण्य आहे; लांडीलबाडी आहे; घातपात आहे; तसंच माणूसधर्मही आहे. काळी माती, मेंढरं आणि घरकुटुंब या पलीकडं काही जगणं असतं, याची जाणही नसलेलं हे खेडं! ही आदिमानवाचीही कहाणी नाही, की ग्रामीण जीवनाचीही कर्मकथा नाही. धड ही मेंढराची, मेंढपाळाचीही कथा नाही. इथलं जीवनरसायन काही वेगळंच आहे. माडगूळकर ते जगतात आणि जगलेलं ते आपणांस देतात. अशा ताकदीनं देतात की आपणही ते नकळत जगू लागतो. नाहीतरी आपण साहित्यकृतीचा आस्वाद घेतो म्हणजे काय करतो? त्या साहित्यिकाच्या संगतीत राहून त्याच्याबरोबर त्याचे अनुभव अनुभवतो, हेच की!

'बनगरवाडी'चं जग हे टीचभर जग; पण या टीचभर जगाच्या वाडीचे ठोके सारं जग ऐकत राहिलं आहे. सर्व भारतीय भाषांत, इंग्रजी-डॅनिश-जर्मन भाषांत ती भाषांतरित झाली आहे. तिचा बोलपटही निघाला आहे. तिचा भूप्रदेश लहान असला, तरी तिचं काळीज मूळ जीवन चैतन्यानं स्पंदन पावत असलेलं जाणवतं. देश, काल, जाति-धर्म, भाषा, परिस्थिती यांच्या भिंती अशा तलस्पर्शी कलाकृतींना नसतात. माडगूळकर इथं कसलंही सामाजिक, धार्मिक, आर्थिक भाष्य करत नाहीत; ते स्वत:चं

काही बोलतच नाहीत. साक्षीभावानं सगळं पाहतात आणि आहे ते, आहे तसं, चित्रितात; पण हे 'पाहणं' एका जाणत्या कलावंताचं पाहणं असतं. ते माणसांतून माणसापलीकडचा माणूस पाहतात; निसर्गातून निसर्गापलीकडचं शक्तिरूप पाहतात. 'बनगरवाडी'मध्ये केवळ माणसांचं जग ते चितारत नाहीत, तर पशु-पक्षी, कीटक; वृक्ष-वनस्पती, ऊन-वारा-पाऊस यांचीही विविध रूपे रेखाटतात. त्यांनी माणूस निसर्गापासून कधी तोडलेला नाही. माणूस हा निसर्गाचाच अंगभूत भाग आहे, आणि 'बनगरवाडी' तर निसर्गाच्या आधीन आहे. तिचं स्वाधीनचं- हातातलं जेवढं जीवन जगणं आहे, तेवढ्यापुरता कुणी तिचा 'कारभारी' असतो; पण खरा 'कारभारी' तो असतो- जो पाऊस पाणी देतो; नाही तर रडायला डोळ्यांत पाणी ठेवत नाही, असा दुष्काळ पाडतो. माडगूळकर सुकाळा-दुष्काळातल्या सुखदु:खाकडं, तन्मयतेनं पण निर्लिप्तपणे पाहतात. हेच कलावंताचं इमान! बापूसाहेब माटे यांच्या 'उपेक्षितांचे अंतरंग' मधील कथांचा मार्ग वेगळा. माडगूळकरांची कथा आपल्या स्वतंत्र, स्वायत्त कलामार्गानं चाललेली दिसते. खेडी बदलली तरी ह्या कथांचे रंग बिघडत नाहीत; विटत नाहीत. त्यातील कलावंताचा माणूस हा देशकालाशी बांधलेला नसतो; तो केवल-रूपात असतो.

प्रकृतीच्या आदिम रूपाकडे

माडगूळकर आणखी निखळ कलावंत होतात ते आपल्या 'अरण्यकथां'मध्ये! निसर्गच त्यांच्या जिवाभावाचा विषय होतो. नगरी-महानगरी ही माडगूळकरांची कर्मभूमी झाली; पण या नगरसंस्कृतीचं आणि नागरजीवनाचं त्यांना वेड कधीही लागलं नाही. ते पुढं खेड्याकडं वळले नाहीत; पण जंगलाकडं, अरण्याकडं मात्र वळले. तिथं प्रकृतीची आदिम रूपं उघडपणे हिंडताना त्यांना दिसली. चिलखती अंगाचे प्रचंड गेंडे त्यांना भेटले; गेंडा आणि हत्ती यांचं बलाबल त्यांना पाह्यला मिळालं. कांचनमृगांचे कळप आणि वानरांच्या टोळ्या दुरून आणि जवळून ते पाहतात. गवे एकमेकांची ताकद कशी अजमावतात याचं चित्तथरारक नाट्य ते अनुभवतात. पाणपक्ष्यांचे, करकोच्यांचे थवेच्या थवे त्यांच्या नजरेसमोरून जातात. वाघ-लांडगे आणि हरिण-काळवीट एकमेकांच्या नजरेच्या टप्प्यात येताच भयाकुलता आणि क्रौर्य यांचं संमिश्र भावदर्शन ते

घेतात. शिकारीचा छंद सोडून, बंदुकीच्या ऐवजी हाती कॅमेरा आणि स्केचबुक घेऊन जंगलात हिंडणारे माडगूळकर 'जंगल'चेच जणू रहिवासी होतात. ही दुनिया त्यांना अंतरंगातली दुनिया वाटते. ज्या बारीक नजरेनं त्यांनी माणदेशी माणूस पाहिला– अनुभवला, त्याच बारीक नजरेनं त्यांनी हे जंगलचे जीव पाहिले, अनुभवले; त्यांची रेखाटनं केली. त्यांना शब्दचित्रित केलं. माडगूळकरांच्याकडं अशा रेखाचित्रांचे ढीग आहेत.

मुंबईत असताना पारल्यात लोकमान्य सेवा संघामध्ये माडगूळकरांची जाहीर मुलाखत घेतली, तेव्हा त्यांच्या अरण्यकथा, जंगलातल्या दिवसांच्या कहाण्या प्रकाशात आल्या नव्हत्या; पण पुढं पुण्यात 'मॅजेस्टिक गप्पां'मध्ये त्यांची व मारुतराव चितमपल्ली यांची मुलाखत घेण्याचा योग आला. त्यावेळी पशुजीवनाचं, पक्षीजीवनाचं, कृमिकीटकांचं, वृक्ष-वनस्पतींचं, पाना-फुला-फळांचं, सूर्योदय-सूर्यास्ताचं, चंद्र-चांदण्याचं, घनदाट-अंधाराचं, रातकिड्यांच्या सूर-संगीताचं, निर्मनुष्य वस्तीचं, भयाण एकांताचं आणि आश्वासक नि:स्तब्धतेचं दर्शन इतक्या उत्कटतेनं त्यांनी आम्हाला घडवलं की आम्ही जंगलचा 'सर्करामा'च अनुभवला. आजवर नांगरवाल्यावीण पडलेली ही जंगलभूमी माडगूळकरांनी नांगरून-पिकवून मराठी साहित्यात वनशोभा अवतरविली.

माडगूळकरांचं ग्रंथालय मोजक्या आणि महत्त्वाच्या ग्रंथांनी भरलेलं आहे. त्यात निसर्ग, रानं-वनं, पशू, पक्षी, कीटक यांच्यावरील पुस्तकं भरपूर आहेत. हे सारे ग्रंथ इंग्रजीतले आहेत. कबीर-तुकारामादी संत आणि मनु-कौटिल्यादी जीवनदर्शनकारांची ग्रंथसंपदाही तिथं आहे. ज्ञानकोश, संदर्भकोश, रियासती आहेत. जीवनाचा अर्थ तळाशी जाऊन पाहण्याची प्रवृत्ती माडगूळकरांच्या चिंतनात आढळते. पुण्यात 'प्रभात रोड'ला राहायला आल्यापासून माडगूळकरांच्याकडं जाणं मला सोपं जाऊ लागलं. रस्त्यावरही अनेकदा आमच्या गाठीभेटी होत. आमचे प्रामुख्यानं विषय 'जीवन जिज्ञासे'चे असत. कधी कधी मध्येच 'अथातो मृत्युजिज्ञासा' म्हणून बोलणं सुरू होई; आणि मानव आणि पशुसृष्टीतली मरणं ते कथन करू लागत. 'सत्तांतर' हे त्यातलं एक प्रकरण ठरावं! आदिमानवाच्याही आधीपासून, मानवाचे निकटचे पूर्वज जे वानर त्यांच्यापासून चालत आलेला सत्तासंघर्ष आणि त्याची मृत्युनाट्यात होणारी परिणती, यासंबंधी

२ री आवृत्ती

संहार

लेखक - **उमेश कदम**

किंमत : १४०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

जगाच्या पाठीवर एकही 'ज्यू' जिवंत राहता कामा नये.
जर्मनीच्या ॲडॉल्फ हिटलरची ही एकमेव महत्त्वाकांक्षा.
त्याचे हे स्वप्न प्रत्यक्षात आणले कर्नलरूडॉल्फ राईकमन याने.
ज्यूंच्या छळाचे, अत्याचाराचे नवनवीन प्रकार शोधून त्यांचा 'न भूतो न भविष्यती' असा भयंकर शेवट करणारा, 'ऑशवित्झ' या ज्यू छळछावणीचा सर्वेसर्वा!
या अत्याचारांतून सुदैवाने वाचलेल्या ज्यूंनी 'ईस्त्रायल' या राष्ट्राची निर्मिती केली आणि तीस वर्षांनंतर 'मोसाद' या गुप्तहेर संघटनेने राईकमनला नाट्यमय रीतीने जगासमोर आणले.
त्यातूनच आपल्यासमोर उलगडत जातो एक भयानक संहार...

बोलताना ‘नर आणि वानर’ एकमेकांत मिसळून जात आणि एक वेगळंच महाभारत डोळ्यांपुढं उभं राही. माडगूळकरांचं जीवन-चिंतन आणि कलासर्जन आशयदृष्ट्या स्वच्छ, मुक्त, खोल आणि अर्थघन असतं. मानवी जगाच्या तथाकथित संस्कृतीनं ते बांधलेलं नसतं. ते मोकळं (Born Free) असतं. माडगूळकरांच्या अरण्यकथा ही जणू आधुनिक आरण्यकं वाटू लागतात. ‘सत्तांतर’ हे एक बृहदारण्यक ठरावं!

माडगूळकरांना ‘निसर्गाचं लेकरू’ होऊन राहण्यातला आनंद परमोच्च पदाचा वाटतो. ‘नवेगाव बांध’ मधील डोमा नावाचा धीवर हे असंच एक निसर्गाचं लेकरू. त्याच्या डोळ्यांतलं निर्मळ हास्य बघून माडगूळकर अंतर्मुख होतात व मनाशी बोलतात, ‘‘कालिदास, ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्यासारखे महामानव ह्या भूमीवर झाले, म्हणून मला जसं कृतज्ञ वाटतं, तसं डोमासारखी साधीसुधी, सुखी, आनंदी माणसंही ह्या भूमीवर जन्माला आली, म्हणूनही वाटतं.’’ माडगूळकरांना ‘फॉरेस्ट हाऊस’ आणि ‘डाकबंगले’ अतिशय आवडत. सुखं आणि सोयी आपल्या निवासात कशा साध्या पण सुंदर असाव्यात, आणि एकांत असूनही एकटेपण तिथं कसं नसावं, हे डाकबंगल्यात राह्यल्यानं अनुभवास येतं. ही राहणी-जीवनसरणी त्यांना आदर्श वाटायची. त्यांनी आपला ‘अक्षर’ बंगला बराचसा त्या धर्तीवर उभारला. तरीही धायरीला ‘एक एकर जमीन’ घेऊन तिथल्या पर्णकुटीत जाऊन, राहून आल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे. तिथले पक्षी, वृक्ष-वल्ली, कृमी-कीटक, पीक-पाणी पाहून त्यांचा जीव हरखे. मुंगीचा जीव तो केवढा? पण तिच्यावर माडगूळकर काय कौतुकानं बोलतात. तेही एक ‘महाभारत’च. पुस्तकांपेक्षा झाडं माडगूळकरांना अमर वाटतात. ‘‘प्रत्येक झाड म्हणजे एक आकर्षक, सुंदर, नैसर्गिक वासतुशिल्पच असतं. प्रत्येकाची ढब वेगळी; प्रत्येकाचं रूप वेगळं,’’ हा प्रत्यय त्यांना जनातून विजनात नेतो; खरं म्हणजे ‘स्व-जना’त घेऊन जातो.

❖

व्यंकटेश माडगूळकर यांची साहित्यसंपदा

रणजित देसाई यांची सर्व पुस्तके

eBooks स्वरूपात उपलब्ध

कादंबरी	**किंमत**
छोटा जवान	४०
सत्तांतर	९०
वावटळ	९०
मंतरलेलं बेट	१२०
कोवळे दिवस	१४०
करुणाष्टक	१४०
जंगलातील दिवस	१७०
सुमीता (अनुवाद)	३५०

कथासंग्रह	**किंमत**
बेलवण	३०
एक एकर	७०
चित्रकथी	९०
वाळूचा किल्ला	९०
रानमेवा	९०
डोहातील सावल्या	९०
चरित्ररंग	९०
बाजार	११०
वाटा	११०
गोष्टी घराकडील	११०
जांभळाचे दिवस	१२०
हस्ताचा पाऊस	१२०
वारी	१२०
उंबरठा	१२०
माणदेशी माणसं	१२५
काळी आई	१३०
सीताराम एकनाथ	१३०
सरवा	१४०
गावाकडच्या गोष्टी	१४०
ओझं	१५५
पारितोषिक	१६०
अशी माणसं : अशी साहसं	१६०
पांढऱ्यावर काळे	१७०
वाघाच्या मागावर	१८०
चित्रे आणि चरित्रे	२००
परवचा	२२५

रूपांतरित कथासंग्रह	**किंमत**
मी आणि माझा बाप (अनुवाद)	८०
आत्मचरित्र	**किंमत**
प्रवास एका लेखकाचा	१५०
व्यक्तिचित्रण	**किंमत**
पुढचं पाऊल	१२०
रेखाटन	**किंमत**
जनावनातली रेखाटणे	१४०
माहितीपर	**किंमत**
नागझिरा	९५
अनुवादित माहितीपर	**किंमत**
सिंहांच्या देशात	८०
प्रवासवर्णन	**किंमत**
पांढरी मेंढरे हिरवी कुरणे	१२०

स्मृतिगंध



गोष्ट एका जंगलाची

अपर्णा वेलणकर

('लोकमत'चा १९९९चा 'व्यंकटेश माडगूळकर गौरव अंक' यातून साभार)

"एकदा का जंगलाची उराउरी भेट झाली, की काळजातली सगळी शल्यं मिटून जातात. मनातला राग मावळतो. 'माणूस' म्हणून अंगात असणारी रग जिरूनच जाते. पूर्वी मी नियती वगैरे मानत नसे. माझ्या या बुद्धिवादाचा नक्षा जंगलानेच उतरवला. माणूस म्हणून स्वत:च्या अक्कलहुशारीची फार ऐट मिरवू नये, हा धडाही मी निबिड, गहिऱ्या अरण्यातच शिकलो..."

पुण्यातल्या प्रभात रोडवरचं एक टुमदार, ऐसपैस घर– अक्षर!

या घराला बंगल्याचा श्रीमंती रुबाब नाही. उंचच उंच इमारतीची गगनचुंबी ऐट नाही. जुन्याजाणत्या आम्रवृक्षांपासून नाजूक नवेल्या वेलींपर्यंत झाडाझुडपांनी वेढलेल्या गर्द हिरवाईतून हे घरकुल शोधूनच काढावं लागतं. आसपास मोकळी जमीन... त्यावर चहुबाजूंनी तरारलेली बाग... घराच्या उतरत्या छपराला कवेत घेऊन आभाळात घुसलेली जुन्या वृक्षांची वृद्ध, तुकतुकीत खोडं... गर्द हिरव्या पानांच्या कुशीत चिवचिवणारी पाखरं... इकडून तिकडे धावणाऱ्या लुकलुकत्या डोळ्यांच्या धिटुकल्या खारी... आणि चौसोपी वाड्याला असावं तसं घरगुती अंगण. त्या अंगणात झुलती खुर्ची टाकून व्यंकटेश माडगूळकर बसले होते. आजारपणाने थकलेलं शरीर... कुंपणापलीकडच्या वाहत्या रस्त्याकडे अनिमिष पाहणारी शांत मुद्रा... आजूबाजूच्या गजबजत्या कोलाहलाची खूण शोधूनही सापडणार नाही अशी

एकाग्र नजर. जंगल झाडोऱ्यातल्या वाटा- पायवाटा तुडवून, अस्सल वाणाने घडलेल्या माणसांच्या मनाचे तळ धुंडून गवसलेलं आयुष्यभराचं पाथेय सांभाळून असावं तशा निवृत्त मनाने तात्या निवांत बसले होते. त्यांना म्हटलं,

''तुमच्याशी बोलायचं होतं थोडं...''

– चेहऱ्यावरच्या अथांग डोहात एकही तरंग उठला नाही. म्हणाले, ''आता सांगावंसं वाटत नाही काही. ती ऊर्मी संपली कधीच. सांगण्यापेक्षा शोधणं खरं... शोधत राहावं माणसानं...''

''या शोधाच्या वाटा-पायवाटा तुम्हीच तर शोधून दिल्यात... नाहीतर जंगल तुडवणं कुठं ठाऊक होतं मराठी वाचकाला?'' बोलता बोलता म्हटलं तसे तात्या मनापासून हसले. म्हणाले,

''नेहमी पायवाटेवरून जावं, बरं का! रस्त्याने चालणं काही खरं नव्हे. रस्ते वाहनांसाठी असतात. माणसांसाठी नव्हे. एखादा रस्ता कुठे जातो हे ठाऊक असतं आपल्याला. पायवाट जे माहीत नाही तिकडे घेऊन जाते.'' – अज्ञात पायवाटांवरचा तात्यांचा हा प्रवास सुरू झाला अगदी कोवळ्या वयात. आज आयुष्याच्या संध्याकाळी, त्या दिवसांच्या आठवणीने तात्यांच्या चेहऱ्यावर हिरवागार तजेला फुलून येतो. तरुण, कोवळे दिवस वेशीपलीकडच्या जगाशी कसला म्हणून संबंध नसलेलं माणदेशातलं माडगूळ. पावसाने भिजलेली काळी शेतं, ओढ्या-ओघळींचे थंडगार हिरवे काठ, माळरानं, काटवनं, टेकड्या, ताली यांच्या अंगाखांद्यावरच सगळं बालपण गेलेलं. रामोशी, फासेपारधी, धनगर, वैदू अशा रानोमाळ हिंडणाऱ्या जातीजमातीतली पोरं हे बालमित्र. तात्या सांगतात, ''काय काय करायचो त्या वयात आम्ही. वाहत्या नदीत शेवाळाखाली दडलेले मासे हाताच्या ओंजळीत पकडायचो. होल्याची पोरं घरी आणली होती. मुरमुटीच्या खोडावरचे सोनकिडे पाळले होते. जंगलीच होतो अगदी!'' सरुड, फरुड, घोरपडी, सापसुरळी, भोरड्या, पकुर्ड्या, करकोचे, लांडगे, मुंगुस, खारी... किती न् काय! बोलता बोलता तात्या सगळं जंगलच उभं करतात नजरेसमोर आणि बघता बघता गप्पांची बैठक जमू लागते.

'हे सगळं कुठून आलं तुमच्यामध्ये?' असल्या ठराविक प्रश्नांचे अडथळे तात्यांना अजिबात मानवत नाहीत. ते म्हणतात, ''येतबित नसतं काही. असतंच ते मुळात. आपण फक्त शोधायचं. सापडलं तर जपायचं... वाढवायचं...''

आपल्या मनाची हिरवीगार ठेवण तात्यांना लहानपणीच उमगली

असावी. ''रानातच असायचो दिवसभर. निवडुंगाच्या फणीची तांबडीभडक बोंडं पोटभर खाल्ली आहेत. गोंदणीची झाडं वेंधून माणकासारखी लालचुटूक गोंदणं, चिंचेचा मोहर, जोंधळ्याच्या ताटावर फुलणारी साखर, बाभळीचा डिंक, निळुंब्या, अळुंब्या असलं सगळं फस्त करायचो. या भ्रमंतीत नाना पाखरं भेटली. प्राण्यांशी, जनावरांशी गाठ पडली. त्यांच्या मागे-पुढे धावता धावताच पायात बळ आलं. आता एवढं झाल्यावर कोरडा कसा राहीन?'' तात्या मिश्कील हसून विचारतात.

जंगलाच्या हाका

वयाची १६ वर्षं माडगूळच्या रानावनात गेली. पुढे पोटापाठी धावताना वनवास सुटला... वेगवेगळ्या शहरांत राहणं झालं. शब्दांची संगत लाभली आणि पुन्हा एकवार जंगलाच्या हाका ऐकू येऊ लागल्या. नागझिरा... मेळघाट... भरतपूर... काझीरंगा कुठे कुठे भ्रमंती सुरू झाली. सुरुवातीला तात्यांच्या खांद्यावर चांगली भलीभक्कम बंदूक असे. नेम धरून बंदुकीचा बार टाकला की क्षणार्धात समोरच्या झाडोऱ्यातली खसफस शांत करून टाकण्याचं कसब बोटांना अवगत होतं. नि:शब्द जंगलाचा वेध घेत चहुबाजूंनी भिरभिरणाऱ्या नजरेतला 'शिकारी' सतत जागा असे. दबा धरून बसलेली पावलं 'भक्ष्या'च्या दिशेने सरकत राहत. बंदुकीच्या चापावर ठेवलेलं बोट 'त्या' क्षणाची तहान लागून अस्वस्थ असे. ''त्या काळात खूप बघितलं जंगल. पशुपक्ष्यांचं जगणं बघितलं. त्यांच्या जगण्यातले नियम समजावून घेत गेलो. त्यांचं मरण बघितलं. छातीत गोळी घुसल्यावर भस्सकन बाहेर येणारा उष्ण रक्ताचा लोट तर कितीदा पाहिला असेन. इतर प्राण्यांना मारून त्यांच्या रक्तामांसावर गुजराण करणाऱ्या पशूंच्या नजरेत स्वत:च्या मरणाचं भय कसं लकाकतं तेही पाहिलं.''

– एकेकाळी आपण शिकारी होतो, आपल्याही बंदुकीवर अनेक पशुपक्ष्यांचं रक्त लागलंय हे कबूल करताना तात्यांचं मन बिलकुल कचरत नाही. ते म्हणतात, ''हे शिकारीपण रक्तातच आहे माणसाच्या. ते कसं नाकरणार आपण? सुरुवातीला रग असते अंगात. इतर जिवांना वाकवणं, तुडवणं आणि जमलंच तर जिवे मारणं म्हणजे स्वत:चा पुरुषार्थ सिद्ध करणं, असा उद्दाम भ्रम असतो मनात. या उफाळत्या क्रौर्यावर झाकण घालू म्हटलं तर घालता येत नाही. ते उतू गेलेलंच बरं. माझ्यामधल्या शिकाऱ्याची भूक आपसूकच मरत गेली. मोठ्या खुमखुमीने पैसे जमवून विकत घेतलेली बंदूक

गोंदणं, चिंचेचा मोहर, जोंधळ्याच्या ताटावर फुलणारी साखर, बाभळीचा डिंक, निळुंब्या, अळुंब्या असलं सगळं फस्त करायचो. या भ्रमंतीत नाना पाखरं भेटली. प्राण्यांशी, जनावरांशी गाठ पडली. त्यांच्या मागे-पुढे धावता धावताच पायात बळ आलं. आता एवढं झाल्यावर कोरडा कसा राहीन?'' तात्या मिश्कील हसून विचारतात.

जंगलाच्या हाका

वयाची १६ वर्षं माडगूळच्या रानावनात गेली. पुढे पोटापाठी धावताना वनवास सुटला... वेगवेगळ्या शहरांत राहणं झालं. शब्दांची संगत लाभली आणि पुन्हा एकवार जंगलाच्या हाका ऐकू येऊ लागल्या. नागझिरा... मेळघाट... भरतपूर... काझीरंगा कुठे कुठे भ्रमंती सुरू झाली. सुरुवातीला तात्यांच्या खांद्यावर चांगली भलीभक्कम बंदूक असे. नेम धरून बंदुकीचा बार टाकला की क्षणार्धात समोरच्या झाडोऱ्यातली खसफस शांत करून टाकण्याचं कसब बोटांना अवगत होतं. नि:शब्द जंगलाचा वेध घेत चहुबाजूंनी भिरभिरणाऱ्या नजरेतला 'शिकारी' सतत जागा असे. दबा धरून बसलेली पावलं 'भक्ष्या'च्या दिशेने सरकत राहत. बंदुकीच्या चापावर ठेवलेलं बोट 'त्या' क्षणाची तहान लागून अस्वस्थ असे. ''त्या काळात खूप बघितलं जंगल. पशुपक्ष्यांचं जगणं बघितलं. त्यांच्या जगण्यातले नियम समजावून घेत गेलो. त्यांचं मरण बघितलं. छातीत गोळी घुसल्यावर भस्सकन बाहेर येणारा उष्ण रक्ताचा लोट तर कितीदा पाहिला असेन. इतर प्राण्यांना मारून त्यांच्या रक्तामांसावर गुजराण करणाऱ्या पशूंच्या नजरेत स्वत:च्या मरणाचं भय कसं लकाकतं तेही पाहिलं.''

– एकेकाळी आपण शिकारी होतो, आपल्याही बंदुकीवर अनेक पशुपक्ष्यांचं रक्त लागलंय हे कबूल करताना तात्यांचं मन बिलकुल कचरत नाही. ते म्हणतात, ''हे शिकारीपण रक्तातच आहे माणसाच्या. ते कसं नाकरणार आपण? सुरुवातीला रग असते अंगात. इतर जिवांना वाकवणं, तुडवणं आणि जमलंच तर जिवे मारणं म्हणजे स्वत:चा पुरुषार्थ सिद्ध करणं, असा उद्दाम भ्रम असतो मनात. या उफाळत्या क्रौर्यावर झाकण घालू म्हटलं तर घालता येत नाही. ते उतू गेलेलंच बरं. माझ्यामधल्या शिकाऱ्याची भूक आपसूकच मरत गेली. मोठ्या खुमखुमीने पैसे जमवून विकत घेतलेली बंदूक खुंटीला कधी लटकवली माझं मलाच कळलं नाही. प्राण्यांबद्दल प्रेम वाटायला लागलं. त्यांच्याशीही आपलं काही नातं असतं, ते जपलं पाहिजे

स्वत:च्या बुद्धिमत्तेची, अक्कलहुशारीची फार ऐट मिरवू नये, हा धडा जंगलानेच मला शिकवला. अतिसुसंस्कृतपणाचा मोह सोडून अंगचा रानटीपणा थोडाफार जोपासण्याची हिंमत एरवी मला झाली नसती.''

...माणसाला हे कसं जमावं?

जंगलाने दिलेले असे अनेकानेक धडे तात्यांनी आपल्या पुस्तकांमध्ये आवर्जून नोंदवले आहेत. जीवचक्र अव्याहत चालवण्यासाठी निसर्गाने घालून दिलेले नियम जंगलातले पशुपक्षी किती कसोशीने पाळतात, हे बारकाईने पाहिलं आहे. 'माणूस जरा डोळे उघडून हे सगळं पाहील, तर आपण विनाकारण निसर्गात किती ढवळाढवळ करतो याची त्याला लाज वाटेल', असं तात्या कळवळून सांगतात; पण भौतिक सुखाच्या हव्यासाने पछाडलेल्या माणसाला हे कसं जमावं? निसर्गाला ओरबाडण्याची एवढी अक्राळविक्राळ स्पर्धा जगभर चालू असताना, पशुपक्ष्यांशी, वेली-फुलांशी मैत्र जमवण्याइतकी फुरसत त्याला कुठून लाभावी?

– दिवसेंदिवस खुरटत चाललेल्या माणसाच्या मनुष्यत्वाची बोचरी जाणीव देणाऱ्या या प्रश्नांचा तात्यांना विलक्षण त्रास होतो. क्षणभर काय बोलावं हे सुचत नाही. चेहेऱ्यावरच्या रेषा भराभर बदलतात. ''माणूस निसर्गापासून तुटला की संपलाच! त्यातून सर्वश्रेष्ठत्वाचं भूत त्याच्या टाळक्यावर बसलं की विचारायलाच नको'' – ते सांगतात. अशा स्वार्थी, अप्पलपोट्या मनुष्यजातीबद्दल बोलणंही त्यांना नको वाटतं. त्यापेक्षा सशाची मादी आपल्या पिल्लांना काय काय, कसं कसं शिकवते हे ते तन्मय होऊन सांगतात. भरतपूरला पाहिलेल्या मोरांच्या थव्यांबद्दल लकाकत्या नजरेने बोलतात. मारून ठेवलेली गाय खायला मध्यरात्री दबकत येणाऱ्या मेळघाटातल्या बिबट्याची थरारक गोष्ट सांगताना इतके रंगून जातात, की फांद्यांच्या बेचक्यात बांधलेल्या मचाणावर उभे राहून आपण स्वत:च तो थरार अनुभवतोय, असं वाटावं.

''ससा असो नाहीतर वाघ, जंगलातले प्राणी अकारण कुणाच्या वाट्याला जात नाहीत. आपापला जीव जगवणं, एवढीच एकमेव प्रेरणा त्यांना ठाऊक असते.'' – तेवढ्यात तात्यांना आठवण येते नागझिरामध्ये भेटलेल्या एका उन्मत्त गव्याची... ते सांगतात, ''हे असलं थोरलं जनावर! हनुवटीखाली हातभर केस लोंबत होते. शरीराचा घाट विलक्षण बलिष्ठ. पीळदार. उन्हाळ्याच्या दिवसात सगळीकडे रखरखाट असताना हा प्राणी

काय खाऊन जगतो, याची उत्कंठा फार दिवस मनात होती. अचानक तो असा समोर आला आणि मग राहावलं नाही. मी इतका स्वत:च्या नादात होतो, की खेचलाच गेलो त्याच्याकडे. जेमतेम चार-सहा फुटांचं अंतर राहिलं असेल. बुंध्याला लालसर असलेली निळीकाळी शिंगं उभारून त्याने एकवार माझ्याकडे तोऱ्यात पाहिलं. नजर अशी जहाल की थिजूनच गेलो... पण त्या गव्याने माझ्याकडे मिजासखोर कटाक्ष टाकला आणि 'कोण हा तुच्छ प्राणी' अशा आविर्भावात मान वळवून तो निघूनही गेला.''

– जंगलातल्या अशा कित्येक गोष्टी! जन्म-मृत्यूचा थरार... तहान-भुकेचा संघर्ष... अस्तित्वासाठीची लढाई... आपला वंश वाचवण्यासाठी प्राणपणाने दिलेल्या झुंजी! तात्या सांगतात,

''पूर्वी मी नियती वगैरे मानत नसे. ते सगळं तत्त्वज्ञान झूट आहे असं वाटायचं; पण जंगलाने माझ्या याही बुद्धिवादाचा नक्षा उतरवला. वास्तवात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीमागे एक अदृश्य सूत्र असतं, निसर्गाची काही पूर्वयोजना असते याचा प्रत्यय घेण्याकरता जंगलासारखं दुसरं ठिकाण नाही. ज्यांना एरवी अगदी सहज आपला जीव वाचवता आला असता, असे प्राणी अलगद मृत्यूच्या जबड्यात शिरताना मी पाहिले आहेत. बिबट्याची चाहूल लागली की जिवाच्या आकांताने वांदरं झाडाच्या शेंड्यावर चढतात. बघता बघता त्यातलं एक वांदर अचानक सरसर खाली येतं आणि बिबट्याचे सुळे त्याच्या पोटात रुतताहेत. हे असं का होतं, याला काही उत्तर नाही.''

बुद्धिवादी तर्कशास्त्राला निरुत्तर करणारे असे अनेक अनुभव तात्यांच्या पोतडीत जमा आहेत. जंगलातलं अनुपम सौंदर्य उपभोगताना तिथल्या रक्तरंजित क्रौर्याचंही दर्शन त्यांना अनेकवार घडलं आहे. तरीही जंगलाचा लळा सुटता सुटत नाही. ओलावल्या स्वरात ते सांगतात, ''अवखळ पोरांना घर सांभाळतं. इकडून तिकडे उधळणाऱ्या पोरांना लागू नये म्हणून घर आपला कोपरा आखडून घेतं... पायऱ्या आपली अणकुचीदार कड सावरून पोरांना वाट करून देतात. आपल्याला दिसत नाही, पण हे घडत असतं. जंगलही प्राण्यांना तसंच सांभाळत असलं पाहिजे.''

न उकललेल्या निरगाठी

एवढं मोठं आयुष्य पाहिलं... जंगलातल्या ज्ञात-अज्ञात वाटा तुडवल्या... जनन-मरणाचे शेकडो सोहळे पाहिले... अखंड फिरणाऱ्या ऋतुचक्राचे ऊन-वारे अंगावर घेतले. पायलीभर दु:ख झेललं... पसाभर सुख

जपलं... आता संध्याकाळची किरणं तात्यांच्या अंगणात उतरली आहेत.

''काय वाटतं तुम्हाला? मनातून सुखी आहात का तुम्ही? तृप्त आहात का?''– मी तोच प्रश्न वेगवेगळ्या शब्दांत विचारत राहते... तात्या शांतपणाने मान हलवतात. ''खूप बघितलं आयुष्यात हे खरं आहे; पण तरी जिवाचं समाधान होत नाही. अनेकदा सगळंच अधुरं, अपुरं वाटत राहतं. भूक भागत नाही. तहान शमत नाही; पण असं अधुरेपण हेच आयुष्याचं सार असतं, एवढं आता उमजलं आहे. आपल्याला सगळं समजलं पाहिजे, जे हवं ते मिळालं पाहिजे हा हव्यास एकेकाळी माझ्याही मनावर काजळीसारखा धरलेला होता; पण जंगलात गेलो आणि स्वत:च्या मर्यादा कळल्या. या अपार निसर्गापुढे मनुष्यप्राणी म्हणून आपण किती तोकडे आहोत हे जाणवलं. जेवढं बघता येईल तेवढं बघू असं ठरवलं आणि आयुष्याचा आनंद केला.''

– म्हणजे याही माणसाच्या मनात न उकललेल्या प्रश्नांच्या निरगाठी असतील का? न गवसलेल्या श्रेयाची रुखरुख असेल का?

तात्या म्हणाले,

''तरुण वय आहे ना, म्हणून तुला असले प्रश्न सुचतात. विश्वाच्या आरंभापासूनच या निरगाठी आहेत. त्या अखेरपर्यंत तशाच राहणार. आपण फक्त आपापल्या कुवतीप्रमाणे त्यांना स्पर्श करायचा. त्यांचा पोत जोखायचा. तेवढ्यानेही पुष्कळ कळतं. उमज पडतो आयुष्याचा. आपल्याला जे माहीत आहे, त्यापलीकडे अज्ञात गोष्टींचं एक कृष्णविवर असतंच. अंधाऱ्या खोलीत बॅटरीचा झोत टाकल्यावर जेवढा भाग उजळतो, तेवढीच माणसाची अधिकारकक्षा असते, हे कधी विसरू नये.''

– पण तरीही तात्यांच्या गाठीशी आजचा निखळ आनंद कसा? माणूस म्हणून आपल्या अधुरेपणाची एवढी प्रखर जाणीव आयुष्याने दिलेली असताना त्याची बोच कशी नाही त्यांच्या मनाला?

''कारण मी कधीही माझ्या मनाशी अप्रामाणिक झालो नाही. मला मनापासून करावंसं वाटलं ते ते सगळं मी हट्टाने करून बघितलं. मांजर जसं प्रत्येक उघड्या भांड्यात तोंड घालतं, तसा सगळीकडे डोकावत गेलो. एकमार्गी जगण्याचा मला अगदी पहिल्यापासून तिटकारा होता. म्हणून प्रसंगी संस्कार ओलांडले. रीतीभातींच्या लक्ष्मणरेषा सोयीनुसार वळवल्या; पण मनाचं समाधान झाल्याखेरीज स्वस्थ बसलो नाही. या जगण्याच्या धावपळीत माझ्या हातातून रंग निसटले याची खंत मात्र जरूर वाटते. मला एकाचवेळी

सगळं करायचं होतं. एकाच आयुष्यात अनेक आयुष्यं जगून पाहायची होती. आता वाटतं, हा हव्यास बरा नाही. मी हे पण करीन, मी ते पण करीन, हे हातभर करीन, ते वीतभर करीन याला फारसा अर्थ नसतो. एखादी कला आत्मसात करायची तर आयुष्य तोडून द्यावं लागतं. तेवढं जमलं नाही म्हणून हुरहुरतो जीव, पण त्या वेदनेशीही आता जमलीय दोस्ती!''

पोटापाठी धावताना फार जीव जातो, याचं शल्य आजही तात्यांच्या मनाशी आहे. धावपळीच्या आयुष्याला फुरसतीची निदान किनार असावी, ही त्यांची इच्छा अधुरीच राहिली. सारखी धावपळ, सारखी गती यात उमेदीचे दिवस सरले. अंगावर चांदणं पडत नाही, झाडांच्या पानांची सळसळ ऐकू येत नाही, ओढ्यात आंघोळ होत नाही, अंगणात उताणं झोपून चांदण्यांनी गच्च भरलेलं आभाळ पाहता येत नाही म्हणून जीव रुखरुखत राहिला... तरीही जगून झालेल्या आयुष्याबद्दल तक्रार करू नये, गाऱ्हाणी मांडू नयेत असं तात्यांना मनापासून वाटतं.

'आयुष्याला निंदू नका. ते तुमच्यापेक्षा पुष्कळ चांगलं असतं' असं सांगताना त्यांच्या थकल्या नजरेत अश्रू तरळतात. गळ्यात हुंदका येतो. पुढे काही बोलवत नाही. मग ते मनाशी जपून ठेवलेल्या 'थोरो'ला हाक घालतात. आत्म्याची डागडुजी करून उन्नत जीवन कसं जगावं याचे धडे गिरवण्यासाठी हा थोरो वॉल्डनच्या तळ्याकाठी झोपडी बांधून राहिला होता. त्याने स्वत:चं शेत स्वत: पिकवलं, स्वत:चं अन्न स्वत: रांधून खाल्लं. तो म्हणतो,

''पक्षी आपलं घरटं आपण बांधतात यातलं औचित्य माणसानं ओळखलं पाहिजे. माणूस स्वत:चं घर स्वत:च्या हाताने बांधत आला, स्वत:पुरतं, स्वत:च्या कुटुंबापुरतं अन्न प्रामाणिकपणे मिळवू लागला तर कुणी सांगावं, जगभरात आनंदाची गाणी बहरतील. हाच उद्योग करताना उभ्या जगातली पाखरं गोड गळ्याने गात नाहीत का?'' – तेवढं गाणं पृथ्वीवरच्या माणसांना कधीतरी साधावं... एवढंच तात्यांना मनापासून वाटतं.

❖

श्रद्धांजली

※ ज्येष्ठ संपादक-लेखक रा. अ. कुंभोजकर यांचे निधन

सव्यसाची संपादक आणि लेखक रा. अ. कुंभोजकर यांच्या जाण्याने माध्यमांच्या स्थित्यंतराचा साक्षीदार काळाच्या पडद्याआड गेला. कुंभोजकर ज्या काळात पत्रकारितेत आले, तो काळ कसोटीचा; पण एक अभ्यासू आणि भाषा, साहित्याची उत्तम बैठक असलेला पत्रकार किती अंगाने पत्रकारिता समृद्ध करू शकतो, याचे ते आदर्श उदाहरण होत. माध्यमांमधील विविध पदांवर काम करताना सजग, सकस, अभिरुचिसंपन्न वाचक हाच केंद्रबिंदू मानत त्यांनी नित्यनेमाने शब्दसेवा बजावली. त्यांचा मूळचा पिंड साहित्यिकाचा. वाचनही अफाट. त्यामुळे त्यांना शब्दांची उणीव कधी जाणवली नाही. बातम्या आणि संपादनात गुरफटलेले रा. अ. कुंभोजकर नाना या नावाने परिचित होते. पुढच्या टप्प्यात ते विशेष पुरवण्यांच्या पानोपानीच जास्त काळ रमले. विशेषत: त्यांनी दैनिकांच्या पुरवण्यांचे संपादन दीर्घकाळ केले. त्यांची जडणघडण ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर, डॉ. अ. वा. वर्टी आणि मुकुंदराव किर्लोस्कर यांच्या हाताखाली झाली. त्यामुळे, त्यांच्या एकूणच कामामध्ये कमालीची शिस्त आणि दर्जा असे. बेळगावसारख्या सीमाभागात राहून त्यांनी दीर्घकाळ मराठी भाषेची सेवा केली. त्यांनी स्वत:च एका कार्यक्रमातील मनोगतात म्हटल्याप्रमाणे त्यांची वाङ्मयीन बैठक तयार व्हायला हेच तीन गुरू कारणीभूत झाले. त्यांनी किर्लोस्कर मासिकात आयुष्याचा अठ्ठावीस वर्षांचा प्रदीर्घ काळ घालवला. तो कालखंडही कथा-कादंबऱ्यांकडून नियतकालिकांच्या पुरवण्या संग्रही ठेवून वाचण्याचा. यामुळे पुरवण्यांना अपेक्षित असलेले साहित्यिक मूल्य आणि दर्जा ठेवण्यात कुंभोजकर यशस्वी ठरत गेले. त्यांची उमेदवारी सुरू झाली ती वि. स. खांडेकरांचे शिष्यत्व पत्करून. त्यांच्या सहवासात त्यांनी जी

पाच-सहा वर्षे घालवली त्याबद्दल ते नेहमीच कृतज्ञतेने बोलत. लेखकाने चिंतनाशिवाय लिहू नये असे ते सांगत. एखादी गोष्ट नाट्यमय पद्धतीने मांडली म्हणजे ती कशी आकर्षक होते, याचे शिक्षण त्यांना भाऊसाहेबांकडे लेखन करताना मिळाले आणि ज्याचा वापर त्यांनी पुढे पत्रकारितेतही सक्षमपणे केला. विषय कोणताही असो, तो नेमकेपणाने आणि गांभीर्याने कसा मांडायचा, याचा वस्तुपाठच त्यांना या काळात मिळत गेला. 'अमृत'मधील त्यांचे दिवस असे घडणीत गेले. खांडेकर आणि वर्टी यांच्याकडून मिळालेली गंभीर साहित्यविषयक जाण आणि किर्लोस्कर यांच्याकडून मिळालेला लोकसंग्रहाचा वारसा त्यांनी पुढे आयुष्यभर जपला. म्हणूनच ते जेथे जातील, त्या दैनिकांशी किंवा नियतकालिकांशी माणसेही जोडत गेले, त्यांनी संपादक आणि लेखक अशी ओळख निर्माण केली ती यामुळेच. *('महाराष्ट्र टाइम्स' मधून साभार)*

※ ज्येष्ठ नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे कालवश

ज्येष्ठ नाट्यसमीक्षक, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माजी कार्याध्यक्ष आणि देशातील पहिल्या 'नाट्यकोशा'चे संपादक डॉ. विश्वनाथ भालचंद्र ऊर्फ वि. भा. देशपांडे (वय ७८) यांचे अल्पशा आजाराने खासगी रुग्णालयात निधन झाले.

वि. भा. देशपाडे यांचा जन्म ३१ मे १९३८ रोजी पुण्यात झाला. एम. ए. झाल्यानंतर 'पौराणिक आणि ऐतिहासिक नाटकांतील व्यक्तिरेखाटन' या विषयावर प्रबंध सादर करून त्यांनी पीएच. डी. संपादन केली. त्यांनी १९६४ ते १९६७ या काळात पुण्यातील स्वाध्याय महाविद्यालय, १९६८ ते १९७१ या काळात सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालय आणि १९७१ ते १९९८ या कालावधीत पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयामध्ये अध्यापन केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, फर्ग्युसन महाविद्यालय, शिवाजी विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठामध्ये नाट्यशास्त्राचे अतिथी प्राध्यापक म्हणून काम केले. तर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ आणि नाशिक येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामध्ये प्रबंध मार्गदर्शक म्हणून काम पाहिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १६ विद्यार्थ्यांनी एम. फिल. आणि पीएच. डी. संपादन केली आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह म्हणून देशपांडे २००६मध्ये काम पाहत होते. डॉ. गं. ना. जोगळेकर यांच्या निधनानंतर परिषदेचे

कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी चार वर्षे काम केले. ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांच्यासमवेत त्यांनी 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' या परिषदेच्या प्रकल्पातील सातव्या खंडाचे संपादन केले होते. देशपांडे यांनी नाट्यसमीक्षेवर आधारित २४ पुस्तकांचे लेखन केले. त्याहून अधिक पुस्तकांचे संपादन केले. विविध स्मरणिकांचे संपादन आणि लेखनकार्यामध्ये योगदान देणाऱ्या देशपांडे यांना नाट्य परिषदेचा वि. स. खांडेकर नाट्यसमीक्षा पुरस्कार, माधव मनोहर पुरस्कार, नाट्यदर्पण पुरस्कार, नाट्यगौरव पुरस्कार, जयंतराव टिळक पुरस्कार, कॉसमॉस बँक पुरस्कार, राजा मंत्री स्मृती पुरस्कार, गो. रा. जोशी पुरस्कार यांसह पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पुरस्काराने गौरविण्यात आले होते. देशपांडे यांच्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ पुणे नगर वाचन मंदिरास दिलेल्या देणगीच्या व्याजातून दरवर्षी एका चांगल्या साहित्यकृतीला इंदिरा-भालचंद्र पुरस्कार दिला जातो. रत्नाकर मतकरी, विजया मेहता, डॉ. अजय वैद्य, मोहन जोशी यांच्या पुस्तकांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

⁕ ज्येष्ठ पत्रकार गोविंदराव तळवलकर कालवश

सामाजिक, राजकीय, आंतरराष्ट्रीय घडामोडींचे भाष्यकार, साक्षेपी संपादक गोविंदराव तळवलकर यांचे अमेरिकेतील ओहिओ प्रांतातील क्लिव्हलँड शहरात हृदयविकाराने निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते. पत्रकारितेचा मानदंड ठरलेले तळवलकर यांच्या निधनाने पत्रकारितेची निष्पक्ष व धारदार लेखणी शांत झाली आहे. तळवलकर १९६८ ते १९९४ पर्यंत 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक होते.

थेट भाष्य, प्रत्येक समाजघटकाला आश्वस्त करणारे लिखाण, पुरोगामी विचारांची प्रसंगी बोचऱ्या व आक्रमक शब्दांमध्ये पाठराखण करणारे तळवलकर यांचा जन्म २२ जुलै १९२५ रोजी झाला. इंग्रजीतून बी.ए. झालेल्या तळवलकर यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'च्या पहिल्या अंकापासून संपादकीय विभागाची जबाबदारी सांभाळली. १९६८मध्ये त्यांनी संपादक पदाची धुरा स्वीकारली. त्यानंतर नवा आयाम दिला. राजकारण, समाजकारणाला दिशा दाखवणारे लिखाण हा त्यांच्या लेखणीचा अलौकिक पैलू होता. महाराष्ट्रातीलच नव्हे, तर देशभरातील लेखक, विचारवंत, साहित्यिक, कलावंतांना त्यांनी 'मटा'तून लेखनाची संधी देत, पत्रकारिता अधिकच समृद्ध केली. 'वाचस्पती' या नावाने लिहिलेले 'वाचता... वाचता'

हे सदर प्रचंड वाचकप्रिय ठरले. 'मटा'च्या मैफल या पुरवणीतून तळवलकर यांनी 'रिकामा' रविवार 'वाचता' ठेवला. राज्य-देशी यासोबतच आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाने व अचूक निरीक्षणांनी त्यांनी मराठी वाचकांना जगाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. आणि त्यांचे विश्व अधिक व्यापक केले. दया पवार, नामदेव ढसाळ, लक्ष्मण माने यांच्या दलित साहित्यामागे ठाम उभे राहून त्यांनी साहित्यातील नव्या बदलांनाही स्थान मिळवून दिले. पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर, अनंत काणेकर, पु. भा. भावे यांच्या शब्दांच्या जादूला त्यांनी वर्तमानपत्राद्वारेही वाचकांपर्यंत पोहोचवले. निवृत्तीनंतर सन १९९६मध्ये पत्नी शकुंतला, तसेच सुषमा आणि निरुपमा या मुलींसह ते अमेरिकेत स्थायिक झाले. तरीही त्यांनी महाराष्ट्रातील आणि भारतातील दैनिके आणि नियतकालिकांतून लेखन सुरूच ठेवले. तळवलकर यांच्या पत्नी शकुंतला यांचे २०१४मध्ये निधन झाले.

समाजावर पत्रकारितेचा नैतिक अंकुश निर्माण करण्याचे मोठे श्रेय तळवलकर यांना जाते. राजकारणातील वाकड्या वाटेवरील नेत्यांचा आक्रमक शैलीत समाचार घेण्याचे धैर्य त्यांनी दाखविले. विशेष म्हणजे यामध्ये त्यांनी कधीही व्यक्तिगत संबंधांचा अडसर येऊ दिला नाही. त्यामुळे राजकारणाला वठणीवर आणणारी पत्रकारिता ही तळवलकर यांनी दिलेली सर्वांत मोठी शक्ती ठरली.

व्यासंगी पत्रकारितेची निष्पक्ष, धारदार लेखणी शांत

'धर्म, जात, भाषा, भूप्रदेश यासाठी टोकाला जाऊन लोकभावना प्रक्षुब्ध करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. यातून फॅसिस्ट प्रवृत्ती निर्माण होण्याचा धोका आहे. तेव्हा असा पंथ अगदी लाटेवर आरूढझाला, तरी त्यापासून अलिप्त राहण्याची व आवश्यक असेल तेव्हा त्याचा निषेध करण्याची दृष्टी हवी...'

– गोविंदराव तळवलकर (एप्रिल, १९९६)

('महाराष्ट्र टाइम्स' मधून साभार)

❖

स्मरण



सुरेश भट

मराठी भावकवितेतला तरल पातळीवर रंगलेला शृंगाररस अद्‌भुतच आहे. नवरसांमध्ये शृंगाररस अत्यंत मानाने स्वत:ला मिरवतो, हे सुद्धा एक सत्यच आहे. मुख्य म्हणजे शृंगार ही मानवी मनाची हवीहवीशी वाटणारी उत्कट अशी सळसळती भावना आहे. प्रणयाचा गाभा असणाऱ्या भावकवितेने तर शृंगाराला गाढआलिंगन दिलेले आहे. विशेषत: साठोत्तरी मराठी भावकवितेत हे प्रणयविश्व तर अक्षरश: ओळीओळीतून प्रगट झालेले आहे. विशेषत: सुरेश भट, मंगेश पाडगावकर, वसंत बापट, शांता शेळके, जगदीश खेबूडकर आणि साठोत्तरी भावगर्भ कवितेच्या अगोदरच्या दहा-वीस वर्षांत ग. दि. माडगूळकर यांच्या कढत लावण्यांमधून हा श्रेष्ठ प्रतीचा शृंगाररस अक्षरश: चांदणं होऊन हळुवारपणे बरसत राहिला आहे. कवितेतून अत्यंत उत्कट आणि तरल अक्षरांतून, स्त्री-पुरुष संबंधातल शृंगार जो प्रगट होतो, तो इतका मादक असतो की, प्रत्येक कविवृत्तीचा जीव, त्या शृंगाररसात मनाने गुंतत जातो. 'प्रत्यक्षाहून प्रतिमा उत्कट' हा अनुभव ह्या शृंगारभारल्या कविता निश्चितपणे देतात. सुरेश भटांनी तर शृंगार रसातला रतिभाव असा काही रंगवला आहे की, त्या रसात आपण चिंब भिजून जातो.

पहाटे पहाटे मला जाग आली
तुझी रेशमाची मिठी सैल झाली...

ह्या ओळी म्हणजे सत्यात उतरावे असे एक अप्रतिम रूप आहे. प्रियकर-प्रेयसी हे नाते जे आहे ना, त्यात रंगलेला हा एक धुंद असा प्रणयरंग आहे.

मला आठवेना... तुला आठवेना...
कशी रात्र गेली, कुणाला कळेना,

तरीही नभाला, पुरेशी न लाली...

प्रणयाची रात्र स्त्री-पुरुष संबंधांना उत्कट जगण्याची एक कैलास उंची गाठून देते. ह्या भावनेने ओथंबलेल्या शृंगाराला शब्दांच्या बाहूत समर्थपणे पेलणारे सुरेश भट, ह्यांची शृंगारभारली कविता आणि त्या कवितेतला हवाहवासा वाटणारा शृंगारपिसारा विलक्षण होता. जेव्हा प्रियकर आणि प्रेयसी ह्या दोघांची, काव्याचा उत्कट आविष्कार असलेली चांदणभारली रात्र, प्रेमरसात चिंब भिजली तर त्यातला आनंद काय असतो ह्याचे एक हवेहवेसे वाटणारे स्वप्नमयी शब्दचित्रच आहे.

गडे हे बहाणे, निमित्ते कशाला
असा राहू दे हात माझा उशाला,
मऊमोकळे केस हे सोड गाली...

प्रियकर आपल्या अत्यंत लाडक्या प्रेयसीला लडिवाळ स्वरात म्हणतोय की, आपल्या ह्या एकत्र येण्याला कुठल्याही संदर्भाचे निमित्त नको आहे की, बहाणासुद्धा नको आहे. तुझा हात माझ्या उशालाच राहू दे. तुझे हे रेशमाहूनही मऊ असणारे मोकळे केस आपल्या दोघांच्याही गालावर रुळत राहू देत. त्या तुझ्या मादक गंध ल्यायलेल्या केसांचा तलम स्पर्श, आपल्या शृंगाराच्या तरल लाटांना चांदण्याच्या झुल्यावर झुलवतो आहे...

कसा रामपारीं सुटे गार वारा
मला दे उशाशीं पुन्हां तू उबारा
अतां राहु दे बोलणें, हालचाली...

रात्रभर रंगलेल्या शृंगाराने एक सुखद ग्लानी वास्तविक दोघांनाही आली होती. पहाटेचे गार शीतल वारे, खिडकीच्या पडद्यांना लपेटत, दोघांनाही प्रेमाने बिलगत होते. त्याच्या मनात आता एकच प्रेमसंवेदना सळसळत असते की, सर्व प्रेमभारल्या हालचालींना विराम देऊन, एकमेकांच्या गाढबाहुपाशात शांतपणे पडून राहावे. बोलण्यालाही मौनाच्या प्रदेशात पाठवून, नि:शब्द हुंकार स्मरत राहावे. भोगलेले आणि आनंदाच्या अत्युच्च पायरीला स्पर्श केलेले हे दिव्य क्षण स्मरत शांतपणे पडून राहावे.

तुला आण त्या वेचल्या तारकांची,
तुला आण त्या जागणाऱ्या फुलांची;
लपेटून घे तू मला भोवताली...

प्रेयसीच्या अप्रतिम सहवासात धुंदपणे घालवलेल्या त्या स्वप्नभारल्या क्षणांना तो तिला चांदणसाक्षीने सांगतो आहे की, भोवती जी गंधभारली

मोगरी फुले उमलून आली आहेत, त्यांनी आपल्या शृंगारात प्रेमाचे शुभ्र रंग भरले होते. आपला शृंगार जेव्हा रंगला होता, तेव्हा ही गंध उधळणारी फुले आपल्या दोघांच्या उमलण्याच्या क्षणाची वाट पाहत जागत बसली होती. त्या फुलांची शपथ घेत मी तुला सांगतो आहे की, मला ह्या क्षणी सर्वांगाने तू लपेटून घे आणि हा प्रेमरसाने भरलेला आपल्या दोघांच्या भोवतीचा हा चांदणगारवा चिरंतन राहिल, असे तू तुझे हे सत्य अस्तित्व जपत रहा...

विसाव्या शतकात जे सर्वोत्तम कवी झाले, त्यात सुरेश भट आणि त्यांची शृंगारभारली कविता होती. माझी अवस्था, त्यांच्या एका गाण्यात त्यांनी जशी प्रगट केली होती, अगदी तशीच होती आणि आजही आहे.

मनातल्या मनात मी, तुझ्यासमीप राहतो
तुला न सांगता तुझा वसंत रोज पाहतो...

ह्या गीताचा शेवट करताना सुरेश भट म्हणतात, ते माझ्यासारख्या त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या अनेक चाहत्यांची आजही तिच मानसिक अवस्था आहे.

तसा न राहिला आता उदास एकटेपणा;
तुझीच रूपपल्लवी, जिथे तिथे करी खुणा,
पहा कसा हवेत मी, तुझ्यासवे सळाळतो...

सुरेश भटांच्या रंध्रारंध्रात कवितेची लय घुमत होती. त्यांची शृंगारभारली गीते काय, गझल्स काय, वा कविता काय, त्यांच्या मुखातून परावाणी होऊन प्रकटायची.

सुरेश भटांच्या प्रेमभारल्या शृंगारगीतांमधून प्रामुख्याने जाणीवेच्या आणि नेणीवेच्या अशा दोन्ही पातळ्यांवरून तीव्रपणे प्रगट झालेला आहे. स्त्रीप्रेमाचे आणि सुडौल स्त्रीदेहाचे पुरुषांना वाटणारे आकर्षण मराठी शृंगारदर्शन कवितेतून आजपर्यंत अनेक श्रेष्ठ आणि ज्येष्ठ कवींनी आजपर्यंत घडविले; परंतु सुरेश भटांच्या स्त्रीजाणीवा अधिक खोलवरचे शृंगारदर्शन घडवितात. भटांच्या कवितांमधली स्त्रीप्रतिमा काहीशी अनोखी आणि काहीशी कामोत्तेजक आहे, असे ह्या कवितांचा आस्वाद घेताना निश्चितपणे जाणवते. स्त्रीच्या अंतर्गत मनात शृंगाराचे जे तरल पदर आहेत, ते सुरेश भट आपल्या प्रेमकवितांमधून आधिक्याने अधोरेखित करतात. सुरेश भटांच्या ऐन उमेदीत म्हणजे अगदी पंचवीस-तीस वय असताना 'रूपगंधा' ही कविता त्यांच्या सर्व सामर्थ्यानिशी अवतरली होती.

मल्मली तारुण्य माझे, तू पहाटे पांघरावे

मोकळ्या केसांत माझ्या, तू जीवाला गुंतवावे...

प्रियकराला शृंगारभारली साद घालणारी, तारुण्याने मुसमुसलेली स्त्री आणि तिच्यात निर्माण झालेला प्रेमभाव, कामजागृती प्रस्तुतच्या प्रेमगीतातून सुरेश भटांनी फार तरल पातळीवर प्रगट केलेली आहे. हे मनातले मल्मली तारुण्य विलक्षणपणे सळसळू लागले आहे. केशसंभार हा तर स्त्रीसौंदर्याचा, गर्वानं फुलून यावा असा उन्माद आहे. कपाळावर रुळणाऱ्या बटा आणि प्रियकराचे अवघे प्रेमअस्तित्व कवेत घेण्याची ह्या मल्मली केसांतली जादू पुरुषाला मोहिनी घातल्याशिवाय राहत नाही. ती आपल्या प्राणप्रिय प्रियकराला साद घालते आहे की, तू माझ्या दाट काळ्याभोर केशसंभारांत तुझा प्रेमभारला जीव गुंतव. माझे हे मल्मली मुसमुसलेले तारुण्य तू तुझ्या एकूणच अस्तित्वावर पांघर.

लागुनी थंडी गुलाबी शिर्शिरी यावी अशी, की
राजसा, माझ्यात तू अन् मी तुझ्यामाजी भिनावे...

मध्यरात्री पसरलेली ही हवीहवीशी वाटणारी, प्रेमिकांना मिठीत घट्ट मिटवून टाकणारी गुलाबी थंडी आपल्या दोघांना अशी काही बिलगावी की, तू माझ्यात आणि मी तुझ्यात मिसळून जावे.

गर्द राईतून यावा भारलेला गार वारा...
तू मुक्या ओठात माझ्या दंशनाने उन्ह प्यावे...

भोवती पसरलेल्या हिरव्यागर्द राईमधून गंधभारला गार वारा आपल्याला लपेटावा आणि त्या शृंगार आनंदात तू माझ्या अधरावर तुझे अधर ठेवून उष्ण, ताजे अमृत प्यावेस. तो कोवळा आणि रसरशीत चुंबनांचा मारा तू मजवर करावास.

चांदण्याचा श्वास जाईच्या फुलांमाजी विरावा
आपुल्या डोळ्यात साऱ्या तारकांनी विर्घळावे...

रात्रीच्या वेळी चांदण्यांसारखी उमलून आलेली जाई-जुईची फुले जी बहरून आलेली आहेत, त्यांच्यामध्ये आपल्या प्रगाढमीलनाचा श्वास चांदणे होऊन विरघळावा. तो चांदण आनंद आपण प्रत्यक्ष भोगावा.

तापल्या माझ्या तनूची तार झंकारून जावी
रेशमी संगीत स्पर्शाचे पुन्हा तू पेटवावे...

तुझ्या अत्यंत प्रेमळ अशा शृंगारभारल्या सहवासात माझ्या तरल देहाची प्रणयतार सतारीसारखी झंकारून यावी. तुझा रेशमी स्पर्श मला पुन्हा पुन्हा बिलगावा की, मी पुन्हा पेटून उठावे.

रे तुला बाहूत माझ्या रूपगंधा जाग यावी
मी तुला जागे करावे, तू मला बिल्गून जावे...

प्रेयसी आपल्या प्रियकराच्या अस्तित्वाने इतकी भारावून गेली आहे की, ती प्रियकराला जणू म्हणते आहे की, माझ्या ह्या बाहूत, तुला माझ्या रूपगंधाने जाग यावी. गाढआलिंगनात इतका समरसून जा की, ह्या भोवतीच्या मर्त्य विश्वाचे भानसुद्धा येऊ देऊ नको. तुला ह्या निवांत सुखात समरसून अशी झोप लागावी की तुला जाग आल्यावर लक्षात येईल, की तू माझ्याच प्रेमाच्या मिठीत पहुडला होतास.

सुरेश भटांनी आपल्या कवितांच्या आणि गझलांच्या वाचनांचे अनेक कार्यक्रम केले. रसिकांच्या अंत:करणात सुरेश भटांविषयी विशेष आदराचे स्थान होते. म्हणून त्यांच्या कार्यक्रमांना खूप गर्दी व्हायची.

मराठीत ज्या अप्रतिम अशा शृंगारभारल्या कवितांचे आणि गीतांचे, तसेच गझलांचे लेखन आजपर्यंत झाले, त्यात गेल्या पन्नास वर्षांत ज्यांच्या कवितांनी, गीतांनी आणि गझलांनी रसिक काव्यप्रेमींवर गारूडमोहिनी घातली, त्यात सुरेश भट हे श्रेष्ठ कवी होते. भटांच्या गझलांनी तर मराठी काव्यविश्वात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. १९६१ साली सुरेश भट ह्यांचा 'रूपगंधा' हा पहिला कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. ह्या संग्रहातल्या पहिल्याच प्रेमकवितेतून झंकारून उठलेल्या शृंगाराने मराठी कविताविश्वात वेगळा ठसा उमटवला आणि हा शृंगारभारल्या कवितांचा खजिना त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत जोपासला. 'रूपगंधा' नंतर सुरेश भटांचा १९७४ साली 'रंग माझा वेगळा' आणि १९८३ साली 'एल्गार' हे दोन कवितासंग्रह प्रकाशित झाले. त्याचप्रमाणे त्यांचे 'झंझावात' आणि 'सप्तरंग' हे संग्रहही प्रसिद्ध झाले. त्यांना अनेक राज्य पुरस्कार आणि विदर्भ साहित्य संघाचा 'जीवन गौरव' पुरस्कारसुद्धा प्राप्त झाला होता. सुरेश भट ह्यांचा जन्म १५ एप्रिल १९३२ रोजी झाला आणि ह्या गझलसम्राटाने ह्या कविताविश्वाचा १४ मार्च २००३ रोजी निरोप घेतला. एका वादळी व्यक्तिमत्त्वाचा कविताप्रवास मात्र थक्क करणारा होता.

– वामन देशपांडे

५ वी आवृत्ती

मराठीचे व्याकरण

लेखक - **डॉ. लीला गोविलकर**

किंमत : ४००/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

भाषा ही एक पद्धती आहे आणि भाषेचे घटक सामान्यपणे विशिष्ट नियमांना अनुसरून वागत असतात. पुन्हा हे नियम सुटे सुटे नसतात, तर एका समग्र नियमव्यवस्थेचे ते भाग असतात. भाषेतल्या ध्वनींची आणि अर्थवाहक घटकांची रचना व कार्य यांचे दिग्दर्शन ही समग्र नियमव्यवस्था करीत असते. ही नियमव्यवस्था पूर्णपणे समजावून घेणे, तिच्या मर्यादा जाणणे, तिने स्वीकारलेल्या अपवादांची माहिती करून घेणे आणि अशा अभ्यासानिशी समग्र नियमव्यवस्थेची पुन्हा जास्तीतजास्त शास्त्रशुद्ध मांडणी करणे, हेच व्याकरणाचे कार्य होय. पतंजलीच्या 'व्यक्रियते अनेन इति व्याकरणम्' या व्याख्येचा हाच अर्थ सांगता येतो. हा अर्थ लक्षात घेऊनच डॉ. लीला गोविलकर यांनी प्रस्तुत ग्रंथात मराठी भाषेचे व्याकरण सिद्ध केल्याचे दिसेल. मराठीच्या विद्यमान प्राध्यापकांमध्ये व्याकरणशास्त्राचा मूलभूत अभ्यास करणाऱ्या प्राध्यापकांची संख्या हाताच्या बोटांवर मोजता येईल इतकी अत्यल्प आहे. डॉ. लीला गोविलकर यांचा समावेश या अत्यल्प प्राध्यापकांत होतो. व्याकरणशास्त्राच्या अभ्यासक म्हणूनच त्या सर्वांना परिचित आहेत. त्यांनी अद्ययावत दृष्टी बाळगून तयार केलेला प्रस्तुत ग्रंथ व्याकरणाच्या अभ्यासकांना मार्गदर्शक ठरेल.

डॉ. दत्तात्रय पुंडे

अभिप्राय

इतिहासाच्या विकृतीकरणावरील सडेतोड भाष्य

'ओसामा बिन लादेन हा मुळात अतिशय शांत, नम्र व दयाळू असा माणूस होता; मात्र परिस्थितीच अशी निर्माण झाली, की 'जिहाद' पुकारण्यावाचून त्याच्याकडे पर्यायच नव्हता. नाइलाजाने त्याने 'जिहाद'चे अस्त्र उगारले. इस्लाम विरोधकांनी अत्यंत निष्ठुरपणे मानवी हक्कांची पायमल्ली करीत लादेनवर हल्ला केला...'

२५०० साली इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या एखाद्या व्यक्तीला जर वरील मजकूर आढळला तर त्याची लादेनबाबत काय भावना होईल? साहजिकच त्याची सहानुभूती लादेनला आणि इस्लामला मिळेल. अर्थात ही गोष्ट आहे ५०० वर्षांनंतरची. भविष्यातली. भूतकाळाचे काय? पृथ्वीतलावरील मानवी संस्कृती, हिंदुस्थान यांच्या इतिहासाचे काय? वर दिलेले उदाहरण हे प्रातिनिधिक आहे. इथे व्यक्तीऐवजी एखादी विचारसरणी, इसम याबाबतदेखील असे घडू शकते. एखाद्या विचारसरणीला अगदी झोडपून काढणे किंवा मग त्याची तळी उचलून धरणे हे नामवंत इतिहासकारांना सहज शक्य असते. आणि 'मी म्हणतो तेच सत्य' असा त्यांचा हेका असतो. आपल्या हिंदुस्थानात वर्षानुवर्षे हेच चालू आहे. हिंदुस्थानच्या खऱ्या इतिहासाला बगल देत त्याचे विकृत रूप सातत्याने मांडले गेले आहे. प्रख्यात पत्रकार अरुण शौरी यांनी आपल्या 'एमिनंट हिस्टोरियन्स'या इंग्रजी पुस्तकाद्वारे या प्रकाराचा चांगलाच समाचार घेतला आहे. सुधा नरवणे यांनी केलेला या पुस्तकाचा मराठी अनुवाद 'ख्यातनाम इतिहासकार' मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केला आहे.

जो माणूस इतिहास विसरतो तो भविष्य घडविण्याची क्षमता गमावून बसतो असे म्हणतात. अर्थातच हा इतिहास सत्य स्वरूपात मांडला जाणे अपेक्षित आहे. आपल्या हिंदुस्थानात इतिहास सत्य स्वरूपात मांडला जातो

आहे का, या प्रश्नाचे उत्तर दुर्दैवाने 'नाही' असे द्यावे लागेल. 'द इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च' (आयसीएचआर) ही इतिहास संशोधन करणारी बडी संस्था. शालेय अभ्यासक्रमाबाबत मार्गदर्शन तत्त्वांची शिफारस करणाऱ्या एन.सी.ई.आर.टी. वर या संस्थेचा प्रभाव. आर्थिक व मनुष्यबळ यांची या संस्थेला मुळीच कमतरता नाही. या संस्थेकडून आपल्या देशाच्या इतिहासाबद्दल जे संशोधन व लेखन होत असते ते अतिशय महत्त्वाचे व ग्राह्य मानले जाते. साहजिकच हे लिखाण नि:पक्षपातीपणे व्हावे अशी कुणाचीही अपेक्षा असेल; मात्र ही अपेक्षा कशी फोल ठरली आहे व ठरते आहे हे शौरी यांनी आपल्या पुस्तकातून दाखवून दिले आहे.

पुरोगामित्वाचा, सचोटीचा टेंभा मिरवणारे नामवंत इतिहासकार स्वत:च्या तुंबड्या भरण्यासाठी कशा क्लृप्त्या करतात, फसवणूक करतात हे सांगत त्यांनी त्यांचे चांगलेच वाभाडे काढले आहेत. आयसीएचआरवर प्रदीर्घ काळापासून डाव्या विचारसरणीच्या मंडळींचा पगडा आहे. एखाद्या व्यक्तीने कुठली विचारसरणी आदर्श मानावी हा त्याचा वैयक्तिक प्रश्न झाला आणि तो त्याच्या वैचारिक स्वातंत्र्याचा भाग आहे. मात्र देशाच्या इतिहासाची मांडणी करताना जर अशा प्रकारच्या कुठल्याही विचारसरणींचा चष्मा लावला गेला तर इतिहास अतिशय विकृत स्वरूपात मांडला जातो, ही बाब अतिशय घातक असून, शौरी यांनी या पुस्तकातून त्याची सतत जाणीव करून दिली आहे.

'आयसीएचआर'चे एक उद्देशपत्र आहे. संस्थेच्या कामाचा नेमका उद्देश त्यात उद्धृत केला आहे. १९७८ पासून त्यात काडीचाही बदल करण्यात आलेला नाही; मात्र वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील आघाडी केंद्रात सत्तेवर आल्यानंतर या उद्देशपत्रात बदल करण्यात आल्याचा कांगावा डाव्या विचारवंतांनी सुरू केला. 'शिक्षणाचे भगवेकरण' होत आहे, असा आरोप करण्यास त्यांनी सुरुवात केली; पण सत्य परिस्थिती काय आहे हे विशद करून सांगताना शौरी यांनी डाव्यांच्या या ऊरबडवेगिरीचा चांगला समाचार या पुस्तकातून घेतला आहे.

'आयसीएचआर'तर्फे इतिहासाच्या संशोधनाचे व त्यावरील ग्रंथ प्रकाशनाचे अनेक प्रकल्प हाती घेतले जातात. हे काम डाव्या गोतावळ्यातील मंडळींनाच दिले जाते. त्यात प्रचंड गैरव्यवहार चालतात. कामाला हातदेखील लावला जात नाही. न केलेल्या कामाचे पैसे खिशात घातले जातात. याबाबतची विस्तृत आकडेवारी देत शौरी यांनी जी माहिती दिली आहे ती वाचून धक्का बसल्याखेरीज राहत नाही. पुरोगामित्व, धर्मनिरपेक्षता यावर केवळ आपलीच मक्तेदारी आहे, अशा तोऱ्यात वावरणारी ही मंडळी

कोंडीत सापडली की कशी वागतात, सत्य स्वीकारण्याची त्यांची तयारी कशी नसते, त्यांचा कांगावखोरपणा कसा उफाळून येतो याचे उत्तम वर्णन काही प्रकरणांत आहे.

पश्चिम बंगालमध्ये प्रदीर्घ काळ डाव्यांची सत्ता आहे. आपले 'डावे'पण सिद्ध करण्यासाठी ही मंडळी इतिहासालादेखील कसे वेठीस धरतात याची माहिती शौरी यांनी दिली आहे. मुस्लिम राज्यकर्त्यांनी हिंदुस्थानात असंख्य देवळांचा विध्वंस केला हे जगजाहीर आहे. असे असताना प. बंगाल माध्यमिक शिक्षण मंडळाने १९८९ मध्ये एक आदेश काढला त्याद्वारे शालेय पुस्तकातील अशा प्रकारचा देवळांच्या विध्वसांचा उल्लेख गाळण्याच्या सूचना दिल्य. हिंदुस्थानची संस्कृती-परंपरा याबाबत टीकात्मक, तुच्छतापूर्वक बोलायचे आणि हिंदुत्वावर टीका करीत इस्लामचे गोडवे गायचे हा या मंडळींचा आवडता उद्योग. शौरींनी या पुस्तकात डाव्यांच्या या उद्योगांवर टीकेचे आसूड ओढले आहेत.

सोव्हिएत युनियन कोसळल्यानंतर डाव्यांचा आवाज काहीसा कमी झालेला असला तरी शैक्षणिक क्षेत्रावर अद्यापही त्यांचे नियंत्रण आहे. प्रसार माध्यमांतील मोठा भाग त्यांच्या नियंत्रणाखाली आहे, त्याचा उल्लेख शौरी करतात. या लोकांनी आतापर्यंत जे असत्य लेखन लोकांच्या माथी मारले आहे त्याचा वा आयसी- एचआरमधील गैरव्यवहारांचा जाब त्यांना विचारलाच पाहिजे, असेही मत ते पुढे मांडतात. पुरोगामित्वाचा टेंभा मिरविणाऱ्या मंडळींचा बुरखा शौरी यांनी या पुस्तकाद्वारे अक्षरशः फाडला आहे. आपल्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या प्रत्येकाने अवश्य वाचावे असे हे पुस्तक आहे. डाव्या नामवंत इतिहासकारांची सत्याकडे काणाडोळा करण्याची जी मनोवृत्ती आहे, त्याचे यथार्थ दर्शन घडविणारे असे पुस्तकाचे मुखपृष्ठ आहे.



पुस्तकाचे नाव : ख्यातनाम इतिहासकार
प्रकाशन : मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
लेखक : अरुण शौरी
अनुवाद : सुधा नरवणे
किंमत : २५०/-
पृष्ठे : २३२
सामना, २१ ऑक्टोबर २००१

२ री आवृत्ती

व्हिएतनाममधील एका निष्पाप खेड्याची अमेरिकन सैनिकांनी केलेली अमानुष कत्तल

उद्ध्वस्त

लेखक - **उमेश कदम**

किंमत : १८०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

'मी–लाय्' या क्वांग अंगै (व्हिएतनाम) जवळच्या खेड्यामध्ये १६ मार्च, १९६९ च्या सकाळी
जे काही घडलं त्यावर आधारलेली ही कहाणी आहे.
'उद्ध्वस्त'मधली काही व्यक्तिमत्त्वं आज वास्तवातली, हयात असलेली आणि काही नसलेली आपल्याला भेटतील. अशा व्यक्ती प्रत्यक्षात तत्सम प्रसंगी जशा वागल्या-बोलल्या असत्या, तशाच त्या आहेत. या कथानकामध्ये वास्तव
आणि कल्पित यांचा संयोग साधून आधुनिक इतिहासातला एक अविश्वसनीय वाटावा असा विदारक आणि हृदयभेदक अध्याय, चित्तवेधक आणि नाट्यपूर्ण रीतीने मराठी वाचकांसमोर
मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

अभिप्राय

अनवट वाटेवरचा अनुभव

गुजराती लेखक ध्रुव भट्ट यांची 'समुद्रान्तिके' ही लेखाकृती रूढार्थाने कुठल्याच साहित्यप्रकारात न मोडणारी. कथेचा एकजिनसी अनुभव तीत नाही आणि कादंबरीचं बहुआयामित्वही तीत आढळत नाही. त्यामुळेच असेल बहुधा, सोय म्हणून तिला 'कादंबरी' प्रकारात समाविष्ट केलं गेलं आहे. 'सागरतीरी' या नावाने अंजली नरवणे यांनी तिचा मराठी अनुवाद केला आहे.

'सागरतीरी'त सलग असं कथानक नाही. आहेत ते विलक्षण अनुभव आणि विविध व्यक्तिरेखांचे तुकडे ! ज्यांची कधी सुसंगत वाटणारी, पण बरीचशी विस्कळीत अशी सांधेजोड करण्यात आली आहे. इंजिनियरिंगची पदवी पदरात असूनही दोन वर्षे बेकारीत काढलेल्या एका तरुण, संवेदनशील इंजिनियरच्या वाट्याला आलेल्या अकल्पित अनुभवांचं हे संचित आहे. बेकारीने संत्रस्त झालेल्या या तरुणाला एके दिवशी अनपेक्षितपणे एका सरकारी प्रकल्पात काम मिळते. लाभ-हानीचा यत्किंचितही विचार न करता तो ही नोकरी स्वीकारतो आणि त्या बिंदूपासून त्याच्या आयुष्यातील एका अज्ञाताच्या प्रवासाची सुरुवात होते.

सौराष्ट्राच्या किनाऱ्यावरील विरळ लोकवस्ती असलेल्या अत्यंत मागास प्रदेशात सरकारला एक रासायनिक कारखाना उभारावयाचा असतो त्यावर प्रकल्प अभियंता म्हणून त्यांची नेमणूक होते. या प्रकल्पासाठी लागणाऱ्या जमिनीची मोजणी करून ती संपादन करणं आणि प्रकल्प अहवाल तयार करणं हे त्याचं काम असतं. शहरी संस्कृती, सोयी-सुविधांपासून शेकडो मैल दूर आणि पदोपदी येणाऱ्या असंख्य अडचणींचा सामना करत त्याला ही जबाबदारी पार पाडावी लागणार आहे, याची जाणीव तिथे रुजू होण्यापूर्वीच त्याला होते.

प्रारंभी तर, या अशा सर्व तऱ्हेच्या अभावांशी दोन हात करत आपण

आपलं विहित काम कसं पुरं करणार, असा प्रश्न त्याला पडतो, त्यापेक्षा 'नको हे काम' म्हणून आपल्या जीवाभावाच्या माणसांत परतलेलं काय वाईट, असा टोकाचा विचारही क्षणभर त्याच्या मनात येतो; पण आपली बेकारीतील दोन वर्षे आठवतात आणि भरकटणारं त्याचं मन ताळ्यावर येतं. शहरी कोलाहलापासून दूर शांत निसर्गात, कोणतीही तक्रार न करता जगणारी तिथली आनंदी वृत्तीची माणसं पाहिल्यावर तर त्याचं कुतूहलभरलं मन मागे न फिरता पुढंपुढंच जायला त्याला भाग पाडतं. कळत-नकळत तोही त्यांच्यात गुंतत जातो.

नोकरीवर रुजू होण्याचा प्रवासातच त्याला इथल्या प्रदेशाची, साध्या - सरळ जीवनपद्धतीची, वैचित्र्याचा परिचय देणाऱ्या माणसांची, त्यांच्या निरपेक्ष प्रेमाची ओळख होते. नंतर तीन वर्षांच्या तिथल्या वास्तव्यात त्याला माणसांचे असंख्य नमुने पाहायला, अनुभवायला मिळतात.

कोणत्याही पाशांत स्वत:ला अडकवून न घेता काहीसं दिशाहीन आयुष्य जगणाऱ्या सबूरची एकमात्र इच्छा आहे ती - स्वत:च्या मालकीच्या (लहानशा का होईना) जमिनीच्या तुकड्याची ! पण तोही त्याच्या नशिबी नाही. या एकाच जीवनध्यासाने पछाडलेला सबूर कथनायकाकडून मिळालेल्या नापीक, ओसाड जमिनीच्या तुकड्यानेही कृतार्थ होतो. तीच गोष्ट नूरभाईंची. जंगल खात्यातला हा माणूस ! सर्वार्थाने पशु-पक्ष्यांच्या जगातच ते वावरतात. त्यांच्याच भाषेत बोलतात. बंगाली बाबाजी ही आणखी एक वल्ली. निसर्गाशी त्यांची अतूट नाळ जोडली गेली आहे. त्यांच्या फटकळपणातूनही माणुसकीचा निर्मळ झराच वाहत असतो. बेटावरचा धाडशी खलाशी किष्ना हे तर अजबच रसायन. 'भीती, अशक्य' असले फालतू शब्द त्याच्या शब्दकोशात नाहीतच. तुफानाला सामोरं जातानाही त्याचं अप्रूप त्याला वाटत नाही. तो त्याच्या जगण्याचाच एक भाग आहे जणू ! इथले श्यामजी सरपंच हे या मातीतच घडलेलं एक धीरोदात्त व्यक्तिमत्त्व. इथल्या माणसांचं ते खरंखुरं प्रतिनिधित्व करतात. गावात सरपंच म्हणून प्रतिष्ठित जीवन जगणारे श्यामजी उन्हाळ्यात मात्र इतरांबरोबर मोलमजुरीसाठी वणवण भटकतात. त्यात त्यांना कोणताही कमीपणा वाटत नाही.

'सागरतीरी' त एक व्यक्ती मात्र प्रत्यक्ष अस्तित्वात नसूनही सर्वव्यापी होऊन राहिलीय. ती म्हणजे हादा भट्ट! संपूर्ण कथानकभर हादा भट्टांबद्दल जाणून घ्यायला आपण उत्सुक राहतो. तीच गोष्ट अवलची! या लोकविलक्षण स्त्रीचं वागणं-बोलणं-व्यवहार वाचकाचं कुतूहल जागृत करतं. ती नेमकी

कोण, कुठली या आडगावात ती कशी रुजली, तिच्या या अलिप्त जगण्याचा मतलब काय, अशा असंख्य प्रश्नांचं मोहोळ वाचकाच्या मनात उठतं, त्याची उत्तरं जरी कादंबरीच्या शेवटी मिळत असली तरी ती मिळेपर्यंत उगीचच बेचैन व्हायला होतं.

निसर्गाशी एकरूप झालेल्या या निरनिराळया मुशीतील वाटाव्यात अशा पण अंतर्यामी निर्झरासारख्या निर्मळ व्यक्तींचा कथानायकाला परिचय होत जातो. त्यांच्याशी वेळोवेळी झालेल्या संवाद-विसंवादातून आपणही हळूहळू अंतर्बाह्य बदलत चाललो आहोत, याची जाणीव त्याला होते. 'माणूस'या शब्दाला अर्थ देणाऱ्या खऱ्याखुऱ्या माणसांना भौतिक प्रगतीच्या वरवंट्याखाली आपण उद्ध्वस्त करायचं का, हा प्रश्न त्याचा पिच्छा पुरवतो. कामातलं लक्ष उडतं. मन द्विधा होतं. बंगाली बाबा त्याची मन:स्थिती ओळखतात. त्याचं वस्तुस्थितीकडे लक्ष वेधतात. त्यांच्याशी बोलल्यावर त्याच्या मनात घोंघावणारं वादळ शांत होतं आणि निश्चिंत होऊन तो आपल्या कामाला लागतो.

चाकोरीबद्ध कथानकाची अपेक्षा ठेवून 'सागरतीरी' हाती घेणाऱ्यांच्या पदरी निराशाच येईल. कारण 'सागरतीरी' हा एक अनवट वाटेवरचा अनुभव आहे. कथानकच नसल्याने यातल्या व्यक्तिरेखाही अचानक येतात आणि गायब होतात. या व्यक्तिरेखा स्वतंत्रपणे मात्र मनावर ठसतात. अपरिचित प्रदेश, तिथली लोकसंस्कृती आणि विलक्षण माणसं यांचं दर्शन घडवणारी 'सागरतीरी' कोणताही पूर्वग्रह मनी न बाळगता वाचल्यास वाचकाला अनोख्या जगात निश्चितच नेईल.

पुस्तकाचे नाव : सागरतीरी
प्रकाशन : मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
लेखक : ध्रुव भट्ट
अनुवाद : अंजनी नरवणे
किंमत : १६०/-
पृष्ठे : १४०
लोकसत्ता, २० जुलै १९९७



२ री आवृत्ती

माझ्या आयुष्यात आलेल्या स्त्रिया आणि पुरुष

मूळ लेखक - **खुशवंत सिंग**

अनुवाद - **लीना सोहोनी**

किंमत : १८०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

इंग्लिश भाषेतील सर्वाधिक लोकप्रिय लेखक आणि सव्यसाची पत्रकार श्री. खुशवंतसिंग यांचं मराठीत अनुवाद झालेलं हे पहिलंच पुस्तक आहे. आपल्या प्रदीर्घ आणि वैविध्यपूर्ण अनुभवांनी समृद्ध अशा आयुष्यात वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या वळणांवर भेटलेल्या काही महत्त्वाच्या स्त्री-पुरुषांच्या, खुशवंतसिंगांनी अत्यंत मोजक्या आणि नेमक्या शब्दांत चितारलेल्या अर्कचित्रांचा हा वैशिष्ट्यपूर्ण संग्रह आहे. यात राजकारणी आहेत, उद्योगपती आहेत, वकील आहेत, सनदी नोकरी आहेत, लेखक आहेत, चित्रकार आहेत आणि अशाच अनोळखी, परंतु तथाकथित उच्चभ्रू व्यक्तीही आहेत.

धारदार, उपहासात्मक आणि कोणताही आडपडदा न ठेवणारं हे थेट लेखन, त्यांनी लेखनासाठी निवडलेल्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचे आजवर केवळ अज्ञात असलेले कंगोरे उलगडून दाखवतं, त्याचबरोबर व्यामिश्र मानवी मनाचा शोध घेण्याची अंतर्दृष्टीही वाचकाला प्रदान करतं.कधी मनाला गुंगवणारं, कधी अस्वस्थ करणारं, तर प्रसंगी प्रक्षुब्ध करणारं हे व्यक्तिदर्शन एकदा वाचलंच पाहिजे, असं सरस उतरलं आहे.

बालनगरी

बिरबलाची खिचडी

एके दिवशी बादशहाने बिरबलाला विचारलं, ''बिरबल, मला सांग, इतकी कडाक्याची थंडी! रात्रभर नदीच्या पाण्यात उभा राहील, असा कोणी माणूस आहे आपल्या राज्यात?''

''महाराज, अशी खूप माणसं आहेत.''

''माझा विश्वास नाही बसत.''

''पण ही गोष्ट खरी आहे.''

''तर मग मला असा माणूस दाखवच.''

''जरूर दाखवीन.''

''कधी दाखवतोस?''

''उद्याच!''

दुसऱ्या दिवशी बिरबलाने एका ब्राह्मणाला बोलावणं पाठवलं. तो बादशहाला म्हणाला, ''हा रात्रभर पाण्यात उभा राहू शकतो महाराज!''

''अस्सं! मग आम्ही याला मोठ्ठं बक्षीस देऊ.''

''हा महालाच्या मागे तलावाच्या पाण्यात आज रात्री उभा राहील. उद्या आपण ह्याला बक्षीस द्या.''

रात्रभर तो ब्राह्मण पाण्यात उभा राहिला. सकाळी बिरबलाने त्याला बादशहा समोर उभं केलं.

बादशहाने विचारलं, ''बिरबल, हा माणूस इतक्या गार पाण्यात कसा उभा राहिला?''

''त्यालाच विचारावं महाराज.''

"का रे ब्राह्मणा, तू रात्रभर त्या गार पाण्यात कसा उभा राहिलास? थंडी नाही वाजली? कशी गेली रात्र?"

"हुजूर, रात्रभर मी महालात जळणाऱ्या त्या दिव्याकडे पहात पाण्यात उभा होतो."

"म्हणजे? तू त्या दिव्याच्या उष्णतेत उभा राहिलास. हातही शेकत राहिलास. मग तुला थंडी वाजणार तरी कशी?"

"असं कसं महाराज? असं घडणं शक्य तरी आहे का?" बिरबलाने विचारलं.

"होय, असंच घडलंय. या माणसाला बक्षीस दिलं जाणार नाही."

बादशहाने बक्षीस दिलं नाही.

दुसऱ्या दिवशी दरबारात बिरबल आला नाही. त्याच्या गैरहजेरीमुळे बादशहाला काळजी पडली. 'बिरबल का बरं आला नाही?' बिरबलाच्या नाराजीचा सलबादशहाला होताच.

बिरबलाला बघण्यासाठी स्वत: बादशहा बिरबलाच्या घरी पोचला. समोर पाहताच त्याला फार आश्चर्य वाटलं. कारणही तसंच होतं.

एका खड्ड्यात एक उंच बांबू उभा केला होता. बांबूच्या वरच्या टोकाला एक गाडगं बांधलं होतं. जमिनीवर काटक्या-कुटक्या पेटवून जाळ तयार केला होता.

बादशहाने जाळाजवळच बसलेल्या बिरबलाला विचारलं, "अरे, हे काय नाटक चाललंय?"

"माझं पोट बिघडलंय म्हणून फक्त खिचडी शिजवतोय."

‘‘खिचडी? अशी? गाडगं कुठे उंचावर आणि चूलएवढीशी खाली! खिचडी कधी आणि कशी शिजणार? चुलीची धग तर दूरच; त्या भांड्यापर्यंत धूर देखील पोचत नाही. डाळ-भात शिजणार कसा?’’

‘‘शिजेलमहाराज.’’

‘‘कधीच शिजणार नाही. हा तुझा वेडेपणा आहे.’’

‘‘नाही हुजूर. तुम्हीच बघा. तो माणूस पाण्यात उभा होता. तिथून दीडदोनशे फूट लांब महालात दिवा जळत होता. त्याची उष्णता माणसाला मिळत होती. तर मग या खालच्या जाळानं गाडग्यात खिचडी का नाही शिजणार?’’

बादशहा मनापासून हसत म्हणाला, ‘‘आम्हाला कळलं बरं. आम्ही मुद्दामच त्या ब्राह्मणाला बक्षीस दिलं नव्हतं. तू काय युक्ती लढवतोस तेच बघायचं होतं. आहेस खरा हुशार! उद्या त्या ब्राह्मणाला तो मागेल ते बक्षीस देऊया. झालं समाधान?’’

दुसऱ्या दिवशी ब्राह्मणाला दरबारात बोलावण्यात आलं. बादशहाने त्याला सन्मानाने बक्षीस दिलं. बिरबलाकडे कौतुकाने पाहत ब्राह्मण आनंदात घरी गेला.

पुस्तकाचे नाव : विनोदवीर बिरबल
लेखक : निर्मला सारडा
मेहता पब्लिशिंग हाऊस

❖

आवर्जून वाचावे असे काही

पावनखिंड

राजा रवि वर्मा

लक्ष्यवेध

बाबुलमोरा

कोवळे दिवस

चित्रे आणि चरित्रे

गावाकडच्या गोष्टी

माणदेशी माणसं

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 April, 2017. Posting Date : 11 April, 2017.

मेहता पब्लिशिंग हाऊस

आमची नवीन पुस्तके आणि ऑफर्स संबंधित माहितीसाठी संपर्क :

9420 594665,
9422 323039

info@mehtapublishinghouse.com
customercare@mehtapublishinghouse.com

Website: www.mehtapublishinghouse.com
Email: sales@mehtapublishinghouse.com

Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse

500 Marathi books Available as e-Book | E-book available : play.google.com/store/books | m.dailyhunt.in/Ebooks/marathi | www.amazon.in

मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनिल अनिल मेहता हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट २०/१डी /१ अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे ४११ ०११.